भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१

**(सन १९५१ चा अधिनियम क्रमांक ४३)**

[दिनांक ३० मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान]

# The Representation of the People Act, 1951

**(Act No. 43 of 1951)**

**[ As in force on the 30th March, 2001]**

**(महाराष्ट्र विशोधन अधिनियमांसहित)**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. १७.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान असलेला दि रिप्रेझेन्टेशन ऑफ दि पीपल ॲक्ट, १९५१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक २, दिनांक २८ ऑगस्ट, २००३, यात पृष्ठ ७१ ते १२६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रितीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २८ ऑगस्ट, २००३.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Representation of the People Act, 1951 as on the 30th March, 2001 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 2, Volume 12, dated 28th August, 2003 on pages 71 to 126.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 28th August, 2003.

# लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१

## कलमांचा क्रम

## भाग एक

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. निर्वचन.

## भाग दोन

### अर्हता आणि निरर्हता

#### प्रकरण एक

#### संसदेच्या सदस्यत्वासाठी अर्हता

३. राज्यसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

४. लोकसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

#### प्रकरण दोन

#### राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्हता

५. विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

५क. सिक्कीम विधानसभेच्या सदस्यत्वाकरिता अर्हता.

६. विधानपरिषदेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

#### प्रकरण तीन

#### संसदेच्या आणि राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हता

७. व्याख्या.

८. विवक्षित अपराधाबद्दल दोषसिद्धी झाल्यामुळे निरर्हता.

८क. भ्रष्टाचाराच्या कारणावरून निरर्हता.

९. भ्रष्टाचार किंवा राजद्रोह यांमुळे बडतर्फ झाल्याबद्दल निरर्हता.

९क. शासकीय कंत्राटे, इत्यादींबद्दल निरर्हता.

१०. सरकारी कंपनीतील पदामुळे निरर्हता.

१०क. निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केल्याबद्दल निरर्हता.

११. निरर्हता दूर करणे किंवा तिचा कालावधी कमी करणे.

#### प्रकरण चार

#### मतदानाबाबतच्या निरर्हता

११क. दोषसिद्धी आणि भ्रष्टाचार यातून उद्‌भवणारी निरर्हता.

११ख. निरर्हता दूर करणे.

## भाग तीन

### सार्वत्रिक निवडणुकांबाबत अधिसूचना

१२. राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकांबाबत अधिसूचना.

१२क. राज्यसभेमध्ये सिक्कीम राज्याला वाटून दिलेली जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुकीची अधिसूचना.

१३. [निरसित].

१४. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत अधिसूचना.

१४क. विद्यमान लोकसभेवर सिक्कीम राज्याचा प्रतिनिधी निवडण्याकरिता अधिसूचना.

१५. राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत अधिसूचना.

१५क. विधानपरिषदेच्या विशिष्ट निवडणुकीबाबत अधिसूचना.

१६. राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीबाबत अधिसूचना.


## भाग चार

### निवडणूक चालनासाठी प्रशासकीय यंत्रणा


१९. व्याख्या.

१९क. निवडणूक आयोगाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन.

२०. मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये.

२०क. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये.

२०ख. अभीक्षण.

२१. निवडणूक निर्णय अधिकारी.

२२. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी.

२३. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कार्ये करणाऱ्या सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निवडणूक निर्णय अधिकारी या संज्ञेत समावेश असावयाचा.

२४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य.

२५. मतदारसंघासाठी मतदान केंद्रांची व्यवस्था करणे.

२६. मतदान केंद्रांसाठी मतदान केंद्राध्यक्षांची नियुक्ती.

२७. मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्ये.

२८. मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्य.

२८क. निवडणूक निर्णय अधिकारी, पीठासीन अधिकारी इ. यांना निवडणूक आयोगावर प्रतिनियुक्त केलेले अधिकारी म्हणून समजणे.

२९. विवक्षित निवडणुकांच्या बाबतीत विशेष उपबंध.


## भाग-चार क

### राजकीय पक्षांची नोंदणी


२९क. संघटना व निगम यांची राजकीय पक्ष म्हणून निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे.


## भाग पाच

### निवडणुकीचे चालन

### प्रकरण एक

### उमेदवारांचे नामनिर्देशन


३०. नामनिर्देशन, इत्यादीसाठी दिनांक नियत करणे.

३१. निवडणुकीची जाहीर नोटीस.

३२. निवडणुकीसाठी उमेदवारांचे नामनिर्देशन.

३३. नामनिर्देशनपत्र दाखल करणे आणि विधिग्राह्य नामनिर्देशनासाठी आवश्यक गोष्टी.

३४. अनामती.

३५. नामनिर्देशनांची नोटीस व त्यांच्या छाननीची वेळ व जागा.

३६. नामनिर्देशनांची छाननी.

३७. उमेदवारी मागे घेणे.

३८. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे.

३९. इतर निवडणुकांमधील उमेदवारांचे नामनिर्देशन.


### प्रकरण दोन

### उमेदवार आणि त्याचे प्रतिनिधी


४०. निवडणूक प्रतिनिधी.

४१. निवडणूक प्रतिनिधी होण्याबाबत निरर्हता.

४२. निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे.

४३. [निरसित].

४४. [निरसित].

४५. निवडणूक प्रतिनिधीची कार्ये.

४६. मतदान प्रतिनिधींची नियुक्ती.
४७. मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती.
४८. मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी याची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे.
४९. मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची कार्ये.
५०. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने मतदान केंद्रावर उपस्थित राहणे आणि त्याने मतदान प्रतिनिधींची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची कामे पार पाडणे.
५१. मतदान प्रतिनिधींची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची अनुपस्थिती.

### प्रकरण तीन

### निवडणुकांमधील सर्वसाधारण कार्यपद्धती

५२. मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू होणे.
५३. लढवलेल्या आणि न लढवलेल्या निवडणुकांबाबतची कार्यपद्धती.
५४. ज्या मतदारसंघातील जागा अनुसूचित जातीसाठी किंवा अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या असतात त्या मतदारसंघातील निवडणुकांबाबत विशेष कार्यपद्धती.
५५. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता राखून न ठेवलेल्या जागा भरण्यास त्या जातीचे किंवा जनजातीचे सदस्य पात्र असणे.
५५क. [निरसित.]

### प्रकरण चार

### मतदान

५६. मतदानासाठी वेळ निश्चित करणे.
५७. आणीबाणीच्या प्रसंगी मतदान तहकूब करणे.
५८. मतपेट्या नष्ट करणे, इत्यादीबाबतीत नव्याने मतदान.
५८क. बूथ ताब्यात घेण्याच्या कारणावरून मतदान तहकूब करणे किंवा निवडणूक प्रत्यादेशित करणे.
५९. निवडणुकीत मतादन करण्याची पद्धती.
६०. विवक्षित व्यक्तिवर्गांनी करावयाच्या मतदानासाठी विशेष प्रक्रिया.
६१. मतदार म्हणून तोतयेगिरी करण्यास आळा घालण्यासाठी विशेष प्रक्रिया.
६१क. निवडणुकीत मतदान यंत्रे.
६२. मतदानाचा अधिकार
६३. [निरसित]

### प्रकरण पाच

### मतमोजणी

६४. मतमोजणी
६४क. मतमोजणीच्या वेळी मतपत्रिका नष्ट होणे, गहाळ होणे इत्यादी.
६५. समसमान मते.
६६. निकाल जाहीर करणे.
६७. निकाल कळवणे.
६७क. उमेदवाराच्या निवडणुकीचा दिनांक.

### प्रकर सहा

### बहुविध निवडणुका

६८. संसदेच्या दोन्ही सभागृहांवर निवड झालेली असताना जागा रिकाम्या करणे.
६९. अगोदरपासून एका सभागृहाचे सदस्य असणाऱ्या व्यक्तींनी संसदेच्या दुसऱ्या सभागृहासाठी निवडून आल्यावर पहिल्या सभागृहातील जागा रिकाम्या करणे.
७०. लोकसभेच्या दोहोंपैकी एका सभागृहातील किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहातील किंवा त्याच्या दोहोंपैकी एका सभागृहातील एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे.

प्रकरण सात

निवडणुकीचे निकाल आणि नामनिर्देशनें प्रकाशित करणे

७१. राज्यसभेच्या निवडणुकांचे निकाल आणि अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे.

७२. [निरसित.]

७३. लोकसभेच्या आणि राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल प्रकाशित करणे.

७३क. विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध.

७३कक. विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध.

७४. राज्य विधानपरिषदांच्या निवडणुकांचे निकाल व अशा परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे.

प्रकरण आठ

निवडणूक खर्च

७६. प्रकरणाची प्रयुक्ती.

७७. निवडणूक खर्चाचा हिशेब आणि त्याची कमाल मर्यादा.

७८. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे हिशेब दाखल करणे.

भाग सहा

निवडणुकीविषयीचे तंटे

प्रकरण एक

निर्वाचन

७९. व्याख्या.

प्रकरण दोन

उच्च न्यायालयाला निवडणूक तक्रारअर्ज सादर करणे

८०. निवडणूक तक्रार अर्ज.

८०क. उच्च न्यायालयाने निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा करणे.

८१. तक्रारअर्ज सादर करणे.

८२. तक्रारअर्जातील पक्षकार.

८३. तक्रारअर्जातील मजकूर.

८४. तक्रारअर्जदाराला मागता येईल असा अनुतोष.

८५. [निरसित.]

प्रकरण तीन

निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा

८६. निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा.

८७. उच्च न्यायालयापुढील कामकाजाची पद्धती.

९३. कागदोपत्री पुरावा.

९४. मतदानाच्या गुप्ततेचा भंग करावयाचा नाही.

९५. गुन्ह्यात गोवणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि दायित्वनिराकरण प्रमाणपत्र.

९६. साक्षीदारांचा खर्च.

९७. जागेबाबत दावा सांगितला असता प्रत्यारोप करणे.

९८. उच्च न्यायालयाचा निर्णय.

९९. उच्च न्यायालयाने द्यावयाचे आदेश.

१००. निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करण्यासाठी लागणारी कारणे.

१०१. निर्वाचित उमेदवारापेक्षा वेगळा उमेदवार निवडून आल्याचे ज्या कारणास्तव घोषित करता येईल ती कारणे.

१०२. मते समसमान झाल्यास त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती.

१०३. उच्च न्यायालयाचे आदेश कळविणे.

१०४. [निरसित.]

१०५. [निरसित.]

१०६. समुचित प्राधिकरणाकडे आदेश पाठवणे आणि त्याचे प्रकाशन करणे.

१०७. उच्च न्यायालयाच्या आदेशांची परिणामकता.

**प्रकरण चार**

**निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे व त्यांचे अवसान**

१०८. [निरसित.]

१०९. निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे.

११०. निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्याची कार्यपद्धती.

१११. तक्रारअर्ज मागे घेतल्याचे वृत्त न्यायालयाने निवडणूक आयोगाला कळविणे.

११२. निवडणूक तक्रारअर्जाचे अवसान.

११६. उत्तरवादीच्या मृत्यूनंतर तक्रारअर्जाचे अवसान होणे किंवा बदली उत्तरवादी येणे.

**प्रकरण चार क**

**अपिले**

११६क. सर्वोच्च न्यायालयाकडे अपिले.

११६ख. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रवर्तनास स्थगिती.

११६ग. अपिलाबाबतची प्रक्रिया.

**प्रकरण पाच**

**खर्च आणि खर्चासाठी तारण**

११७. खर्चासाठी तारण.

११८. उत्तरवादीकडून खर्चासाठी तारण.

११९. खर्च.

१२१. तारण अनामतीतून खर्च देणे आणि अशा अनामती परत करणे.

१२२. खर्च वगैरेसंबंधीच्या आदेशांची अंमलबजावणी.

## भाग सात

**भ्रष्टाचारी प्रथा आणि निवडणूकविषयक अपराध**

**प्रकरण एक**

**भ्रष्टाचारी प्रथा**

१२३. भ्रष्टाचारी प्रथा.

**प्रकरण तीन**

**निवडणूकविषयक अपराध**

१२५. निवडणुकीसंबंधात विविध वर्गांमध्ये वैरभाव वाढीला लावणे.

१२६. निवडणुकीच्या आदल्या दिवशी आणि निवडणुकीच्या दिवशी जाहीर सभा भरवण्यास मनाई.

१२७. निवडणूक सभांमध्ये अडथळा आणणे.

१२७क. पत्रके, भित्तिपत्रके, इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.

१२८. मतदान गुप्त राखणे.

१२९. अधिकारी, इत्यादींनी निवडणुकीच्यावेळी उमेदवारासाठी काम करावयाचे नाही किंवा मतदाना-संबंधात दडपण आणावयाचे नाही.

१३०. मतदान केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई.

१३१. मतदान केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास गैरशिस्त वर्तन केल्याबद्दल शिक्षा.

१३२. मतदान केंद्रांवरील गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

१३२क. मतदानासाठी विहित केलेली प्रक्रिया अनुसरण्यास चुकल्याबद्दल शिक्षा.

१३३. निवडणुकीच्यावेळी वाहने अवैधपणे भाड्याने आणण्याबद्दल किंवा मिळवण्याबद्दल शिक्षा.

१३४. निवडणुकीसंबंधीच्या अधिकृत कर्तव्याचा भंग.

१३४क. शासकीय कर्मचाऱ्याने निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याबद्दल शिक्षा.

१३४ख. शस्त्रे घेऊन मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्राजवळ जाण्यास मनाई.

१३५. मतदान केंद्रावरून मतपत्रिका पळवणे हा गुन्हा होय.

१३५क. बूथ ताब्यात घेण्याचा अपराध.

१३५ख. मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांना भरपगारी सुटी मंजूर करणे.

१३५ग. मतदानाच्या दिवशी मद्य विकणे, देणे किंवा वितरीत करणे यांवर बंदी.

१३६. इतर अपराध आणि त्याबद्दलच्या शिक्षा.

१३७. [निरसित].

१३८. [निरसित].

## भाग आठ

### निरर्हता

१३९. ते १४५. [निरसित].

### प्रकरण चार

### सदस्यांच्या निरर्हतांविषयी करावयाच्या चौकशींच्या संबंधी निवडणूक आयोगाच्या शक्ती

१४६. निवडणूक आयोगाच्या शक्ती.

१४६क. व्यक्तींनी निवडणूक आयोगापुढे दिलेल्या जबान्या.

१४६ख. निवडणूक आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

१४६ग. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

## भाग नऊ

### पोट निवडणुका

१४७. राज्यसभेतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.

१४८. [निरसित].

१४९. लोकसभेत निमित्तवशात् रिक्त होणारी जागा.

१५०. राज्य विधानसभांतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.

१५१. राज्य विधानपरिषदांतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.

१५१क. कलमे १४७, १४९, १५० व १५१ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी वेळेची मर्यादा.

## भाग दहा

### संकीर्ण

१५२. राज्य विधानसभांच्या आणि निर्वाचक गणांच्या सदस्यांची यादी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ठेवावयाची.

१५३. निवडणूक पूर्ण होण्यासाठी नेमलेली मुदत वाढवणे.

१५४. राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधी.
१५५. राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधीचा प्रारंभ.
१५६. राज्य विधानपरिषद सदस्यांचा पदावधी.
१५७. विधानपरिषदेच्या सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ.
१५८. उमेदवाराची अनामत रक्कम परत करणे किंवा ती जप्त करणे.
१५९. प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारीवर्ग निवणूक कार्यासाठी उपलब्ध करून द्यावयाचा.
१६०. निवडणूकीच्या प्रयोजनासाठी जागा, वाहने, इत्यादींचे अधिग्रहण करणे.
१६१. नुकसानभरपाई देणे.
१६२. माहिती मिळवण्याची शक्ती.
१६३. वास्तू इत्यादींमध्ये प्रवेश करण्याची व पाहणी करण्याची शक्ती.
१६४. अधिग्रहण केलेल्या वास्तूमधून काढून लावणे.
१६५. वास्तू अधिग्रहण मुक्त करणे.
१६६. अधिग्रहणाच्या बाबतीत राज्य शासनाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन.
१६७. अधिग्रहणाबाबतच्या कोणत्याही आदेशाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल शिक्षा.
१६८. [निरसित.]

## भाग अकरा

## सर्वसाधारण

१६९. नियम करण्याची शक्ती.
१७०. दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेला आडकाठी.
१७१. [निरसित].

शब्दसूची—
इंग्रजी—मराठी
मराठी—इंग्रजी.

# लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१

**(१९५१ चा अधिनियम क्रमांक ४३)**

(३० मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान)

[१७ जुलै, १९५१]

संसदेची सभागृहे आणि प्रत्येक राज्यातील विधानमंडळाचे सभागृह किंवा सभागृहे यांच्या निवडणुकींचे चालन, त्या सभागृहांच्या सदस्यत्वाबाबतच्या अर्हता आणि निरर्हता, अशा निवडणुकांमधील किंवा त्या संबंधातील भ्रष्टाचार [1]* * व अन्य गुन्हे आणि अशा निवडणुकांमधून किंवा निवडणुकांच्या संबंधाने उपस्थित होणाऱ्या विवाद्य प्रश्नांचा आणि विवादांचा निर्णय याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

तो संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## भाग एक

### प्रारंभिक

१. या अधिनियमास, 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार, अन्यथा आवश्यक नसेल तर,— निर्वचन.

(क) 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याच्या कलम २ मध्ये किंवा कलम २७, पोटकलम (१) मध्ये व्याख्या केलेल्या, पण या अधिनियमात व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांपैकी प्रत्येकाचा अर्थ त्या अधिनियमातील अर्थाप्रमाणे असेल ;

(ख) "समुचित प्राधिकरण" याचा अर्थ, लोकसभेच्या किंवा राज्यसभेच्या [2]* * * निवडणुकीच्या संबंधात केंद्र सरकार आणि एखाद्या राज्याची विधानसभा किंवा विधानपरिषद यांच्या निवडणुकीच्या संबंधात राज्य शासन, असा आहे ;

[3][(खख्) "मुख्य निर्वाचन अधिकारी" याचा अर्थ, 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याच्या कलम १३क खाली नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;]

(ग) "भ्रष्टाचार" याचा अर्थ, कलम १२३ [4]* * * मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणताही भ्रष्टाचार, असा आहे ;

[5][(गग्) "जिल्हा निवडणूक अधिकारी" याचा अर्थ, 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याच्या कलम १३कक खाली पदनिर्देशित किंवा नामनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे ; ]

(घ) "निवडणूक" याचा अर्थ, संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहातील किंवा जम्मू व काश्मीर [6]* * * राज्य खेरीजकरून अन्य एखाद्या राज्याच्या विधानमंडळ सभागृहातील किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहातील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी होणारी निवडणूक, असा आहे;

[7][(ङ) "मतदार" याचा एखाद्या मतदारसंघाच्या संबंधातील अर्थ, ज्या व्यक्तीचे नाव त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये नोंदले गेले असून ती व्यक्ती-'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याच्या कलम १६ मध्ये उल्लेखलेल्या, पैकी कोणत्याही निरर्हतेस पात्र नसेल ती व्यक्ती, असा आहे ; ]

[8][(च) 'राजकीय पक्ष' याचा अर्थ, कलम २९क खाली, राजकीय पक्ष म्हणून निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला भारतीय नागरिकांचा अधिसंघ किंवा निकाय, असा आहे ; ]

(छ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे;

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम २ द्वारे मूळ मजकूर गाळला.
२. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६६ द्वारा विशिष्ट शब्द गाळले.
३. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकूर गाळला.
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १५ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. १९५८ चा अधिनियम ५८, कलम १४ द्वारे मूळ मजकूर गाळला.
७. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे खंड (ङ) ऐवजी दाखल केले.
८. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (च) गाळला व १९८९ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे दाखल केला (१५ जून, १९८९ रोजी व तेव्हापासून).

[1][(ज्) "सार्वजनिक सुटी" याचा अर्थ, 'परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१' (१८८१ चा २६) याच्या कलम २५ च्या प्रयोजनार्थ सार्वजनिक सुटी असणारा कोणताही दिवस, असा आहे;]

[2]* * * * * *

[3]* * * * * *

[4][(झ)] "सही करणे" याचा स्वतःचे नाव लिहू न शकणाऱ्या व्यक्तीच्या संबंधातील अर्थ, विहित करण्यात येईल अशा रीतीने अधिप्रमाणित करणे, असा आहे.

[5]* * * * * *

[6]* * * * * *

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, [7]* * * संसदीय मतदारसंघ, विधानसभा मतदारसंघ, विधानपरिषद मतदारसंघ, स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ, पदवीधर मतदारसंघ आणि शिक्षक मतदारसंघ यांपैकी प्रत्येक मतदारसंघ भिन्न भिन्न वर्गाचा असल्याचे समजले जाईल.

(३) कोणत्याही प्राधिकरणाने काढलेली किंवा दिलेली अधिसूचना, आदेश, नियम, घोषणा, नोटीस किंवा यादी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाली पाहिजे अशा या अधिनियमाखालील कोणत्याही तरतुदींचा अर्थ, या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित करण्यात आले नसेल तर, ती अधिसूचना, आदेश, नियम, घोषणा किंवा यादी—

(क) जेव्हा ती केंद्र सरकार काढलेली किंवा केलेली असेल तेव्हा, ती भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे ;

(ख) जेव्हा ती राज्य शासनाने काढलेली किंवा केलेली असेल तेव्हा, ती राज्य शासनाच्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे ; आणि

(ग) जेव्हा ती अन्य कोणत्याही प्राधिकरणाने काढलेली किंवा केलेली असेल तेव्हा, ती संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही एका सभागृहाच्या निवडणुकीशी किंवा सदस्यत्वाशी संबंधित असल्यास, भारताच्या राजपत्रात [7]* * * आणि ती एखादया राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहाच्या किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीशी किंवा सदस्यत्वाशी संबंधित असल्यास, राज्य शासनाच्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे,

असा अर्थ लावला जाईल.

(४) जेव्हा या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांखाली एखादी गोष्ट विहित करावयाची असेल तेव्हा, वेगवेगळया प्रकरणासाठी किंवा प्रकरण वर्गांसाठी वेगवेगळे उपबंध करता येतील.

[8]* * * * * * *

[9][(५) जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात नसलेल्या कायदयासंबंधी या अधिनियमात जो कोणताही निर्देश असेल त्याचा त्या राज्याच्या संबंधात, त्या राज्यात कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या कायदयाचा निर्देश, असा अर्थ लावण्यात येईल.]

[8]* * * * * * *

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १५ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे खंड (ज्) आणि (झ) वगळण्यात आले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ञ्) याला खंड (ज्) असा नवीन क्रमांक देण्यात आला होता. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे हा खंड गाळला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ट्) व (ठ्) यांना खंड (झ्) आणि (ट्)' असे नवीन क्रमांक दिले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ञ्) समाविष्ट करण्यात आला होता. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे तो गाळला.
६. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १५ द्वारे खंड (ट्) गाळला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
७. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६६ द्वारे विशिष्ट शब्द गाळले.
८. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे पोटकलमे (५) व (७) गाळली आणि पोटकलम (६) ला पोटकलम (५) असा नवीन क्रमांक दिला.
९. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १५ द्वारे पोटकलम (५) ऐवजी दाखल केले.

# भाग दोन

## [1][अर्हता आणि निरर्हता]

### प्रकरण एक

### संसदेच्या सदस्यत्वासाठी अर्हता

[2][३. कोणतीही व्यक्ती, [3]* * * एखाद्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील संसदीय मतदार संघाची ती मतदार असल्याखेरीज, त्या राज्याच्या किंवा त्या राज्यक्षेत्राच्या राज्यसभेतील प्रतिनिधीच्या जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीस अर्ह असणार नाही.] राज्यसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

४. एखादी व्यक्ती— लोकसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

(क) कोणत्याही राज्यातील अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत अनुसूचित जातींपैकी कोणत्याही अनुसूचित जातीतील-मग ती त्या राज्यातील असो किंवा अन्य कोणत्याही राज्यातील असो-व्यक्ती असून, ती एखाद्या संसदीय मतदारसंघाचा मतदार आहे;

(ख) कोणत्याही राज्यात अनुसूचित जनजातींसाठी (आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांतील जनजातीं-व्यतिरिक्त) राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्या राज्यातील किंवा अन्य कोणत्याही राज्यातील (आसामची जनजाती-क्षेत्रे वगळून) अनुसूचित जनजातींपैकी कोणत्याही जनजातीतील व्यक्ती असून ती एखाद्या संसदीय मतदारसंघाचा मतदार आहे ;

(ग) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, ती त्यांपैकी कोणत्याही अनुसूचित जनजातीतील व्यक्ती असून त्या संसदीय मतदारसंघाचा किंवा अशा कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याचा समावेश असणाऱ्या इतर कोणत्याही संसदीय मतदार संघाचा मतदार आहे; [4]* * * *

[5][(गग) [6][लखदीव] बेटे या संघ राज्यक्षेत्रातील अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्यांपैकी एखाद्या अनुसूचित जनजातीतील व्यक्ती असून त्या संघ राज्यक्षेत्राच्या संसदीय मतदारसंघाचा मतदार आहे ; [7]* * *]

[8][(गगग) सिक्कीम राज्याला वाटून दिलेल्या जागेच्या बाबतीत, ती सिक्कीमच्या संसदीय मतदारसंघाचा मतदार आहे;]

(घ) अन्य कोणत्याही जागेच्या बाबतीत, एखाद्या संसदीय मतदारसंघाचा मतदार आहे,— असे झाल्याशिवाय, लोकसभेतील [9]* * * * एखाद्या जागेच्या निवडणुकीस ती अर्ह असणार नाही.

### प्रकरण दोन

### राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्हता

५. एखादी व्यक्ती— विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

(क) राज्याच्या अनुसूचित जातींसाठी किंवा अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्या जातींपैकी किंवा त्या जनजातींपैकी कोणत्याही जातीतील किंवा, प्रकरण-परत्वे, जनजातीतील व्यक्ती असून ती त्या राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाचा मतदार आहे;

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १६ द्वारे पूर्वीच्या शीर्षकाऐवजी समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६, द्वारे कलम ३ ऐवजी समाविष्ट केले.
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १७ द्वारे मूळ मजकूर गाळला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे "आणि" हा शब्द गाळला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
५. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. लखदीव, मिनिकॉय व अभिनदिवी बेटे (नामांतर) विधि अनुकूलन आदेश १९७४ द्वारे दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).
७. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूचीद्वारे "आणि" हा शब्द गाळला (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).
८. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).
९. १९७५ चा अधिनियम २९, कलम १२ द्वारे मूळ मजकूर गाळला (१५ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).

(ख) [1]*** आसाम, या स्वायत्त जिल्ह्यासाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत ती, [1][कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातीतील व्यक्ती] असून त्या जिल्ह्याकरिता अशी एखादी किंवा इतर कोणतीही जागा ज्या विधानसभा मतदारसंघात राखून ठेवण्यात आली असेल त्या मतदारसंघाचा मतदार आहे; आणि

(ग) अन्य कोणत्याही जागेच्या बाबतीत, त्या राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदार संघाचा मतदार आहे,

असे असल्याशिवाय ती त्या राज्याच्या विधानसभेतील जागा भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीस अर्ह ठरणार नाही :

[३][परंतु, अनुच्छेद ३७१ क च्या खंड (२) मध्ये निर्देशिलेल्या कालावधीसाठी, एखादी व्यक्ती त्या अनुच्छेदामध्ये निर्देशिलेल्या प्रादेशिक परिषदेचा सदस्य नसेल तर, नागालँडच्या विधानसभेतील ट्यूएनसंग जिल्ह्याच्या वाट्याला नेमून दिलेली कोणतीही जागा भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीस ती अर्ह ठरणार नाही.]

[४][सिक्कीम विधानसभेच्या सदस्यत्वाकरिता अर्हता.

५क. [५][(१)] कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सिक्कीमच्या (संविधानानुसार रीतसर घटित झालेली त्या राज्याची विधानसभा असल्याचे मानण्यात येणाऱ्या) विधानसभेतील जागा भरावयाची असल्यास, एखादी व्यक्ती,—

(क) भुतिया-लेपचा कुळातील सिक्कीमींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, ती व्यक्ती एकतर भुतिया किंवा लेपचा कुळातील आहे आणि संघाकरिता राखून ठेवलेल्या मतदारसंघाव्यतिरिक्त राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाकरता मतदार आहे;

(ख) नेपाळी कुळातील सिक्कीमींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, ती व्यक्ती नेपाळी कुळातील आहे आणि राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाकरता मतदार आहे;

(ग) अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, ती व्यक्ती 'सिक्कीम प्रजाजन प्रतिनिधित्व अधिनियम, १९७४' यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही जातीची आहे आणि राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाकरता मतदार आहे; आणि

(घ) संघाकरिता राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, ती व्यक्ती संघ मतदारसंघाकरता मतदार आहे,

असे असल्याशिवाय ती जागा भरण्यासाठी निवडली जाण्यास अर्ह होणार नाही].

[५][(२) कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९८०' याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी सिक्कीम राज्यात घटित करण्यात यावयाच्या विधानसभेतील जागा भरावयाची असल्यास, एखादी व्यक्ती—

(क) भुतिया व लेपचा कुळातील सिक्कीमी व्यक्तीकरता राखून ठेवण्यात आलेल्या जागेच्या बाबतीत, भुतिया किंवा लेपचा कुळातील आहे आणि संघाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या मतदारसंघाखेरीज राज्यातील इतर कोणत्याही विधानसभा मतदारसंघाचा मतदार आहे;

(ख) अनुसूचित जातींकरता राखून ठेवण्यात आलेल्या जागेच्या बाबतीत, सिक्कीम राज्यातील अशा कोणत्याही अनुसूचित जातींपैकी आहे आणि राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाचा मतदार आहे;

(ग) संघाकरता राखून ठेवण्यात आलेल्या जागेच्या बाबतीत, संघ मतदारसंघातील मतदार आहे; आणि

(घ) इतर कोणत्याही जागेच्या बाबतीत, राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघातील मतदार आहे,

असे असल्याखेरीज, ती अर्ह ठरणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात, "भुतिया" या शब्दात चुंबिपा, डोपथापा, डुक्पा, गॅंगेटी, शेर्पा, तिबेटी, ट्रोमोपा व योल्मो यांचा समावेश आहे.]

विधानपरिषदेच्या सदस्यत्वासाठी अर्हता.

६. (१) एखादी व्यक्ती राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाचा मतदार नसेल तर, त्या राज्याच्या विधानपरिषदेतील जी जागा निवडणुकीद्वारे भरावयाची ती भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीस निवड केली जाण्यास ती अर्ह ठरणार नाही.

---

१. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) (संघ सूचीतील विषयांवरील कायद्यांचे) अनुकूलन आदेश, १९७४', द्वारे विशिष्ट शब्द गाळले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९६२ चा अधिनियम २७, कलम ११ द्वारे समाविष्ट केले.

४. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

५. १९८० चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे कलम ५क याला त्याचे पोटकलम '(१)' असा क्रमांक देऊन नवीन पोटकलम (२) समाविष्ट केले (१ सप्टेंबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(२) एखादी व्यक्ती राज्यातील सामान्यपणे रहिवाशी नसेल तर, राज्याच्या विधानपरिषदेतील जी जागा राज्यपालाने [1]* * * नामनियुक्त करून भरावयाची ती भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीस ती अर्ह ठरणार नाही.

## [2][प्रकरण तीन

### संसदेच्या आणि राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हता.

७. या प्रकरणामध्ये— व्याख्या.

(क) "समुचित शासन" याचा अर्थ, संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्याच्या निवडणुकीबाबतच्या किंवा त्या सदस्यत्वाबाबतच्या कोणत्याही निरर्हतेच्या संबंधात केंद्र सरकार, आणि एखाद्या राज्याची विधानसभा किंवा विधानपरिषद यांच्या सदस्यांच्या निवडणुकीबाबतच्या कोणत्याही निरर्हतेच्या संबंधात राज्य शासन, असा आहे;

(ख) "निरर्ह" याचा अर्थ, संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या अथवा राज्याच्या विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या सदस्याच्या जागेच्या निवडणुकीबाबत किंवा त्या सदस्यत्वाबाबत निरर्हता, असा आहे.

८. [3][(१) (क) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १५३ क (धर्म, वंश, जन्मस्थान, वसतिस्थान, भाषा इ. कारणांवरून वेगवेगळ्या गटांमध्ये शत्रुत्व निर्माण करण्याचा आणि एकोप्याला बाधक कृती करण्याचा अपराध) किंवा १७१ ङ (लाच घेण्याचा अपराध) किंवा कलम १७१च (निवडणुकीत गैरवाजवी दडपण आणण्याचा किंवा तोतयेगिरी करण्याचा अपराध) किंवा कलम १७६ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) किंवा कलम ३७६क किंवा कलम ३७६ख किंवा कलम ३७६ग किंवा कलम ३७६घ (बलात्कारासंबंधीचा अपराध) किंवा कलम ४९८ क (पतीकडून किंवा पतीच्या नातेवाईकांकडून स्त्रीला निर्दयतेची वागणूक देण्याचा अपराध) किंवा कलम ५०५ पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) (वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व, द्वेष किंवा द्वेषभावना निर्माण करणारी किंवा वाढवणारी विधाने करण्याचा अपराध किंवा कोणत्याही उपासनास्थानांमध्ये किंवा धार्मिक उपासना किंवा धार्मिक विधी करीत असलेल्या कोणत्याही जनसमुदायामध्ये अशी विधाने करण्याशी संबंधित अपराध); किंवा; विवक्षित अपराधाबद्दल दोषसिद्धी झाल्यामुळे निरर्हता.

(ख) "अस्पृश्यता" याचा प्रचार करणे आणि ती पाळणे याकरता शिक्षा देण्यासाठी आणि त्यापासून उद्भवणाऱ्या कोणत्याही निःसमर्थतेसाठी शिक्षा देण्यासाठी ज्यामध्ये तरतूद करण्यात आली असा नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ (१९५५ चा २२); किंवा

(ग) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याचे कलम ११ (मना करण्यात आलेल्या मालाची निर्यात किंवा आयात करण्याचा अपराध); किंवा

(घ) बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ (१९६७ चा ३७) याची कलमे १० ते १२ (बेकायदेशीर म्हणून जाहीर केलेल्याअधिसंघाचा सदस्य असण्याचा अपराध, बेकायदेशीर अधिसंघाच्या निधीचा व्यवहार करण्यासंबंधातील अपराध किंवा अधिसूचित ठिकाणांच्या बाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करण्याशी संबंधित अपराध); किंवा

(ङ) परकीय चलन (विनियमन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४७); किंवा

(च) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१); किंवा

(छ) दहशतवादी आणि विघटनवादी कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २८), याचे कलम ३ (दहशतवादी कृत्ये करण्याचा अपराध) किंवा कलम४ (विध्वंसक कृत्ये करण्याचा अपराध); किंवा

(ज) धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अधिनियम, १९८८ (१९८८ चा ४१) याचे कलम ७ (कलमे ३ ते ७ यांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करण्याचा अपराध); किंवा

(झ) या अधिनियमाच्या कलम १२५ (निवडणुकांच्या संबंधात वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व वाढवण्याचा अपराध) किंवा कलम १३५ (मतदान केंद्रातून मतपत्रिका पळवून नेण्याचा अपराध) किंवा कलम १३५क (बुथ ताब्यात घेण्याचा अपराध) किंवा कलम १३६ पोट कलम (२) खंड (क) (कोणतेही नामनिर्देशन पत्र कपटाने विरूपित करण्याचा किंवा ते कपटाने नष्ट करण्याचा अपराध), [4][किंवा].

---

१. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६, द्वारे मूळ मजकूर गाळला.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २० द्वारे मूळ प्रकरण तीन याऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून); १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६६ द्वारे पूर्वीची कलमे १० व ११ निरसित केली होती.

३. १९८९ चा अधिनियम १, कलम ४ द्वारे पोटकलम (१) व (२) ऐवजी दाखल केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९९१ चा अधिनियम ४२, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (१४ सप्टेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

[१][(ब्) उपासनास्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१ याचे कलम ६ (उपासनास्थानांचे रूपांतरण करण्याचा अपराध) [२][किंवा]

[३][(ट) राष्ट्रप्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ याचे कलम २ (भारतीय राष्ट्रध्वज व भारताचे संविधान यांचा अवमान करण्याचा अपराध) किंवा कलम ३ (भारतीय राष्ट्रगीत गाण्यास प्रतिबंध करण्याचा अपराध)];

याखालील दंडनीय अपराधांबद्दल दोषसिद्धी झालेली व्यक्ती, अशा दोषसिद्धीच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीपर्यंत निरर्ह होईल.]

(२) (क्) साठेबाजीस किंवा नफेबाजीस प्रतिबंध करण्याबाबत उपबंध करणाऱ्या कोणत्याही कायद्याचे; किंवा

(ख्) अन्न किंवा औषधभेसळ यांच्या संबंधातील कोणत्याही कायद्याचे; किंवा

(ग्) हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१ (१९६१ चा २८) याच्या कोणत्याही उपबंधाचे; किंवा

(घ्) सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८८ चा ३) याच्या कोणत्याही उपबंधाचे;

व्यतिक्रमण केल्याबद्दल दोषसिद्धी झालेली आणि सहा महिन्यांहून कमी नसेल एवढी कारावासाची शिक्षा झालेली व्यक्ती अशा दोषसिद्धीच्या दिनांकापासून निरर्ह होईल आणि तिची मुक्तता झाल्यापासून आणखी सहा वर्षे इतका काळ ती तशीच निरर्ह राहील.

(३) कोणत्याही अपराधाबद्दल [पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही अपराधाहून अन्य अपराध] दोषसिद्धी झालेली आणि दोन वर्षांहून कमी नसेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा झालेली व्यक्ती, अशा दोषसिद्धीच्या दिनांकापासून निरर्ह होईल आणि तिची मुक्तता झाल्यापासून आणखी सहा वर्षे इतका काळ ती तशीच निरर्ह राहील.]

[४][(४)] [५][पोटकलम (१), पोटकलम (२) आणि पोटकलम (३)] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दोषसिद्धीच्या दिनांकाला संसदेचा किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य असणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, दोहोंपैकी, कोणत्याही पोटकलमाखालील निरर्हता, त्या दिनांकापासून तीन महिन्याचा अवधी जाईपर्यंत किंवा त्या अवधीत दोषसिद्धीविरुद्ध किंवा शिक्षेविरुद्ध अपील किंवा पुनरीक्षणार्थ अर्ज आला असेल तर, न्यायालय ते अपील किंवा अर्ज निकालात काढीपर्यंत परिणामक होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये,—

(क्) "साठेबाजीस व नफेबाजीस प्रतिबंध करण्याबाबत उपबंध करणारा कायदा" याचा अर्थ,—

(एक) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या उत्पादनाचे किंवा निर्मितीचे नियमन ;

(दोन) कोणतीही अत्यावश्यक वस्तू ज्या किंमतीला विकत घेता येईल किंवा विकता येईल त्या किंमतीचे नियंत्रण;

(तीन) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचे संपादन, कब्जा, साठवण, परिवहन, वितरण, विल्हेवाट, वापर किंवा उपभोग यांचे नियमन ;

(चार) सर्वसाधारणपणे विक्रीसाठी ठेवल्या जाणाऱ्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची विक्री रोखून ठेवण्यास प्रतिबंध,

याच्यासाठी उपबंध करणारा कोणताही कायदा किंवा कायद्याचे बळ असलेला कोणताही आदेश, नियम अथवा अधिसूचना असा आहे ;

(ख्) "औषधिद्रव्य" यास 'औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४०' (१९४० चा २३) यामध्ये दिलेला अर्थच येथेही आहे ;

(ग्) "अत्यावश्यक वस्तू" यास 'अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५' (१९५५ चा १०) यामध्ये दिलेला अर्थच येथेही आहे.

(घ्) "अन्न" यास 'अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४' (१९५४ चा ३७) यामध्ये दिलेला अर्थच येथेही आहे.

भ्रष्टाचाराच्या कारणावरून निरर्हता.

[६][८क. (१) कलम ९९ खालील आदेशाद्वारे भ्रष्टाचाराबद्दल दोषी ठरलेल्या प्रत्येक व्यक्तीचे प्रकरण, यासंबंधात केंद्र सरकार विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाला, असा आदेश अमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, अशी व्यक्ती निरर्ह ठरते किंवा कसे आणि ठरल्यास किती कालावधीपर्यंत याबाबतच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपतींकडे सादर करावे लागेल.

१. १९९१ चा अधिनियम ४२, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (१८ सप्टेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).
२. १९९६ चा अधिनियम २१, कलम ३ (क्) द्वारे जादा दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख्) द्वारे समाविष्ट केले. (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
४. १९८९ चा अधिनियम, १ कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (३) ला पोटकलम (४) असा नवीन क्रमांक दिला (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
५. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "पोटकलम (१) आणि पोटकलम (२)" या ऐवजी समाविष्ट केले. (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
६. १९७५ चा अधिनियम ४० कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

परंतु, या पोटकलमान्वये कोणतीही व्यक्ती ज्या कालावधीपर्यंत निरर्ह ठरवण्यात येईल तो कालावधी काही झाले तरी, त्याच्या संबंधात कलम ९९ खाली काढण्यात आलेला आदेश ज्या दिनांकी अंमलात येईल त्या दिनांकापासून सहा वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) 'निवडणूक कायदे (विशोधन) अधिनियम, १९७५' याच्या प्रारंभीच्या लगतपूर्वी जसे होते तसे या अधिनियमाचे कलम ८क अन्वये जी व्यक्ती निरर्ह ठरली असेल अशी कोणतीही व्यक्ती, जर असा निरर्हतेचा कालावधी संपलेला नसेल तर, उक्त कालावधीपैकी उर्वरित कालावधीकरिता अशी निरर्हता दूर करण्यासाठी राष्ट्रपतीकडे विनंतीअर्ज सादर करू शकेल.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही प्रश्नावर किंवा पोटकलम (२) खाली सादर केलेल्या कोणत्याही विनंतीअर्जावर आपला निर्णय देण्यापूर्वी, राष्ट्रपती, निवडणूक आयोगाचा सल्ला घेईल आणि निवडणूक आयोगाला ह्याकरिता स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल.]

**भ्रष्टाचार किंवा राजद्रोह यामुळे बडतर्फ झाल्याबद्दल निरर्हता.**

९. (१) एखाद्या व्यक्तीने भारत सरकारच्या अखत्यारातील किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या अखत्यारातील पद धारण केलेले असताना भ्रष्टाचार किंवा राजद्रोह केल्याबद्दल तिला बडतर्फ करण्यात आले असेल अशी व्यक्ती अशा बडतर्फीच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका काळ निरर्ह ठरेल.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीने भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या अखत्यारातील पद धारण केलेले असताना, तिला भ्रष्टाचाराबद्दल किंवा राज्याशी बेईमानी केल्याबद्दल बडतर्फ करण्यात आले आहे किंवा करण्यात आलेले नाही अशा अर्थाचे निवडणूक आयोगाने दिलेले प्रमाणपत्र, त्या तथ्याचा निर्णायक पुरावा असेल :

परंतु, भ्रष्टाचार किंवा राज्याशी बेईमानी केल्याबद्दल तिला बडतर्फ करण्यात आले आहे, अशा अर्थाचे प्रमाणपत्र उक्त व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय दिले जाणार नाही.

**शासकीय कंत्राटे, इत्यादींबद्दल निरर्हता.**

९क. समुचित शासनाबरोबर एखाद्या व्यक्तीने, त्या शासनाला मालाचा पुरवठा करण्यासाठी किंवा त्या शासनाने हाती घेतलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी ती व्यक्ती आपल्या व्यापाराच्या किंवा धंद्याच्या ओघात तिने केलेले कंत्राट अस्तित्वात असल्यास व असेपर्यंत, निरर्ह असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, समुचित शासनाबरोबर ज्या व्यक्तीने कंत्राट केले त्या व्यक्तीने त्या कंत्राटाचे पूर्णपणे पालन केलेले असेल तेव्हा, शासनाने त्याच्या पक्षी कंत्राटाचे पूर्णपणे किंवा अंशतः पालन केलेले नाही एवढ्याच गोष्टीमुळे ते कंत्राट अस्तित्वात नाही असे मानले जाईल.

**सरकारी कंपनीतील पदामुळे निरर्हता.**

१०. एखादी व्यक्ती, जिच्या भांडवलातील समुचित शासनाचा हिस्सा पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल अशा कोणत्याही कंपनीमध्ये किंवा अशा निगमामध्ये (सहकारी संस्थेव्यतिरिक्त) व्यवस्थापकीय एजंट, व्यवस्थापक किंवा सचिव असेल तर आणि असेतोपर्यंत ती व्यक्ती निरर्ह असेल.

**निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केल्याबद्दल निरर्हता.**

१०क. एखाद्या व्यक्तीने—

(क) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली आवश्यक असलेल्या मुदतीत आणि तशा पद्धतीने निवडणूक खर्चाचे हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीबद्दल सबळ कारण किंवा समर्थन नाही, अशी जर निवडणूक आयोगाची खात्री झाली तर, निवडणूक आयोग, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ती व्यक्ती निरर्ह असल्याचे जाहीर करील आणि अशी कोणतीही व्यक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत निरर्ह ठरेल.

**निरर्हता दूर करणे किंवा तिचा कालावधी कमी करणे.**

११. निवडणूक आयोगाला कारणे नमूद करून [1][(कलम ८ क अन्वये असेल त्याखेरीज)] या प्रकरणाखालील कोणतीही निरर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही निरर्हतेचा कालावधी कमी करता येईल.

## प्रकरण चार

## मतदानाबाबतच्या निरर्हता

**दोषसिद्धी आणि भ्रष्टाचार यांतून उद्भवणारी निरर्हता.**

११क. [2][(१)] जर कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर—

[3]*** "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) कलम १७१ ङ किंवा कलम १७१ च याखाली किंवा या अधिनियमाचे कलम १२५ किंवा कलम १३५ किंवा कलम १३६ चे पोटकलम

---

१. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे नवीन क्रमांक दिला.

३. १९७८ चा अधिनियम ३८, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे "(क)" हा मजकूर गाळण्यात आला.

(२) खंड (क) खाली दंडनीय अपराधाबद्दल दोषी ठरली असेल तर, [१]***

[२]* * * * * * *

ती व्यक्ती दोषसिद्धीच्या दिनांकापासून किंवा आदेश अंमलात येईल त्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीपर्यंत कोणत्याही निवडणुकीमध्ये मतदान करण्यास निरर्ह ठरेल.

[३][(२) कलम ८ क च्या पोटकलम (१) अन्वये राष्ट्रपतीच्या निर्णयानुसार कोणत्याही कालावधीसाठी निरर्ह झालेली कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीत त्या कालावधीमध्ये मतदान करण्यासाठी निरर्ह होईल.

(३) कोणतीही व्यक्ती संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य किंवा राज्याच्या विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास आणि सदस्य म्हणून राहण्यास कोणत्याही प्रकारे निरर्ह झाली असता त्या बाबतीत तिने कलम ८क च्या पोटकलम (२) अन्वये सादर केलेल्या विनंती-अर्जावरील राष्ट्रपतीचा निर्णय हा जणू काही निवडणूक कायदे (विशोधन) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जसा होता तसा या अधिनियमाच्या कलम ११ क च्या पोटकलम (१) खंड (ख) याअन्वये त्या व्यक्तीला निवडणुकीत मतदान करण्यासंबंधी प्राप्त झालेल्या निरर्हतेच्या संबंधातील निर्णय असावा त्याप्रमाणे तो निर्णय उक्त निरर्हतेस, शक्य तेथवर, लागू होईल.]

निरर्हता दूर करणे. **११ख.** निवडणूक आयोगाला, कारण नमूद करून [४][कलम ११ क च्या पोटकलम (१) खालील कोणतीही निरर्हता] दूर करता येईल.

[५][भाग तीन

## सार्वत्रिक निवडणुकांबाबत अधिसूचना

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकांबाबत अधिसूचना. **१२.** राज्यसभेतील जे सदस्य त्यांचा पदावधी समाप्त होताच निवृत्त होतात, त्या सदस्यांच्या जागा भरण्याच्या प्रयोजनार्थ, राष्ट्रपती, निवडणूक आयोगाकडून शिफारस करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकांना, भारताच्या राजपत्रात एक किंवा अधिक अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे, या अधिनियमाच्या आणि त्याखाली काढलेल्या नियमांच्या व आदेशांच्या उपबंधानुसार सदस्य निवडून देण्यासाठी प्रत्येक संबंधित राज्याच्या विधानसभेवर निवडून आलेल्या सदस्यांना किंवा, प्रकरणपरत्वे, निर्वाचक गणाच्या सदस्यांना पाचारण करील :

परंतु, या कलमाखालील कोणतीही अधिसूचना, निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होणार त्या दिनांकापूर्वीच्या तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ अगोदर काढली जाणार नाही.

राज्यसभेमध्ये सिक्कीम राज्याला वाटून दिलेली जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुकीची अधिसूचना. [६][**१२क.** 'संविधान (छत्तिसावे विशोधन) अधिनियम, १९७५' याद्वारे सिक्कीम राज्याला राज्यसभेमध्ये वाटून दिलेली जागा पहिल्यांदा भरण्याच्या प्रयोजनार्थ, राष्ट्रपती, भारताचे राजपत्र यात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, निवडणूक आयोग शिफारस करील त्या दिनांकाला, सिक्कीम राज्याच्या विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांना, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या आणि आदेशांच्या उपबंधानुसार सदस्य निवडण्यासाठी आवाहन करील आणि अशा रीतीने घेतलेली निवडणूक ही सर्व प्रयोजनार्थ आणि वस्तुतः कलम १२ अन्वये घेण्यात आलेली असल्याचे मानले जाईल.]

**१३.** (विवक्षित संघ राज्यक्षेत्रांकरिता निर्वाचकगण पुनर्घटित करण्याकरिता अधिसूचना.) 'क्षेत्रीय परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०३) कलम ६६ द्वारे निरसित.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत अधिसूचना. **१४.** (१) विद्यमान लोकसभेचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा तिचे विसर्जन झाल्यावर नवीन लोकसभा घटित करण्याच्या प्रयोजनार्थ, सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल.

---

१. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे "किंवा" हा मजकूर गाळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे खंड (ख) गाळला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

५. १९५६ चा अधिनियम २७, कलम ७ द्वारे भाग तीन (कलमे १२ ते १८) याऐवजी दाखल केले.

६. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

(२) उक्त प्रयोजनार्थ, राष्ट्रपती निवडणूक आयोगाकडून शिफारस करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकांना भारताच्या राजपत्रात एक किंवा अधिक अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे, या अधिनियमाच्या आणि त्याखाली काढलेल्या नियमांच्या व आदेशांच्या उपबंधानुसार सदस्यांना निवडून देण्यासाठी सर्व संसदीय मतदारसंघांना पाचारण करील :

परंतु, जेव्हा, विद्यमान लोकसभेच्या विसर्जनाव्यतिरिक्त अन्य कारणाने अशी सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल तेव्हा, अनुच्छेद ८३ च्या खंड (२) मधील उपबंधाखाली अशी कोणतीही अधिसूचना, त्या सभेचा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी सहा महिन्यांच्या आधी केव्हाही काढली जाणार नाही.

¹[१४क. संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च च्या खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे लोकसभेवर सिक्कीम राज्याचा प्रतिनिधी निवडण्याच्या प्रयोजनार्थ, निवडणूक आयोग, राज्यसभा सदस्यांच्या निवडणुकीकरिता लागू असतील असे या अधिनियमांचे उपबंध आणि त्याखाली करण्यात आलेले नियम व आदेश यानुसार प्रतिनिधी निवडण्याकरिता सिक्कीम राज्याच्या विधानसभा सदस्यांना आवाहन करील.] **विद्यमान लोकसभेवर सिक्कीम राज्याचा प्रतिनिधी निवडण्याकरिता अधिसूचना.**

**१५.** (१) विद्यमान विधानसभेचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा ती विसर्जित झाल्यावर, नवीन विधानसभा घटित करण्याच्या प्रयोजनार्थ, सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल. **राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकींबाबत अधिसूचना.**

(२) उक्त प्रयोजनार्थ, ²[राज्यपाल किंवा, प्रकरणपरत्वे, प्रशासक,] ³ * * * निवडणूक आयोगाकडून शिफारस करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकांना, राज्याच्या **शासकीय राजपत्रात** एक किंवा अनेक अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे, या अधिनियमाच्या आणि त्याखाली काढलेल्या नियमांच्या व आदेशांच्या उपबंधानुसार सदस्यांना निवडून देण्यासाठी राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांना पाचारण करील :

परंतु, जेव्हा विद्यमान विधानसभेच्या विसर्जनाव्यतिरिक्त अन्य कारणाने सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल तेव्हा, ज्या दिनांकाला, अनुच्छेद १७२ च्या ³* * * खंड (१) मधील ⁴[किंवा, प्रकरणपरत्वे, 'संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) याच्या कलम ५] मधील उपबंधाच्या अधीनतेने, विधानसभेचा कालावधी समाप्त व्हावयाचा होता, त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांच्या अगोदर अशी कोणतीही अधिसूचना काढली जाणार नाही.

⁵[**१५क.** 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) खाली मध्य प्रदेश राज्याची विधानपरिषद घटित करण्यासाठी आणि 'विधानपरिषद अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३७) खाली आंध्र प्रदेश राज्याची विधानपरिषद घटित करण्यासाठी, पूर्वोक्त राज्यांपैकी प्रत्येक राज्याचा राज्यपाल निवडणूक आयोगाकडून शिफारस करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकांना राज्याच्या **शासकीय राजपत्रात** एक किंवा अनेक अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे, या अधिनियमाच्या आणि त्याखाली काढलेल्या नियमांच्या व आदेशांच्या उपबंधांनुसार सदस्यांना निवडून देण्यासाठी राज्याच्या विधानसभा सदस्यांना आणि सर्व विधानपरिषद मतदारसंघांना पाचारण करील.] **विधानपरिषदेच्या विशिष्ट निवडणुकींबाबत अधिसूचना.**

**१६.** राज्य विधानपरिषदेतील, जे सदस्य त्यांचा पदावधी समाप्त होताच निवृत्त होतात त्या सदस्यांच्या जागा भरण्याच्या प्रयोजनार्थ, राज्यपाल, ⁶* * * निवडणूक आयोगाकडून शिफारस करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकांना राज्याच्या **शासकीय राजपत्रात** एक किंवा अनेक अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे या अधिनियमाच्या आणि त्याखाली काढलेल्या नियमांच्या व आदेशांच्या उपबंधानुसार सदस्यांना निवडून देण्यासाठी, राज्य विधानसभा सदस्यांना आणि सर्व संबंधित विधानपरिषद मतदारसंघांना पाचारण करील : **राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीबाबत अधिसूचना.**

परंतु, या कलमाखालील कोणतीही अधिसूचना निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकाला समाप्त होणार, त्या दिनांकापूर्वीच्या तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ अगोदर काढली जाणार नाही.

## भाग चार

### निवडणूक चालनासाठी प्रशासकीय यंत्रणा

**१९.** या भागामध्ये आणि पाचव्या भागामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, "मतदारसंघ" याचा अर्थ, ⁶* * * संसदीय मतदारसंघ किंवा विधानसभा मतदारसंघ किंवा विधानपरिषद-मतदारसंघ, असा आहे. **व्याख्या.**

१. १९७६ चा अधिनियम १७, कलम २ व अनुसूची द्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).
२. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.
३. विधि अनुकूलन (क्र. २), आदेश १९५६, द्वारे विशिष्ट शब्द गाळले.
४. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन द्वारे समाविष्ट केले.
५. १९५७ चा अधिनियम ३७, कलम १३ द्वारे समाविष्ट केले.
६. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६६ द्वारे विशिष्ट शब्द गाळले.

निवडणूक आयोगाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन.

[1][१९क. संविधान, 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) आणि हा अधिनियम, याखालील किंवा त्याअन्वये केलेले नियम यांच्याखालील निवडणूक आयोगाचे कार्याधिकार, निवडणूक आयोगाने या संबंधात काही सर्वसाधारण किंवा विशेष निदेश दिले असल्यास, त्यांच्या अधीनतेने निवडणूक उप आयुक्ताला किंवा निवडणूक आयोगाच्या सचिवालाही बजावता येतील.]

मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये.

[2][२०. निवडणूक आयोगाचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण यांच्या अधीनतेने, प्रत्येक राज्याचा मुख्य निर्वाचन अधिकारी या अधिनियमाखाली राज्यातील सर्व निवडणुकांच्या चालनावर देखरेख करील.

[3][जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये.

२०क. (१) मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण यांच्या अधीनतेने जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्ह्यातील किंवा त्याच्या अधिकारितेतील संसदीय आणि राज्य विधानमंडळाच्या सर्व निवडणुकांच्या चालनासंबंधीच्या संपूर्ण कामाचे समन्वयन करील व त्यावर देखरेख करील.

(२) जिल्हा निवडणूक अधिकारी हा, निवडणूक आयोग व मुख्य निर्वाचन अधिकारी यांच्याकडून त्याच्यावर सोपविण्यात येतील अशी अन्य कार्येही पार पाडील.]

अभीक्षक.

[4][२०ख. (१) निवडणूक आयोग, एखाद्या मतदारसंघामधील किंवा मतदारसंघांच्या गटामधील निवडणूक किंवा निवडणुका पार पाडण्याच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी आणि निवडणूक आयोग त्याच्याकडे सोपवील अशी अन्य कामे पार पाडण्यासाठी एखाद्या शासकीय अधिकाऱ्याचे अभीक्षक म्हणून नामनिर्देशन करील.

(२) पोटकलम (१) अन्वये नामनिर्देशित केलेल्या अभीक्षकाला, त्याला ज्या मतदारसंघासाठी नामनिर्देशित केले असेल त्या मतदारसंघाच्या किंवा मतदारसंघामधील कोणत्याही मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला, निकाल घोषित करण्यापूर्वी कोणत्याही वेळी मतमोजणी थांबविण्याचा किंवा अनेक मतदान केंद्रे किंवा मतदानासाठी किंवा मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागा ताब्यात घेतल्या असल्याबद्दल किंवा मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या जागी वापरण्यात आलेली कोणतीही मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या अभिरक्षेतून बेकायदेशीररीत्या ताब्यात घेण्यात आल्याबद्दल किंवा त्या मतदान केंद्रावरील किंवा जागेवरील मतदानाचा निर्णय निश्चित करता येणार नाही इतक्या प्रमाणात ती मतपत्रिका अनवधानाने किंवा हेतुपुरस्सर नष्ट करण्यात किंवा गहाळ करण्यात किंवा खराब करण्यात किंवा विरुप करण्यात आल्याबद्दल अभीक्षकांची खात्री झाल्यास, तेथील निवडणुकीचा निकाल जाहीर न करण्याचा निदेश देता येईल.

(३) जेव्हा अभीक्षकाने या कलमान्वये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतमोजणी थांबवण्याचा किंवा निकाल जाहीर न करण्याचा निदेश दिला असेल तेव्हा, अभीक्षक ती बाब तावडतोब निवडणूक आयोगाला कळवील आणि त्यानंतर निवडणूक आयोग सर्व महत्त्वाची परिस्थिती लक्षात घेतल्यावर, कलम ५८क किंवा कलम ६४क किंवा कलम ६६ अन्वये योग्य ते निदेश देईल.

**स्पष्टीकरण.**—पोटकलम (२) आणि पोटकलम (३) यांच्या प्रयोजनार्थ, "अभीक्षक" यात प्रादेशिक आयुक्ताचा किंवा निवडणूक आयोगाच्या ज्या अधिकाऱ्याकडे या कलमान्वये एखाद्या मतदारसंघातील किंवा मतदारसंघाच्या गटातील निवडणूक किंवा निवडणुका पार पाडण्याच्या कामावर लक्ष ठेवण्याचे काम आयोगाद्वारे सोपवण्यात आले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश आहे.]

निवडणूक निर्णय अधिकारी.

**२१.** प्रत्येक मतदारसंघाच्या बाबतीत, राज्यसभेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीसाठी आणि राज्याच्या विधानपरिषदेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी राज्य विधानसभेच्या सदस्यांकडून होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीसाठी, निवडणूक आयोग, त्या राज्याच्या शासनाशी विचारविनिमय करून, एकेक निवडणूक निर्णय अधिकारी पदनिर्देशित किंवा नामनियुक्त करील असा अधिकारी हा [5][शासनाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी] असेल :

परंतु, या कलमातील कशामुळेही निवडणूक आयोगाला एकाच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे एकापेक्षा अधिक मतदारसंघांसाठी पदनिर्देशन किंवा नामनियुक्ती करण्यास प्रतिबंध होणार नाही.]

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी.

**२२.** (१) निवडणूक आयोग, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्याची कार्ये पार पाडण्यात सहाय्य करण्यासाठी एका किंवा अधिक सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २१ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ९ द्वारे कलमे २० व २१ याऐवजी दाखल केले.
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २२ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. १९९६ चा अधिनियम २१, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २३ द्वारे मूळ मजकूराऐवजी दाखल केले.

परंतु, अशी प्रत्येक व्यक्ती [1][शासनाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी] असेल.

(२) प्रत्येक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल :

परंतु, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची जी कार्ये * * * नामनिर्देशनाच्या छाननीशी [2]* * * संबंधित असतील त्यांपैकी कोणतेही कार्य, निवडणूक निर्णय अधिकारी ते करूच शकत नाही अशी अपरिहार्य परिस्थिती नसेल तर, कोणत्याही सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला करता येणार नाही.

२३. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या उल्लेखांत कलम २२, पोटकलम (२) खाली जे कार्य करण्यास सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्यात आले आहे असे कोणतेही कार्य करणाऱ्या सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा समावेश असल्याचे मानण्यात येईल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कार्ये करणाऱ्या सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निवडणूक निर्णय अधिकारी या संज्ञेत समावेश असावयाचा.

२४. हा अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा आदेश याद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने निवडणुकीचे परिणामकारकरीत्या चालन करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी कोणत्याही निवडणुकीच्या वेळी करणे, हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य असेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य.

[3][२५. निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेने जिल्हा निवडणूक अधिकारी, ज्याचा ज्याचा संपूर्ण किंवा अधिकतर भाग त्याच्या अधिकारितेत असेल त्या प्रत्येक मतदारसंघासाठी पुरेशा मतदान केंद्रांची व्यवस्था करील आणि निवडणूक आयोग निदेश देईल त्या पद्धतीने, अशी मतदान केंद्रे आणि ज्यांच्या ज्यांच्यासाठी अशा केंद्रांची व्यवस्था केली आहे ती मतदान क्षेत्रे किंवा गट दर्शविणारी सूची प्रसिद्ध करील.] मतदारसंघासाठी मतदान केंद्रांची व्यवस्था करणे.

२६. (१) [4][जिल्हा निवडणूक अधिकारी,] प्रत्येक मतदान केंद्राकरिता, मतदान केंद्राध्यक्षाची आणि त्याला आवश्यक वाटेल अशा मतदान अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करील, पण जी व्यक्ती निवडणुकीमध्ये किंवा त्यासंबंधात, एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने नेमलेली असेल अथवा अन्यथा त्याच्याकरता काम करत असेल अशा कोणाही व्यक्तीला तो नियुक्त करणार नाही : मतदान केंद्रांसाठी मतदान केंद्राध्यक्षांची नियुक्ती.

परंतु, एखादा मतदान अधिकारी मतदान केंद्रावर अनुपस्थित असल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, निवडणुकीमध्ये किंवा त्यासंबंधात उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने नेमलेल्या किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त, मतदान केंद्रावर उपस्थित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची पूर्वीच्या अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करील आणि तदनुसार [4][जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला] कळवील :

[5][परंतु आणखी असे की, या पोटकलमातील कशामुळेही एकाच वास्तुतील एकाहून अधिक मतदान केंद्रांकरिता मतदान केंद्राध्यक्ष म्हणून एकाच व्यक्तीची नियुक्ती करण्यास [4][जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला] प्रतिबंध होणार नाही.]

(२) मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्षाने तसे निदेशित केले तर, हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा आदेश याखाली मतदान केंद्राध्यक्षाला करावी लागणारी सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडील.

(३) मतदान केंद्राध्यक्षास प्रकृति-अस्वास्थ्यामुळे किंवा अन्य अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्रावर अनुपस्थित राहणे भाग पडल्यास, अशा कोणत्याही अनुपस्थितीच्या प्रसंगी त्याची कार्ये पार पाडण्यास [4][जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने] ज्याला आधीपासून प्राधिकृत केले असेल असा मतदान अधिकारी अशी कार्ये पार पाडील.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम १० द्वारे मूळ मजकूर गाळला.
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २५ द्वारे मूळ कलम २५ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे 'निवडणूक निर्णय अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
५. १९५६ चा अधिनियम २७, कलम १२ द्वारे समाविष्ट केले.

(४) या अधिनियमातील मतदान केंद्राध्यक्षाच्या उल्लेखांमध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, पोटकलम (२) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (३) खाली कोणत्याही व्यक्तीला जे कोणतेही कार्य करण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल ते कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश असल्याचे मानले जाईल.

[1][(५) कलम २५ मध्ये आणि ह्या कलमामध्ये केलेल्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या उल्लेखाचा संघ राज्यक्षेत्रातील मतदारसंघाच्या संबंधातील अर्थ, त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा उल्लेख, असा लावला जाईल.]

मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य

२७. मतदान केंद्रांवर सुव्यवस्था राखणे आणि मतदान सुरळीतपणे होत आहे हे पाहणे, हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये.

२८. मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला त्याची कार्ये पार पाडण्यात सहाय्य करणे, हे अशा केंद्रावरील मतदान अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

निवडणूक निर्णय अधिकारी, पीठासीन अधिकारी, इत्यादी अधिकारी यांना निवडणूक आयोगावर प्रतिनियुक्त केलेले अधिकारी म्हणून समजणे.

[2][२८क. कोणत्याही निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, पीठासीन अधिकारी, मतदान अधिकारी व या भागान्वये नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी आणि कोणत्याही राज्य शासनाने त्यावेळेपुरता पदनिर्देशित केलेला कोणताही पोलीस अधिकारी निवडणूक जाहीर करणाऱ्या अधिसूचनेच्या दिनांकी व तेव्हापासून व अशा निवडणुकीचे निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी निवडणूक आयोगावर प्रतिनियुक्त असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार, असे अधिकारी त्या कालावधीत, निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधीक्षण व शिस्त यांच्या अधीन असतील.]

विवक्षित निवडणुकांच्या बाबतीत विशेष उपबंध.

२९. (१) राज्यसभेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी घेतलेल्या [3]* * * निवडणुकीसाठी अथवा एखाद्या राज्याच्या विधानपरिषदेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांकडून होणाऱ्या निवडणुकीसाठी असलेला निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेने, अशा निवडणुकीच्या वेळी कोणत्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल ते निश्चित करील आणि याप्रमाणे निश्चित केलेले ठिकाण निवडणूक आयोगाकडून निदेशित करण्यात येईल अशा प्रकारे अधिसूचित करील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, याप्रमाणे निश्चित केलेल्या ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीचा अध्यक्ष म्हणून सूत्रचालन करील आणि त्याला सहाय्य करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल असा किंवा असे मतदान अधिकारी नियुक्त करील, पण जी व्यक्ती त्या निवडणुकीमध्ये किंवा त्यासंबंधात उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने नेमलेली असेल अथवा अन्यथा त्याच्यासाठी काम करत असेल अशा कोणाही व्यक्तीला तो नियुक्त करणार नाही.

## [4][भाग चार-क

## राजकीय पक्षाची नोंदणी

संघटना व निगम यांची राजकीय पक्ष म्हणून निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे.

२९क. (१) स्वतःला राजकीय पक्ष म्हणविणारा आणि या भागाच्या उपबंधाचे लाभ घेण्याचे उद्दिष्ट असणारा भारताचा कोणताही संघ किंवा एक एक नागरिक मिळून बनणारा कोणताही निकाय, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राजकीय पक्ष म्हणून आपली नोंदणी व्हावी यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करील.

(२) असा प्रत्येक अर्ज,—

(क) संघ किंवा निकाय, लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९८८ याच्या प्रारंभी अस्तित्वात असल्यास अशा प्रारंभानंतरच्या साठ दिवसांच्या आत केला जाईल ;

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २६ द्वारे समाविष्ट केला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम १, कलम ५ द्वारे समाविष्ट केला (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९५६ चा अधिनियम २७, कलम १३ द्वारे मूळ मजकूर गाळला.

४. १९८९ चा अधिनियम १, कलम ६ द्वारे समाविष्ट केला (१५ जून, १९८९ रोजी व तेव्हापासून)

(ख) संघ किंवा निकाय, अशा प्रारंभानंतर स्थापन करण्यात आल्यास, तिच्या स्थापनेच्या दिनांकाच्या ठीक तीस दिवसांच्या आत केला जाईल.

(३) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्जावर, संघ किंवा निकाय यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची (मग असा मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिव किंवा अन्य कोणत्याही पदनामाने ओळखला जात असो) सही असेल आणि तो आयोगाच्या सचिवाकडे सादर केला जाईल किंवा अशा सचिवाकडे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येईल.

(४) अशा प्रत्येक अर्जात खालील तपशिलाचा समावेश असेल, तो पुढीलप्रमाणे :—

(क) संघाचे किंवा निकायाचे नाव ;

(ख) ज्या राज्यात त्याचे मुख्य कार्यालय स्थित असेल ते राज्य ;

(ग) त्याला उद्देशून लिहिलेली पत्रे व इतर पत्रव्यवहार ज्या पत्त्यावर करण्यात येईल तो पत्ता ;

(घ) त्याचा अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व अन्य पदाधिकारी यांची नावे ;

(ङ) त्याच्या सदस्यांची संख्या, आणि जर सदस्यांचे प्रवर्ग असतील, तर अशा प्रत्येक प्रवर्गाची संख्या ;

(च) त्याची कोणतीही स्थानिक शाखा आहे किंवा कसे, असल्यास ती कोणत्या स्तरांवर आहे ;

(छ) संसदेच्या किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहातील कोणत्याही सदस्याने किंवा सदस्यांनी त्यांचे प्रतिनिधित्व केले आहे किंवा कसे, असल्यास असा सदस्य किंवा अशा सदस्यांची संख्या.

(५) पोटकलम (१) खालील अर्जासोबत संघ किंवा निकाय, मग असा संघ किंवा निकाय कोणत्याही नावाने संबोधला जात असो, याचे ज्ञापन किंवा नियम व विनियम यांची एक प्रत जोडलेली असेल आणि असे ज्ञापन किंवा नियम व विनियम यांमध्ये संघ किंवा निकाय, कायद्याद्वारे संस्थापित भारताच्या संविधानाविषयी तसेच समाजवाद, सर्वधर्मसमभाव लोकशाहीच्या तत्त्वांविषयी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगील आणि भारताची सार्वभौमता, एकता व अखंडता अबाधित ठेवील, असा विशिष्ट उपबंध समाविष्ट असेल.

(६) आयोग, संघ किंवा निकाय यांच्याकडून त्याला योग्य वाटेल असा तपशील मागवू शकेल.

(७) आयोग, आपल्या ताब्यातील पूर्वोक्त सर्व तपशील व अन्य कोणत्याही आवश्यक व संबंधित बाबींचा विचार केल्यानंतर आणि संघ किंवा निकाय यांच्या प्रतिनिधींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, संघाची किंवा निकायाची, या भागाच्या प्रयोजनार्थ, राजकीय पक्ष म्हणून एकतर नोंदणी करण्याचा किंवा नोंदणी न करण्याचा निर्णय घेईल : आणि आयोग संघाला किंवा निकायाला आपला निर्णय कळवील :

परंतु, अशा संघाचे किंवा निकायाचे ज्ञापन किंवा नियम व विनियम हे, पोटकलम (१) च्या उपबंधास अनुरूप ठरेपर्यंत, या पोटकलमाखाली कोणत्याही संघाची किंवा निकायाची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी केली जाणार नाही.

(८) आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

(९) कोणत्याही संघाची किंवा निकायाची पूर्वोक्तप्रमाणे राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाल्यानंतर, त्याचे मुख्य कार्यालय, पदाधिकारी, पत्ता यांमधील किंवा अन्य कोणत्याही महत्त्वाच्या बाबींमधील बदल विनाविलंब आयोगाला कळविण्यात येईल.]

## भाग पाच

## निवडणुकींचे चालन

### प्रकरण एक

### उमेदवारांचे नामनिर्देशन

[१][३०. एक किंवा अनेक सदस्य निवडून देण्यासाठी मतदारसंघाला पाचारण करणारी अधिसूचना काढण्यात आली की, निवडणूक आयोग शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढील दिनांक नियत करील :— नामनिर्देशन, इत्यादी-साठी दिनांक नियत करणे.

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम १४ द्वारे मूळच्या कलम ३० ऐवजी दाखल केले.

(क) नामनिर्देशने करण्याचा अखेरचा दिनांक.—हा दिनांक प्रथमोक्त अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकानंतरचा [1][सातवा दिवस] किंवा तो सार्वजनिक सुटीचा दिवस असल्यास, त्याच्या लगतनंतरचा सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल;

(ख) नामनिर्देशनांच्या छाननीचा दिनांक.—हा दिनांक नामनिर्देशने करण्याच्या अखेरच्या दिनांकानंतर [2][लगेच येणारा] दिवस किंवा, तो सार्वजनिक सुटीचा दिवस असल्यास, त्याच्या लगतनंतरचा सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल ;

(ग) उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिनांक.—हा दिनांक नामनिर्देशनांची छाननी करण्याच्या अखेरच्या दिनांकानंतर [3][एक दिवस सोडून दुसरा दिवस] किंवा तो, सार्वजनिक सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतनंतरचा सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल ;

(घ) ज्या दिनांकास किंवा आवश्यक असल्यास दिनांकांना मतदान घेण्यात येईल तो किंवा ते दिनांक.—तो दिनांक किंवा त्यापैकी पहिला दिनांक हा उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिनांकानंतरच्या [4][चौदाव्या दिवसाहून] अगोदरचा नसेल; आणि

(ङ) ज्या दिनांकापूर्वी मतदान पूर्ण व्हावे लागेल तो दिनांक.

[5]* * * * * * * *

**निवडणुकीची जाहीर नोटीस.** ३१. कलम ३० खालील अधिसूचना काढण्यात आल्यावर, [6]* * * निवडणूक निर्णय अधिकारी, नियोजित निवडणुकीसाठी उमेदवारांची नामनिर्देशने मागविणारी व नामनिर्देशनपत्रे कोणत्या ठिकाणी सुपूर्द करावयाची ते विनिर्दिष्ट करणारी अशा निवडणुकीची जाहीर नोटीस विहित असेल अशा नमुन्यात व अशा रीतीने देईल.

**निवडणुकीसाठी उमेदवारांचे नामनिर्देशन.** ३२. कोणत्याही व्यक्तीला संविधान व हा अधिनियम [7]* * * * * यांच्या उपबंधाखाली [8][किंवा 'संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) यांच्या उपबंधाखाली] एखादी [9]* * * जागा भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीला ती अर्ह असेल तर, ती जागा भरण्यासाठी होणाऱ्या निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित करता येईल.

**नामनिर्देशनपत्र दाखल करणे आणि विधिग्राह्य नामनिर्देशनासाठी आवश्यक गोष्टी.** [10][३३. (१) कलम ३० च्या खंड (क) खाली ठरवलेल्या दिनांकी किंवा दिनांकापूर्वी, प्रत्येक उमेदवाराला व्यक्तिशः किंवा त्याच्या प्रस्तावकामार्फत मध्यान्हपूर्व अकरा ते मध्यान्होत्तर तीन या वेळेत कलम ३१ खाली याबाबत दिलेल्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी, विहित नमुन्यात पूर्ण भरलेले आणि उमेदवाराने, तसेच प्रस्तावक म्हणून त्या मतदारसंघाच्या एखाद्या मतदाराने सही केलेले नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करावे लागेल :

---

१. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ७ द्वारे 'दहावा दिवस' या ऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९९६ चा अधिनियम २१, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २७ द्वारे स्पष्टीकरण गाळले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे मूळ मजकूर गाळला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

७. १९५६ चा अधिनियम २७, कलम १५ द्वारे समाविष्ट केलेले शब्द विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे गाळले.

८. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन द्वारे समाविष्ट केले.

९. १९५६ चा अधिनियम २७, कलम १५ द्वारे "कोणत्याही मतदारसंघातील" हा मजकूर गाळला.

१०. १९५६ चा अधिनियम २७, कलम १६ द्वारे मूळ कलम ३३ ऐवजी दाखल केले.

[1][परंतु, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाने उभा न केलेला उमेदवार हा, त्याच्या नामनिर्देशनपत्रावर त्या मतदारसंघातील मतदार असलेल्या दहा प्रस्तावकांची स्वाक्षरी असल्याखेरीज, त्या मतदारसंघातून निवडणुकीसाठी रीतसर नामनिर्देशित केला असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे सुद्धा की, सार्वजनिक सुटीच्या दिवशी कोणतेही नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करता येणार नाही :

परंतु आणखी असे सुद्धा की, स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ, पदवीधर मतदारसंघ किंवा शिक्षक मतदारसंघ यांच्या संबंधात, प्रस्तावक म्हणून "मतदारसंघाचा एक मतदार" या उल्लेखाचा अर्थ प्रस्तावक म्हणून मतदारसंघाच्या मतदारांच्या दहा टक्के मतदार किंवा असे दहा मतदार यांपैकी जे कमी असतील ते मतदार असा लावण्यात येईल.].

[2][(१क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सिक्कीम विधानसभेच्या (संविधानानुसार रीतसर घटीत झालेली त्या राज्याची विधानसभा असल्याचे मानण्यात येणारी) निवडणुकीकरिता, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सुपूर्द करावयाचे नामनिर्देशनपत्र, विहित केले असेल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने भरावे लागेल :

परंतु, उक्त नामनिर्देशनपत्रावर, त्या नामनिर्देशनाला आपली संमती दर्शविण्यासाठी त्या उमेदवाराने आणि—

(क) भुतिया-लेपचा कुळातील सिक्कीमींकरिता राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्या मतदारसंघातील कमीत कमी वीस मतदारांनी प्रस्तावक म्हणून आणि वीस मतदारांनी अनुमोदक म्हणून ;

(ख) संघाकरिता राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्या मतदारसंघातील कमीत कमी वीस मतदारांनी प्रस्तावक म्हणून आणि वीस मतदारांनी अनुमोदक म्हणून ;

(ग) नेपाळी कुळातील सिक्कीमींकरिता राखून ठेवलेल्या जागेच्या बाबतीत, त्या मतदारसंघातील एका मतदाराने प्रस्तावक म्हणून,

स्वाक्षरी केली पाहिजे :

परंतु आणखी असे की, कोणत्याही सार्वजनिक सुटीच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे नामनिर्देशनपत्र सुपूर्द करता येणार नाही.].

(२) ज्या मतदारसंघातील एखादी जागा राखीव असेल त्या मतदारसंघात उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये, तो ज्या विशिष्ट जातीचा किंवा जनजातीचा असेल, ती जात किंवा जनजाती आणि ज्या क्षेत्राच्या संबंधात ती जात किंवा जनजाती राज्यातील अनुसूचित जात किंवा, प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजाती आहे ते क्षेत्र विनिर्दिष्ट करणारे अधिकथन समाविष्ट असल्याखेरीज, तो उमेदवार ती जागा भरण्यासाठी व्हावयाच्या निवडणुकीला अर्ह असल्याचे मानले जाणार नाही.

(३) जर त्या उमेदवाराला [3][कलम ९] मध्ये निर्देशलेले पद त्याने धारण केलेले असताना, बडतर्फ करण्यात आलेले असून, बडतर्फी झाल्यापासून पाच वर्षांचा कालावधी उलटून गेलेला नसेल तर अशा व्यक्तीच्या नामनिर्देशनपत्रासोबत, ही व्यक्ती भ्रष्टाचाराबद्दल किंवा राज्याशी बेईमानी केल्याबद्दल बडतर्फ केली गेलेली नाही अशा आशयाचे, निवडणूक आयोगाने विहित केलेल्या रीतीने दिलेले प्रमाणपत्र असल्याशिवाय, ती व्यक्ती, उमेदवार म्हणून रीतसर नामनिर्देशित झाली असल्याचे मानले जाणार नाही.

(४) नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्रामध्ये नमूद केलेली उमेदवारांची नावे आणि उमेदवार व त्याचे प्रस्तावक यांचे मतदार यादी क्रमांक हे मतदार याद्यांमध्ये नोंदल्याबरहुकूम आहेत, याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल :

[4][परंतु, मतदार यादीत अथवा नामनिर्देशनपत्रात उल्लेखिलेल्या उमेदवाराच्या किंवा त्याच्या प्रस्तावकाच्या नावाच्या संबंधातील किंवा कोणत्याही ठिकाणाच्या संबंधातील कोणतेही चुकीचे नाव किंवा चुकीचे वर्णन अथवा हस्तदोष, तांत्रिक वा मुद्रण दोष अथवा मतदार यादीतील किंवा नामनिर्देशनपत्रातील अशा कोणत्याही व्यक्तीचा मतदार यादीतील क्रमांकाच्या संबंधातील कोणताही हस्तदोष, तांत्रिक किंवा

---

१. १९९६ चा अधिनियम २१, कलम ६(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

३. १९७८ चा अधिनियम ३८, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

४. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २९ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

मुद्रण दोष हा, जेथे त्या व्यक्तीचे नाव किंवा ठिकाण सामान्यतः समजण्यासारखे असेल त्याबाबतीत अशा व्यक्तीच्या किंवा ठिकाणाच्या संबंधात मतदार यादीचे किंवा नामनिर्देशनपत्राचे संपूर्ण प्रवर्तन होण्यावर परिणाम होणार नाही, आणि निवडणूक निर्णय अधिकारी असे कोणतेही चुकीचे नाव, हस्तदोष, तांत्रिक किंवा मुद्रण दोष दुरुस्त करण्यास परवानगी देईल आणि आवश्यक तेथे मतदार यादीतील किंवा नामनिर्देशनपत्रातील असे कोणतेही चुकीचे नाव, चुकीचे वर्णन, हस्तदोष, तांत्रिक किंवा मुद्रणदोष दुर्लक्षित केले जावेत असा निदेश देईल.]

(५) जेव्हा उमेदवार वेगळ्या मतदारसंघातील मतदार असतो तेव्हा, त्या मतदारसंघाच्या मतदार यादीची प्रत किंवा त्यातील संबद्ध भाग किंवा अशा यादीतील संबद्ध नोंदीची प्रमाणित प्रत, नामनिर्देशनपत्रासोबत दाखल केली नसेल तर छाननीच्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यापुढे हजर करावी लागेल.

[1][(६) या कलमातील कशामुळेही एखाद्या उमेदवाराला एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्राद्वारे नामनिर्देशन केले जाण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, एकाच मतदारसंघातील निवडणुकीसाठी एका उमेदवाराला किंवा त्याच्या वतीने चारापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करता येणार नाहीत किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला स्वीकारता येणार नाहीत.]]

[2][(७) पोटकलम (६) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढील प्रकारे कोणत्याही व्यक्तीला निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही :—

(क) लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या बाबतीत, (मग ती सर्व संसद मतदारसंघांतून एकाचवेळी घेण्यात आलेली असो वा नसो) दोनपेक्षा अधिक संसद मतदारसंघांमधून;

(ख) राज्य विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या बाबतीत, (मग ती सर्व विधानसभा मतदारसंघांतून एकाच वेळी घेण्यात आलेली असो वा नसो) त्या राज्यातील दोन किंवा अधिक मतदारसंघांमधून;

(ग) विधान परिषद असणाऱ्या राज्याच्या विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीच्या बाबतीत, त्या राज्यातील दोन पेक्षा अधिक विधान परिषद मतदारसंघांमध्ये;

(घ) राज्याला वाटून दिलेल्या दोन किंवा अधिक जागा भरण्यासाठी राज्य विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीच्या बाबतीत अशा दोन पेक्षा अधिक जागा भरण्यासाठी;

(ङ) दोन किंवा अधिक संसद मतदारसंघांमधून एकाच वेळी घेण्यात येणाऱ्या लोकसभेच्या पोट निवडणुकीच्या बाबतीत अशा दोनपेक्षा अधिक संसद मतदारसंघांमधून ;

(च) दोन किंवा अधिक विधान सभा मतदारसंघांमधून एकाचवेळी घेण्यात येणाऱ्या राज्य विधान सभेच्या पोट निवडणुकांच्या बाबतीत अशा दोन पेक्षा अधिक विधानसभा मतदार संघांमधून ;

(छ) राज्याला वाटून दिलेल्या दोन किंवा अधिक जागा भरण्यासाठी राज्य विधान परिषदेच्या एकाच वेळी घेण्यात येणाऱ्या पोट निवडणुकांच्या बाबतीत अशा दोन पेक्षा अधिक जागा भरण्यासाठी;

(ज) विधान परिषद असणाऱ्या राज्याच्या विधान परिषदेच्या दोन किंवा अधिक विधान परिषद मतदारसंघांमधून एकाच वेळी घेण्यात येणाऱ्या पोटनिवडणुकांच्या बाबतीत अशा दोनपेक्षा अधिक विधानपरिषद मतदारसंघांमधून.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ जेव्हा पोटनिवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोग कलम १४७, १४९, १५० किंवा, यथास्थिति, १५१ अन्वये, एकाच तारखेस अधिसूचना काढील तेव्हा अशा दोन किंवा अधिक पोटनिवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्याचे मानण्यात येईल.]

अनामती. ३४. [3][(१) कोणत्याही उमेदवाराने—

(क) संसदीय मतदारसंघातील निवडणुकीच्या बाबतीत, दहा हजार रुपयांची रक्कम किंवा उमेदवार अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जनजातीचा असल्यास, पाच हजार रुपयांची रक्कम; आणि

---

१. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ८ द्वारे पोटकलम (६) ऐवजी दाखल केले (२९ सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

२. १९९६ चा अधिनियम २१, कलम ६ (ख) द्वारे पोटकलम (७) समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

(ख) विधान सभा किंवा विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीच्या बाबतीत, पाच हजार रुपयांची रक्कम किंवा उमेदवार अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचितजनजातीचा असल्यास, अडीच हजार रुपयांची रक्कम,

अनामत म्हणून ठेवल्याशिवाय किंवा ठेवण्याची तजवीज केल्याशिवाय तो, त्या मतदारसंघातील निवडणुकीत-साठी रीतसर नामनिर्देशित झाला असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु, जेव्हा एखादा उमेदवार एकाच मतदारसंघातील निवडणुकीसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशन-पत्रांद्वारे नामनिर्देशित झालेला असेल तेव्हा, या पोटकलमानुसार त्याला एकापेक्षा अधिक अनामत रकमा ठेवाव्या लागणार नाहीत.]

(२) पोटकलम (१) अन्वये अनामत म्हणून ठेवावी लागणारी रक्कम ही, [१][कलम ३३ च्या पोटकलम (१) खाली किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (१क) खाली] नामनिर्देशनपत्र सुपूर्द करण्याच्या वेळी उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ती रक्कम रोख रकमेत जमा केली किंवा जमा करण्याची तजवीज केली असल्याशिवाय अथवा उक्त रक्कम त्याने किंवा त्याच्या वतीने अन्य व्यक्तीने भारताच्या रिझर्व्ह बँकेमध्ये किंवा शासकीय कोषागारात भरली आहे असे दर्शवणारी पावती नामनिर्देशनपत्राबरोबर जोडली असल्याखेरीज त्या पोटकलमाखाली ती अनामत रक्कम म्हणून ठेवली असल्याचे मानले जाणार नाही.

३५. कलम ३३, [१][पोटकलम (१) खाली किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (१क) खाली] नामनिर्देशन-पत्र मिळाल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी ते सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना नाम-निर्देशनांच्या छाननीसाठी निश्चित केलेली वेळ व ठिकाण कळवील आणि त्या नामनिर्देशनपत्रावर त्याचा अनुक्रमांक घालील आणि त्या नामनिर्देशनपत्रावर त्याला कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळी ते पत्र सुपूर्द करण्यात आले, ते नमूद करून ते प्रमाणपत्र स्वाक्षरित करील व त्यानंतर शक्य तितक्या लवकर, तो उमेदवार व तो [२][प्रस्तावक] या दोघांचीही नामनिर्देशनपत्रात जी वर्णने असतील त्यांच्याशी मिळती-जुळती वर्णने अंतर्भूत असलेली नामनिर्देशनाची नोटीस आपल्या कार्यालयातील ठळक जागी लावील. नामनिर्देशनांची नोटीस व त्यांच्या छाननीची वेळ व जागा.

३६. (१) [२]कलम ३० खाली नामनिर्देशनांच्या छाननीसाठी निश्चित केलेल्या दिनांकी निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा वेळी आणि अशा ठिकाणी, उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी, प्रत्येक उमेदवाराचा एक प्रस्तावक [३]* * * आणि प्रत्येक उमेदवाराने रीतसर लेखी प्राधिकृत केलेली दुसरी एखादी व्यक्ती उपस्थित राहू शकेल, पण अन्य कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहता येणार नाही, आणि निवडणूक निर्णय अधिकारी, कलम ३३ मध्ये दिलेल्या मुदतीत आणि पद्धतीने जी सुपूर्द करण्यात आली असतील अशा सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करण्यासाठी त्यांना सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देईल. नामनिर्देशनांची छाननी.

(२) त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनाबाबत घेतलेल्या सर्व आक्षेपांबाबत निर्णय देईल आणि स्वतः होऊन अशा आक्षेपावरून किंवा स्वतः होऊन त्याला आवश्यक वाटेल अशी काही चौकशी करावयाची असल्यास, तशी चौकशी केल्यानंतर पुढीलपैकी कोणत्याही कारणास्तव कोणतेही नामनिर्देशन [४][फेटाळून लावू] शकेल :—

[५][(क) [६][नामनिर्देशनांच्या छाननीसाठी ठरवलेल्या दिनांकास उमेदवार] पुढीलपैकी लागू असेल अशा कोणत्याही उपबंधाखाली ती जागा भरण्यासाठी व्हावयाच्या निवडणुकीला अर्ह नाही किंवा निरर्ह ठरली आहे, ते उपबंध असे :—

अनुच्छेद ८४, १०२, १७३ व १९१ [७]* * * * *

[८][या अधिनियमाचा भाग दोन आणि 'संघ राज्यक्षेत्रे शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) याची कलमे ४ आणि १४] [९]* * * ; किंवा

---

१. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूचीद्वारे विशिष्ट शब्दांऐवजी दाखल केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

२. १९५६ चा अधिनियम २७, कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ मजकूर गाळला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे खंड (क) ते (ङ) ऐवजी दाखल केले.

६. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ९ द्वारे "उमेदवार" याऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

७. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६, द्वारे समाविष्ट केलेला "आणि" हा शब्द, १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन द्वारे वगळण्यात आला.

८. १९६३ चा अधिनियम, २० कलम ५७ व अनुसूची दोन द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी दाखल केले.

९. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६, द्वारे विशिष्ट शब्द गाळले.

(ख्) कलम ३३ किंवा कलम ३४ च्या कोणत्याही उपबंधाचे अनुपालन करण्यात कसूर झाली आहे; किंवा

(ग्) उमेदवाराची किंवा त्याच्या प्रस्तावकाची नामनिर्देशनपत्रावरील सही अस्सल नाही.]

(३) एखाद्या नामनिर्देशनपत्रात कोणतीही नियमबाह्य गोष्ट असली तरी, ज्याच्या बाबतीत कोणतीही नियमबाह्य गोष्ट झालेली नाही अशा दुसऱ्या एखाद्या नामनिर्देशनपत्राद्वारे एखादा उमेदवार रीतसर नामनिर्देशित झालेला असेल तर, त्या नियमबाह्यतेच्या कारणावरून त्या उमेदवाराचे नामनिर्देशन [1][फेटाळण्यास] पोटकलम (२) च्या [1][खंड (ख्) किंवा खंड (ग्)] मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, प्राधिकार मिळतो असे मानले जाणार नाही.

(४) जो दोष मूलगामी स्वरूपाचा नसेल अशा कोणत्याही [2]* * * दोषाच्या कारणास्तव निवडणूक निर्णय अधिकारी कोणतेही नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी कलम ३०, खंड (ख्) खाली छाननीसाठी ठरवण्यात आलेल्या दिनांकी छाननी करील आणि दंगा किंवा धडधडीत हिंसाचार यामुळे किंवा त्याच्या आटोक्याबाहेरील कारणामुळे छाननीच्या कार्यवाहीला अडथळा आला किंवा अटकाव झाला, एवढे कारण सोडून एरव्ही छाननीची कार्यवाही केव्हाही तहकूब होऊ देणार नाही :

परंतु, [3][निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने काही आक्षेप घेतल्यास] त्या आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवाराला मुदत देता येईल—मात्र छाननीसाठी ठरवलेल्या दिवसाच्या लागोपाठचा दिवस सोडून त्यापुढील दिवसाच्या पलीकडे नाही, आणि निवडणूक निर्णय अधिकारी, ज्या दिनांकापर्यंत कार्यवाही तहकूब करण्यात आली असेल त्या दिनांकाला आपला निर्णय देऊन तो नमूद करील.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर, ते स्वीकारल्याचा किंवा फेटाळल्याचा निर्णय पृष्ठांकित करील आणि नामनिर्देशनपत्र फेटाळले असल्यास, अशा फेटाळणीबद्दलची आपली कारणे देणारे संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करील.

[4][(७) या कलमाच्या प्रयोजनार्थ, मतदारसंघाच्या त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या मतदार यादीतील एखाद्या नोंदीमध्ये उल्लेखिलेली व्यक्ती ही जर 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) च्या कलम १६ मध्ये उल्लेखिलेल्या निरर्हतेस पात्र आहे असे शाबीत झाले नसेल तर, त्या नोंदीची प्रमाणित प्रत म्हणजे ती व्यक्ती त्या मतदारसंघाचा मतदार असल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(८) सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी केल्यानंतर आणि ती स्वीकारल्याचे किंवा फेटाळल्याचे निर्णय नमूद केल्यानंतर लगेच, निवडणूक निर्णय अधिकारी, वैधरीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची म्हणजेच ज्यांची नामनिर्देशने विधिग्राह्य असल्याचे ठरविण्यात आले असेल त्या उमेदवारांची यादी तयार करील आणि ती आपल्या सूचना-फलकावर लावील.]

उमेदवारी मागे घेणे.

३७. (१) कोणताही उमेदवार लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेऊ शकेल व विहित असेल असा तपशील त्या नोटिशीमध्ये असेल आणि त्याखाली त्याची स्वाक्षरी असेल आणि कलम ३० च्या खंड (ग्) खाली ठरवून दिलेल्या दिवशी दुपारी तीन वाजण्यापूर्वी तो उमेदवार स्वतः किंवा त्याचा प्रस्तावक [5]* * * किंवा अशा उमेदवाराने याबाबत लेखी प्राधिकृत केलेला निवडणूक प्रतिनिधी ती नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करील.

[5]* * * *

(२) ज्या व्यक्तीने पोटकलम (१) खाली आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला ती नोटीस रद्द करू दिली जाणार नाही.

[6][(३) निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारी मागे घेण्याबाबतच्या नोटिशीच्या खरेपणाची खात्री झाल्यावर आणि पोटकलम (१) खाली ती सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीची ओळख पटल्यानंतर, ती नोटीस त्याच्या कार्यालयात ठळक जागी लावण्याची तजवीज करील.]

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे "तांत्रिक" हा शब्द वगळला.
३. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ९ द्वारे "असा आक्षेप घेतला आहे" याऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
४. १९५६ चा अधिनियम २७, कलम १९ द्वारे पोटकलम (७) ऐवजी दाखल केले.
५. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे "अनुमोदक" हा शब्द व परंतुक वगळण्यात आले.
६. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १० द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

[1][३८. (१) कलम ३७ पोटकलम (१) खाली ज्या कालावधीमध्ये उमेदवारी मागे घेता येईल निवडणूक तो कालावधी संपल्यानंतर लगेच, निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची, म्हणजेच लढवणाऱ्या वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्यांचा समावेश असेल आणि ज्यांनी उक्त उमेदवारांची यादी कालावधीमध्ये आपली उमेदवारी मागे घेतलेली नसेल, त्या उमेदवारांची यादी विहित असेल अशा नमुन्यात प्रसिद्ध करणे. व अशा पद्धतीने तयार करून प्रसिद्ध करील.

[2][(२) पोटकलम (१) अन्वये नावांची यादी करण्याच्या प्रयोजनार्थ, उमेदवारांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(एक) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार ;

(दोन) खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त, नोंदणीकृत राजकीय पक्षांचे उमेदवार ;

(तीन) इतर उमेदवार ;

(३) पोटकलम (२) मध्ये नमूद केलेल्या संवर्गाची रचना त्यात विनिर्दिष्ट केलेल्या क्रमाने केली जाईल आणि प्रत्येक संवर्गातील उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे लावण्यात येतील व निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांचे पत्ते नामनिर्देशनपत्रात दिल्यानुसार आणि विहित करण्यात येईल अशा अन्य तपशिलासह देण्यात येतील.]]

[3][३९. (१) राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांना किंवा निवडून आलेल्या सदस्यांना किंवा इतर निवडणुका-[4][संघराज्यक्षेत्राच्या] निर्वाचक गणाच्या सदस्यांना एक किंवा अनेक सदस्य निवडून देण्यासाठी पाचारण मधील उमेदवारांचे करणारी अधिसूचना काढण्यात आली की, निवडणूक आयुक्त, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नामनिर्देशन. पुढील दिनांक नियत करील :—

(क) नामनिर्देशने करण्याचा अखेरचा दिनांक.—तो प्रथमोक्त अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकानंतरचा [5][सातवा दिवस] किंवा तो सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल ;

(ख) नामनिर्देशनांच्या छाननीचा दिनांक.—तो नामनिर्देशने करण्याच्या अखेरच्या दिनांकानंतर [6][लगेच येणारा दिवस] किंवा तो सार्वजनिक सुटीचा दिवस असल्यास, त्याच्या लगतनंतरचा सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल ;

(ग) उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिनांक.—तो नामनिर्देशनांची छाननी करण्याच्या अखेरच्या दिनांकानंतरचा [6][एक दिवस सोडून दुसरा दिवस] किंवा, तो सार्वजनिक सुटीचा दिवस असल्यास, त्याच्या लगतनंतरचा सार्वजनिक सुटी नसणारा दिवस असेल ;

(घ) ज्या दिनांकास किंवा आवश्यक असल्यास, दिनांकांना मतदान घेण्यात येईल तो किंवा ते दिनांक.—तो दिनांक किंवा त्यापैकी पहिला दिनांक उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरचा दिनांकानंतर सातव्या दिवसाहून अगोदरचा नसेल; आणि

(ङ) ज्या दिनांकापूर्वी मतदान पूर्ण व्हावे लागेल तो दिनांक.—

[7]* * * * * *

(२) कलम ३३ ची पोटकलमे (२) आणि (५) आणि [8][कलम ३४ च्या पोटकलम (१) चा खंड (क)] वगळता, कलमे ३१ ते ३८ यांचे उपबंध ज्याप्रमाणे कोणत्याही मतदारसंघातील निवडणुकीला लागू होतात त्याप्रमाणे ते अशा कोणत्याही निवडणुकीला लागू होतील :

परंतु,—

(क) उक्त उपबंधामधील त्या मतदारसंघाच्या मतदार यादीचे जे कोणतेही उल्लेख असतील त्यांचा अर्थ, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तेव्हा, राज्याच्या विधानसभा सदस्यांच्या किंवा निवडलेल्या सदस्यांच्या मार्फत करावयाच्या निवडणुकीच्या बाबतीत, कलम १५२ च्या पोटकलम (१) खाली जी ठेवण्यात येते, त्या सदस्यांच्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्या विधानसभेच्या निवडलेल्या सदस्यांच्या सूचीचे उल्लेख म्हणून आणि [4][संघ राज्यक्षेत्राच्या] निर्वाचक गणाच्या सदस्यांमार्फत करावयाच्या निवडणुकीच्या बाबतीत, त्या कलमाच्या पोटकलम (२) खाली जी ठेवण्यात येते त्या, अशा निर्वाचक गणाच्या सदस्यांच्या सूचीचे उल्लेख म्हणून लावला जाईल ;

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम २१ द्वारे मूळ कलम ३८ ऐवजी दाखल केले.
२. १९९६ चा अधिनियम २१, कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
३. १९५६ चा अधिनियम २७, कलम २२ द्वारे मूळ कलम ३९ ऐवजी दाखल केले.
४. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ग राज्य" याऐवजी दाखल केले.
५. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ११ द्वारे "दहावा दिवस" याऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
६. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
७. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे स्पष्टीकरण वगळले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
८. १९५८ चा अधिनियम ५८, कलम १९ द्वारे 'कलम ३४' याऐवजी दाखल केले.

[1][(कक्) कलम ३३, पोटकलम (१) च्या सुरुवातीच्या परिच्छेदातील, "मतदार संघात प्रस्तावक म्हणून एक मतदार" या उल्लेखाचा अर्थ, प्रस्तावक म्हणून निवडून आलेल्या सदस्यांच्या किंवा राज्य विधानसभेच्या सदस्यांच्या किंवा, प्रकरणपरत्वे, संघ राज्यक्षेत्रातून निवडून आलेल्या सदस्यांच्या दहा टक्के, किंवा संबंधित दहा सदस्यांपैकी जे कमी असतील ते मतदार, असा लावण्यात येईल :

परंतु, या खंडात उल्लेखिलेल्या टक्केवारीच्या परिगणनेच्या परिणामी सदस्य संख्या अपूर्णांकात येत असेल आणि याप्रकारे काढण्यात आलेला अपूर्णांक अर्ध्यापेक्षा अधिक असेल तर तो एक धरला जाईल आणि याप्रकारे काढण्यात आलेला अपूर्णांक अर्ध्याहून कमी असेल तर तो हिशेबात धरता येणार नाही ; ]

[2][[3][(कख्)] कोणत्याही राज्याच्या विधान परिषदेची त्याच राज्य विधानसभेच्या सदस्यांनी निवडणूक घेण्याच्या बाबतीत, कलम ३६, पोटकलम (२) खंड (क) मध्ये अनुच्छेद १७१ खंड (३) उपखंड (घ) याचा उल्लेख समाविष्ट आहे, असा अर्थ लावला जाईल ; ]

(ख) कलम ३० च्या उक्त उपबंधामधील कोणत्याही उल्लेखांचा अर्थ या कलमाच्या पोटकलम (१) चे उल्लेख म्हणून लावला जाईल ; आणि

(ग) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या वेळी, निवडणूक निर्णय अधिकारी ते दाखल करणाऱ्या व्यक्तीला ज्या मतदार यादीमध्ये किंवा मतदारयादीच्या ज्या भागामध्ये त्या उमेदवाराचे नाव समाविष्ट आहे त्याची एक प्रत किंवा अशा मतदार यादीतील संबद्ध नोंदीची प्रमाणित प्रत हजर करण्यास फर्मावू शकेल.]

## प्रकरण दोन

### उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी

निवडणूक प्रतिनिधी.

[4][४०. निवडणुकीतील उमेदवार, स्वतः व्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीची, आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून विहित पद्धतीने नियुक्ती करू शकेल आणि जेव्हा अशी नियुक्ती केली जाईल तेव्हा, त्या नियुक्तीबाबतची नोटीस विहित पद्धतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देईल.]

निवडणूक प्रतिनिधी होण्याबाबत निरर्हता.

[5][४१. जी व्यक्ती, लोकसभेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाचा किंवा राज्य विधानसभेच्या सभागृहाचा किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाचा सदस्य होण्यास किंवा निवडणुकीमध्ये मतदान करण्यास संविधानाखाली किंवा या अधिनियमाखाली त्या त्या काळी निरर्ह असेल ती व्यक्ती, निरर्हता अस्तित्वात असेपर्यंत कोणत्याही निवडणुकीमध्ये निवडणूक प्रतिनिधी होण्यास निरर्ह असेल.]

निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे.

४२. (१) निवडणूक प्रतिनिधीची [6]* * * नियुक्ती प्रत्याहृत करणाऱ्या लेखावर उमेदवार स्वाक्षरी करील आणि तो लेख निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल केल्याच्या दिनांकापासून नियुक्ती प्रत्याहृत झाल्याचे मानले जाईल.

[7][(२) निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत झाल्यास किंवा त्याचा मृत्यू घडल्यास—मग अशी घटना निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकीच्या दरम्यान घडो वा निवडणुकीनंतर घडो—परंतु कलम ७८ मधील उपबंधानुसार उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचे हिशेब दाखल करण्यापूर्वी त्या उमेदवाराला दुसऱ्या व्यक्तीशी आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून विहित पद्धतीने नियुक्ती करता येईल आणि जेव्हा अशी नियुक्ती केली जाईल तेव्हा, त्या नियुक्तीची नोटीस विहित रीतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला दिली जाईल.]

४३. [कलम ४२ खाली निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती न करण्याचा परिणाम] लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २७), कलम २५ द्वारे निरसित.

४४. [हिशेब ठेवण्याचे निवडणूक प्रतिनिधीचे कर्तव्य] 'लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २७), कलम २५ द्वारे निरसित.

---

१. १९८९ चा अधिनियम, १, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (१ एप्रिल, १९८९ रोजी व तेव्हापासून).
२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३० द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. १९८९ चा अधिनियम १, कलम ८ द्वारे मूळ खंड (कक्) ला (कख्) असा नवीन क्रमांक दिला (१ एप्रिल, १९८९ रोजी व तेव्हापासून).
४. १९५६ चा अधिनियम २७, कलम २३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३१ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. १९५६ चा अधिनियम २७, कलम २४ द्वारे विशिष्ट शब्द वगळले.
७. वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल केले.

[1][४५. निवडणूक प्रतिनिधीला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली निवडणूक प्रतिनिधीने पार पाडावयाची कार्ये म्हणून जी प्राधिकृत करण्यात आली असतील अशी कार्ये करता येतील.]

निवडणूक प्रतिनिधीची कार्ये.

[2][४६. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला कलम २५ खाली ज्याची व्यवस्था केली आहे त्या प्रत्येक मतदान केंद्रावर किंवा कलम २९, पोट कलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी अशा उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यास विहित केले असतील तितके प्रतिनिधी आणि कार्यविमोचक प्रतिनिधी विहित केलेल्या पद्धतीने नियुक्त करता येतील.]

मतदान प्रतिनिधींची नियुक्ती.

[3][४७. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला, मतमोजणीच्या वेळी आपला किंवा आपले मतमोजणी प्रतिनिधी म्हणून हजर राहण्यासाठी एका किंवा अधिक पण विहित केलेल्या संख्येपेक्षा जास्त नसतील इतक्या व्यक्तींची विहित पद्धतीने नियुक्ती करता येईल आणि अशी नियुक्ती झाली की, त्या नियुक्तीसंबंधीची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित पद्धतीने दिली जाईल.]

मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती.

४८. (१) मतदान प्रतिनिधींची नियुक्ती प्रत्याहृत करण्याबाबतच्या लेखावर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी स्वाक्षरी करील आणि तो लेख, विहित केले जाईल अशा अधिकाऱ्याकडे ज्या दिनांकी दाखल करण्यात येईल त्या दिनांकापासून अंमलात येईल आणि मतदान प्रतिनिधींची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे या घटना मतदान समाप्त होण्यापूर्वी घडल्यास, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, मतदान बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी विहित पद्धतीने दुसऱ्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करू शकेल आणि अशा नियुक्तीची नोटीस, विहित केलेले असेल अशा अधिकाऱ्याला विहित पद्धतीने तात्काळ देईल.

मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे.

(२) मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करण्याबाबतच्या लेखावर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी स्वाक्षरी करील आणि ही नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ज्या दिनांकी दाखल केली जाईल त्या दिनांकापासून अंमलात येईल आणि मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे ह्या घटना मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी घडल्यास, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी कोणत्याही वेळी विहित पद्धतीने दुसऱ्या मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती करू शकेल आणि अशा नियुक्तीची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित पद्धतीने तात्काळ देईल.

४९. (१) मतदान प्रतिनिधीला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली निवडणूक प्रतिनिधीने पार पाडावयाची कार्ये म्हणून जी प्राधिकृत करण्यात आली असतील अशी, मतदानाच्या संबंधातील कार्ये पार पाडता येतील.

(२) मतमोजणी प्रतिनिधीला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मतमोजणी प्रतिनिधीने पार पाडावयाची कार्ये म्हणून जी प्राधिकृत करण्यात आली असतील अशी, मतमोजणीच्या संबंधातील कार्ये पार पाडता येतील.

मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची कार्ये.

५०. (१) जेथे मतदान घेतले जाते अशा प्रत्येक निवडणुकीच्या वेळी [4][निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला] आणि अशा निवडणुकीतील त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला, मतदान घेण्यासाठी कलम २५ खाली ज्यांची व्यवस्था केली आहे, अशा कोणत्याही मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी कलम २९ च्या पोट कलम (१) खाली नियत केलेल्या ठिकाणी उपस्थित राहण्याचा अधिकार असेल.

(२) [4][निवडणूक लढवणारा उमेदवार] किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, जर निवडणूक लढवणाऱ्या अशा उमेदवाराचा एखादा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त केला गेला असता तर, अशा प्रतिनिधीला जी कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यास या अधिनियमाखाली प्राधिकृत करण्यात आले असते, ती कृती किंवा गोष्ट करू शकेल किंवा अशी कोणतीही गोष्ट किंवा कृती करण्यामध्ये [4][निवडणूक लढवणाऱ्या अशा उमेदवाराला] किंवा मतमोजणी प्रतिनिधीला सहाय्य करू शकेल.

निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने मतदान केंद्रावर उपस्थित राहणे आणि त्याने मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची कामे पार पाडणे.

५१. जेव्हा एखादी कृती किंवा गोष्ट, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मतदान प्रतिनिधीच्या किंवा मतमोजणी प्रतिनिधीच्या उपस्थितीत करणे आवश्यक किंवा प्राधिकृत असेल तेव्हा, असा कोणताही किंवा असे कोणतेही प्रतिनिधी त्या प्रयोजनासाठी नियत केलेल्या वेळी आणि ठिकाणी अनुपस्थित राहिले असता, त्यामुळे ती कृती किंवा गोष्ट, जर ती अन्यथा रीतसर केलेली असेल तर, अवैध होणार नाही.

मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची अनुपस्थिती.

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम २६ द्वारे कलम ४५ ऐवजी दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे कलम ४६ ऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे कलम ४७ ऐवजी दाखल केले.
४. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २० द्वारे "उमेदवार" याऐवजी दाखल केले.

## प्रकरण तीन

### निवडणुकांमधील सर्वसाधारण कार्यपद्धती

[1][मतदानापूर्वी मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराचा मृत्यू होणे.

**५२.** [1][(१) कोणत्याही मान्यताप्राप्त राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार,—

(क) नामनिर्देशन करण्याच्या अंतिम दिनांकास सकाळी ११ वाजल्यानंतर कोणत्याही वेळेस मृत्यू पावल्यास आणि कलम ३६ अन्वये छाननी केल्यानंतर त्याचे नामनिर्देशन विधिग्राह्य ठरल्यास ; किंवा

(ख) कलम ३६ अन्वये छाननी केल्यानंतर त्याचे नामनिर्देशन विधिग्राह्य ठरले असेल आणि कलम ३७ अन्वये त्याने उमेदवारी मागे घेतलेली नसेल अशा परिस्थितीत मृत्यू पावल्यास, आणि दोन्ही बाबतीत, कलम ३८ अन्वये निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याच्या मृत्यूची वार्ता मिळाल्यास ; किंवा

(ग) निवडणूक लढविणारा उमेदवार म्हणून मृत्यू पावल्यास आणि त्याच्या मृत्यूची वार्ता मतदानाला प्रारंभ होण्यापूर्वी मिळाल्यास ;

निवडणूक निर्णय अधिकारी, त्या उमेदवाराच्या मृत्यूच्या वृत्ताबाबत खात्री पटल्यानंतर आदेशाद्वारे मतदान नंतर अधिसूचित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत तहकूब करील आणि त्याच्या मृत्यूबाबतचे वृत्त निवडणूक आयोगाला तसेच समुचित प्राधिकरणाला कळवील :

परंतु, मृत उमेदवाराच्या नामनिर्देशनासह सर्व नामनिर्देशनांची छाननी केल्यानंतर असेल ते खेरीज-करून खंड (क) मध्ये निर्देशित केलेल्या प्रकरणी, मतदान तहकूब करण्याबाबतचा कोणताही आदेश देता येणार नाही.

(२) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून पोटकलम (१) अन्वये वृत्त कळविण्यात आल्यानंतर निवडणूक आयोग ज्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा उमेदवार मरण पावला असेल त्या पक्षाला उक्त मतदानासाठी दुसऱ्या एखाद्या उमेदवाराला, अशा मान्यताप्राप्त राजकीय पक्षाला ती नोटीस देण्यात आल्यापासून सात दिवसांच्या आत नामनिर्देशित करण्यास फर्मावील आणि कलमे ३० ते ३७ यांचे उपबंध शक्य असतील तेथवर अशा नामनिर्देशनाला, जसे ते इतर नामनिर्देशनाला लागू होतात तसेच लागू होतील :

परंतु, ज्या व्यक्तीने मतदान प्रत्यादेशित होण्यापूर्वी कलम ३७ च्या पोटकलम (१) खाली आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल ती व्यक्ती अशा तहकूब होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास अपात्र असणार नाही.

(३) जेव्हा कलम ३८ अन्वये निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी पोटकलम (१) अन्वये मतदान तहकूब होण्यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली असेल तेव्हा निवडणूक निर्णय अधिकारी त्या कलमा-न्वये निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी नव्याने तयार करील व प्रसिद्ध करील म्हणजे, त्यात पोट कलम (२) अन्वये वैध रीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे त्याला समाविष्ट करता येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या आणि कलमे ३३ व ३८ यांच्या प्रयोजनार्थ "मान्यताप्राप्त राजकीय पक्ष" याचा अर्थ, निवडणूक चिन्हे (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ याखाली निवडणूक आयोगाने मान्यता दिलेला राजकीय पक्ष, असा आहे.]

लढवलेल्या आणि न लढविलेल्या निवडणुकांबाबतची कार्यपद्धती.

**५३.** [2][(१) जर निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची संख्या ही भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तर मतदान घेतले जाईल.]

(२) जर अशा उमेदवारांची संख्या ही भरावयाच्या जागांच्या संख्येइतकी असेल तर, असे सर्व उमेदवार त्या जागा भरण्यासाठी रीतसर निवडले गेल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तात्काळ जाहीर करील.

(३) जर अशा उमेदवारांची संख्या, ही भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा सर्व उमेदवारांची निवड झाल्याचे तात्काळ जाहीर करील आणि **शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे** [3][निवडणूक आयोग] उर्वरित एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी [4]* * * * * * * एका किंवा अनेक व्यक्तींची निवड करण्यासाठी, प्रकरणपरत्वे तो मतदारसंघ अथवा निवडलेले सदस्य किंवा राज्य विधानसभेचे सदस्य अथवा संबंधित निर्वाचक गणाचे सदस्य [5]* * * * * यांना पाचारण करील :

---

१. १९९६ चा अधिनियम २१, कलम ९ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल केले. (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३० द्वारे पोटकलम (१) ऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे विशिष्ट शब्द वगळण्यात आले.
५. १९५१ चा अधिनियम ४९, कलम ४४ आणि अनुसूची पाचद्वारे 'किंवा कुर्ग विधानपरिषदेचे निर्वाचित सदस्य' हे शब्द वगळण्यात आले.

परंतु, जर, प्रकरणपरत्वे, तो मतदारसंघ अथवा निवडलेले सदस्य किंवा राज्य विधानसभेचे सदस्य अथवा संबंधित निर्वाचक गणाचे सदस्य [1]* * * * यांना या पोटकलमाखाली आपूर्वीच पाचारण केले असून त्याने किंवा त्यांनी रिकामी जागा किंवा रिकाम्या जागा भरण्यासाठी व्यक्तीची किंवा प्रकरणपरत्वे, आवश्यक तितक्या व्यक्तींची निवड केली नाही तर, [2][निवडणूक आयोग] [3][अशा मतदार संघाला किंवा अशा सदस्यांना पुन्हा पाचारण केल्यास, ते अशी कसूर करणार नाहीत अशी त्याची खात्री पटेपर्यंत त्या मतदारसंघाला किंवा अशा सदस्यांना, व्यक्तीची किंवा व्यक्तींची निवड करण्यासाठी पुन्हा पाचारण करण्यास बांधलेला असणार नाही.]

**५४.** [ज्या मतदारसंघातील जागा अनुसूचित जातींसाठी किंवा अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या असतात त्या मतदारसंघातील निवडणुकांबाबत विशेष कार्यपद्धती.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६१' (१९६१ चा ४०), कलम १२ द्वारे निरसित, (२० सप्टेंबर १९६१ रोजी व तेव्हापासून).

**अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता राखून न ठेवलेल्या जागा भरण्यास त्या जातीचे किंवा जनजातीचे सदस्य पात्र असणे.**

**५५.** शंकेस जागा राहू नये म्हणून याद्वारे असे घोषित करण्यात येते की, अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जनजातीचा एखादा सदस्य त्या जातीच्या किंवा अन्य जनजातीच्या सदस्यांसाठी राखून न ठेवलेल्या जागा भरण्यास संविधान व हा अधिनियम यांखाली [4][अथवा, प्रकरणपरत्वे, 'संघ राज्यक्षेत्रे शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) याखाली] एरव्ही पात्र असेल तर, तो अशी जागा भरण्यास निरर्ह असणार नाही.

**[5]५५क.** [संसदीय आणि विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या लढतीतून माघार घेणे.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५८' (१९५८ चा ५८) कलम २२ द्वारे निरसित.

## प्रकरण चार

### मतदान

**मतदानासाठी वेळ निश्चित करणे.**

**५६.** [2][निवडणूक आयोग] कोणत्या वेळेत मतदान घेतले जाईल ते निश्चित करील, आणि अशा तऱ्हेने निश्चित केलेल्या वेळा, विहित केलेली असेल अशा पद्धतीने प्रसिद्ध करण्यात येतील :

परंतु, [7][संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघ] यातील निवडणुकीमध्ये मतदानाच्या कोणत्याही एका दिवसासाठी ठरवून दिलेला एकूण कालावधी आठ तासांपेक्षा कमी असणार नाही.

**आणीबाणीच्या प्रसंगी मतदान तहकूब करणे.**

**५७.** (१) एखाद्या निवडणुकीच्या वेळी, कलम २५ खाली व्यवस्था केलेल्या कोणत्याही मतदान केंद्रावरील किंवा कलम २९ च्या पोटकलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाच्या कामकाजात दंगलीमुळे किंवा उघड हिंसाचारामुळे खंड पडला किंवा अडथळा आला तर, अथवा एखाद्या निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदान केंद्रावर किंवा अशा ठिकाणी, काही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा अन्य पुरेशा कारणामुळे मतदान घेणे शक्य नसेल तर, अशा मतदान केंद्राचा केंद्राध्यक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, अशा ठिकाणी केंद्राध्यक्ष म्हणून काम करणारा निवडणूक निर्णय अधिकारी, मागाहून अधिसूचित करावयाच्या अशा दिनांकापर्यंत मतदान तहकूब केल्याचे घोषित करील, आणि जेव्हा केंद्राध्यक्ष अशा रीतीने मतदान तहकूब करील तेव्हा तो तात्काळ संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला ते कळवील.

(२) जेव्हा जेव्हा पोटकलम (१) खाली मतदान तहकूब केले जाईल तेव्हा तेव्हा, निवडणूक निर्णय अधिकारी, समुचित प्राधिकरणाला आणि निवडणूक आयोगाला तात्काळ ती परिस्थिती कळवील, आणि मतदान पुन्हा केव्हा सुरू करणार तो दिवस, शक्य होईल तितक्या लवकर, नियत करील आणि जेथे मतदान घेतले जाईल ते मतदान केंद्र किंवा ठिकाण, आणि ज्या वेळात घेतले जाईल त्या वेळा निश्चित करील, आणि अशा निवडणुकीत टाकली गेलेली मते, असे तहकूब केलेले मतदान पूर्ण होईपर्यंत मोजणार नाही.

---

१. १९५१ चा अधिनियम ४९, कलम ४४ आणि अनुसूची पाच द्वारे विवक्षित शब्द वगळण्यात आले.
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "निवडणूक आयोगाने यासंबंधात नियत केला असेल आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केला असेल अशा दिनांकापूर्वी" या मजकुराऐवजी दाखल केले.
४. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ आणि अनुसूची दोनद्वारे घातले. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३२ द्वारे घातलेले "किंवा, प्रकरणपरत्वे, भाग ग राज्यांचे शासन अधिनियम, १९५१ अन्वये" हे शब्द विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे वगळण्यात आले.
५. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३३ द्वारे समाविष्ट केले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे "समुचित प्राधिकारी" याऐवजी दाखल केले.
७. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २३ द्वारे "मतदारसंघ" या ऐवजी दाखल केले.

(३) पूर्वोक्त अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, निवडणूक आयोग निदेश देईल त्या पद्धतीने निवडणूक निर्णय अधिकारी, पोटकलम (२) खाली निश्चित केलेला मतदानाचा दिनांक, ठिकाण व वेळा अधिसूचित करील.

[1][ मतपेटया नष्ट करणे, इ. बाबतीत नव्याने मतदान.

५८. (१) जर एखाद्या निवडणुकीमध्ये—

(क) मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी वापरलेली कोणतीही मतपेटी, मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या अभिरक्षेतून बेकायदेशीरपणे पळवली गेली असून अथवा अपघाताने किंवा उद्देशपूर्वक नष्ट केली गेली किंवा गहाळ झाली असून अथवा तिला नुकसान पोचवले गेले किंवा तीत गैरफेर केला गेला असून, त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणच्या मतदानाचा निकाल आजमावता येणार नाही इतपत त्याची व्याप्ती असेल तर, किंवा

[2][ (कक) मत नोंदणीच्या वेळी, मतदान यंत्रात कोणताही यांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास; किंवा ]

(ख) मतदान केंद्रावरील किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी प्रक्रियेमध्ये जीमुळे मतदान निष्फळ होण्याची शक्यता आहे अशी चूक किंवा नियमबाह्य गोष्ट झाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, ती गोष्ट निवडणूक आयोगाला तात्काळ कळवील.

(२) त्यानंतर निवडणूक आयोग, महत्वाचे सर्व परिस्थितिविशेष विचारात घेऊन, एकतर,—

(क) त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणचे मतदान रद्दबातल असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर किंवा त्या ठिकाणी नव्याने मतदान घेण्यासाठी दिवस नियत करील, वेळा निश्चित करील आणि अशा रीतीने नियत केलेला दिवस आणि निश्चित केलेल्या वेळा आपणास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करील, किंवा

(ख) त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणच्या नवीन मतदानाच्या निकालामुळे निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही अथवा [2][ मतदान यंत्रातील यांत्रिक बिघाड किंवा] प्रक्रियेतील चूक किंवा नियमबाह्य गोष्ट महत्वाची नाही अशी खात्री पटल्यास, निवडणुकीचे कामकाज पुढे चालवून, ते पूर्ण करण्यासाठी आपणास योग्य वाटतील असे निदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देऊ शकेल.

(३) ह्या अधिनियमाचे आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे किंवा आदेशांचे उपबंध मूळ मतदानाला ज्याप्रमाणे लागू होतात, त्याप्रमाणे ते अशा प्रत्येक नवीन मतदानाला लागू होतील.]

[3][ मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या कारणावरून मतदान तहकूब करणे किंवा निवडणूक प्रत्यादेशित करणे.

५८क. (१) जर कोणत्याही निवडणुकीत,—

(क) कोणत्याही मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी, (यापुढे या कलमात ठिकाण म्हणून ज्याचा निर्देश केला आहे) त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणच्या मतदानाचा निकाल आजमावता येणार नाही अशा रीतीने बूथ ताब्यात घेण्याची घटना घडली असेल तर; किंवा

(ख) मतमोजणीसाठी असलेल्या कोणत्याही ठिकाणी, त्या ठिकाणच्या मतमोजणीचा निकाल आजमावता येणार नाही अशा रीतीने बूथ ताब्यात घेण्याची घटना घडली तर,

निवडणूक निर्णय अधिकारी, तात्काळ ती गोष्ट निवडणूक आयोगाला कळवील.

---

१. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १३ द्वारे मूळच्या कलम ५८ ऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम १, कलम ९ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(२) कलम (१) खाली निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून अहवाल मिळाल्यावर आणि महत्त्वाचे सर्व परिस्थितिविशेष विचारात घेतल्यानंतर निवडणूक आयोग, एकतर,—

(क) त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणचे मतदान रद्दबातल असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर किंवा त्या ठिकाणी नव्याने मतदान घेण्यासाठी दिवस नियत करील, आणि वेळा निश्चित करील आणि अशा रीतीने नियत केलेला दिवस व निश्चित केलेल्या वेळा त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करील; किंवा

(ख) बूथ ताब्यात घेण्याच्या घटना अनेक मतदान केंद्रांच्या किंवा ठिकाणाच्या बाबतीत घडल्यामुळे त्याचा निवडणुकीच्या निकालावर परिणाम होण्याचा संभव असल्याची किंवा बूथ ताब्यात घेण्यामुळे मतमोजणीवर अशा रीतीने परिणाम झाला आहे की, त्यामुळे निवडणूक निकालावरही त्याचा परिणाम झाला असल्याची खात्री पटल्यास, त्या मतदारसंघातील निवडणुका प्रत्यादेशित करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात " बूथ ताब्यात घेणे " याचा अर्थ, त्यास कलम १३५क मध्ये दिलेल्या अर्थासारखाच असेल.]

**निवडणुकीत मतदान करण्याची पद्धती.**

५९. जेथे मतदान घेतले जाते अशा प्रत्येक निवडणुकीमध्ये, विहित केलेली असेल अशा रीतीने मतपत्रिकेद्वारे मतदान केले जाईल, आणि कोणतीही मते प्रतिपत्राद्वारे स्वीकारली जाणार नाहीत.

**विवक्षित व्यक्ति-वर्गांनी करावयाच्या मतदानासाठी विशेष प्रक्रिया.**

६०. कलम ५९ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या व्यापकतेला बाध न येता, या अधिनियमाखाली नियम करून त्याद्वारे पुढील गोष्टींकरिता उपबंध करता येईल :—

(क) पुढीलपैकी कोणत्याही व्यक्तीला, म्हणजेच,—

[1][(एक) ज्या व्यक्तीला ' लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५० ' (१९५० चा ४३), कलम २० च्या पोटकलम (३) चे उपबंध लागू होतात त्या व्यक्तीला,

(दोन) ज्या व्यक्तीला, उक्त कलम २० च्या पोटकलम ६ चे उपबंध लागू होतात अशा उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या पत्नीला—

कोणत्याही मतदारसंघातील ज्या निवडणुकीमध्ये मतदान घेतले जाते त्या निवडणुकीत अन्य कोणत्याही प्रकारे नव्हे तर डाकेने मतपत्रिका पाठवून मतदान करणे शक्य व्हावे म्हणून; ]

(ख) जी व्यक्ती त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यानुसार प्रतिबंधक स्थानबद्धतेत आहे त्या व्यक्तीला, त्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केले जाईल अशा आवश्यकतांची परिपूर्ती झाली पाहिजे या शर्तीच्या अधीनतेने, मतदान जेथे घेतले जाते अशा मतदारसंघातील निवडणुकीमध्ये अन्य कोणत्याही प्रकारे नव्हे तर, डाकेने मतपत्रिका पाठवून मतदान करणे शक्य व्हावे म्हणून.

**मतदार म्हणून तोतयेगिरी करण्यास आळा घालण्यासाठी विशेष प्रक्रिया.**

[2][६१. मतदार म्हणून तोतयेगिरी करण्यास आळा घालण्याच्या दृष्टीने, या अधिनियमाखाली नियम करून त्यांद्वारे पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल :—

(क) मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी मतपत्रिकेची किंवा मतपत्रिकांची मागणी करणाऱ्या प्रत्येक मतदाराला अशी किंवा अशा मतपत्रिका देण्यापूर्वी त्याच्या अंगठ्यावर किंवा दुसऱ्या कोणत्याही बोटावर पक्क्या शाईचा ठसा उमटवणे,

(ख) ' लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५० ' (१९५० चा ४३) याखाली त्या संदर्भात केलेल्या नियमांनुसार ते मतदान केंद्र ज्या मतदारसंघात आहे त्या मतदारसंघातील मतदारांना, त्यांचे छायाचित्र असलेली किंवा नसलेली ओळखपत्रे पुरवण्यात आली असतील तर, अशा प्रत्येक मतदाराने त्याला मतपत्रिका दिली जाण्यापूर्वी, पूर्वोक्ताप्रमाणे, त्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षापुढे किंवा मतदान अधिकाऱ्यांपुढे आपले ओळखपत्र हजर करणे, आणि

(ग) एखादी व्यक्ती मतपत्रिकेची मागणी करील त्यावेळी तिच्या अंगठ्यावर किंवा दुसऱ्या कोणत्याही बोटावर असा ठसा अगोदरच असेल तर अथवा मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिकाऱ्याने मागणी केल्यावर तिने आपले ओळखपत्र हजर केले नाही तर, त्या मतदान केंद्रावरील मतदानासाठी अशा व्यक्तीला कोणतीही मतपत्रिका देण्यास मनाई करणे.]

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३३ द्वारे उपखंड (एक), (तीन) आणि (चार) ऐवजी समाविष्ट केले. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २४ द्वारे उपखंड (दोन) वगळण्यात आला.

२. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २५ द्वारे मूळच्या कलम ६१ ऐवजी दाखल केले.

[1][निवडणुकीत मतदान यंत्रे. ६१क. या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, विहित करण्यात येईल अशा रीतीने मतदान यंत्राद्वारे मत देणे किंवा ते नोंदवणे या गोष्टींचा प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन निवडणूक आयोग विनिर्दिष्ट करील अशा मतदारसंघात किंवा मतदारसंघांमध्ये अंगीकार करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "मतदान यंत्र" याचा अर्थ, मत देणे किंवा मत नोंदवणे याकरता इलेक्ट्रॉनिकच्या सहाय्याने चालविण्यात येणारे किंवा अन्यथा कोणतेही यंत्र किंवा उपकरण, असा आहे आणि या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या नियमातील मतपेटी किंवा मतपत्रिका यांच्या बाबतीतील कोणत्याही संदर्भाचा अर्थ, अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, अशा मतदान यंत्राचा कोणत्याही निवडणुकीत जेथे जेथे वापर केला जात असेल तेथे तेथे अशा मतदान यंत्राच्या संदर्भासह समावेश असल्याप्रमाणे लावला जाईल.]

मतदानाचा अधिकार. ६२. (१) एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत ज्या व्यक्तीचे नाव त्या त्या काळी समाविष्ट केलेले नाही अशी कोणतीही व्यक्ती त्या मतदारसंघात मतदान करण्यास हक्कदार असणार नाही व या अधिनियमाद्वारे व्यक्तपणे उपबंधित केले आहे तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत, जिचे नाव याप्रमाणे समाविष्ट केलेले आहे अशी प्रत्येक व्यक्ती तेथे मतदान करण्यास हक्कदार असेल.

(२) जी व्यक्ती 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याच्या कलम १६ मध्ये निर्देशिल्यांपैकी कोणत्याही निरर्हतेस पात्र असेल त्या व्यक्तीला कोणत्याही मतदारसंघातील निवडणुकीत मतदान करता येणार नाही.

(३) कोणत्याही व्यक्तीला सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकाच वर्गाच्या एकापेक्षा अधिक मतदारसंघात मतदान करता येणार नाही आणि एखाद्या व्यक्तीने अशा एकापेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये मतदान केल्यास अशा सर्व मतदारसंघातील त्या व्यक्तीची मते रद्दबातल होतील.

(४) एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत एखाद्या व्यक्तीचे नाव एकापेक्षा अधिक वेळा नोंदले गेले असले तरीही, कोणत्याही निवडणुकीमध्ये तिला त्याच मतदारसंघात एकापेक्षा अधिक वेळा मतदान करता येणार नाही आणि त्या व्यक्तीने याप्रमाणे मतदान केले तर, त्या मतदारसंघातील तिची सर्व मते रद्दबातल होतील.

(५) एखाद्या व्यक्तीला कारागृहात बंदिस्त करण्यात आले असेल तर,—मग ती शिक्षा कारावासाची असो किंवा जन्मठेपेची असो किंवा अन्य असो—किंवा ती पोलिसांच्या कायदेशीर हवालतीत असेल तर, त्या व्यक्तीला कोणत्याही निवडणुकीत मतदान करता येणार नाही :

परंतु, त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली प्रतिबंधक स्थानबद्धतेत असणाऱ्या व्यक्तीला, या पोटकलमातील काहीही लागू असणार नाही.

६३. [मतदानाची पद्धत.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६१' (१९६१ चा ४०), कलम १४ द्वारे निरसित (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण पाच

### मतमोजणी

मतमोजणी. ६४. जेथे मतदान घेतले जाते अशा प्रत्येक निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून किंवा त्याचे [2][पर्यवेक्षण व निदेशन] याखाली मतमोजणी केली जाईल [3][आणि निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार], त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि त्याचे [4][मतमोजणी प्रतिनिधी] यांना मोजणीच्या वेळी उपस्थित राहण्याचा अधिकार असेल.

[5][मतमोजणीच्या वेळी मतपत्रिका नष्ट होणे, मतपत्रिका गहाळ होणे, इत्यादी. ६४क. (१) मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही वेळी जर एखाद्या मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या एखाद्या ठिकाणी वापरलेल्या कोणत्याही मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यातून बेकायदेशीरपणे काढून घेतल्या गेल्या किंवा अभावितपणे किंवा उद्देशपूर्वक नष्ट केल्या गेल्या किंवा हरवल्या अथवा जेणेकरून त्या मतदान केंद्राच्या किंवा त्या ठिकाणच्या मतदानाचा निकाल ठरवता येणार नाही इतकी त्यांची खराबी केली गेली किंवा त्यात गैरफेर केला गेला तर, निवडणूक निर्णय अधिकारी त्याबाबत निवडणूक आयोगाला तात्काळ कळवील.

(२) त्यानंतर निवडणूक आयोग सर्व महत्त्वाची परिस्थिती विचारात घेऊन, एकतर,—

(क) मतमोजणी थांबविण्याचा निदेश देईल, त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणचे मतदान रद्दबातल असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर किंवा त्या ठिकाणी नवीन

१. १९८९ चा अधिनियम १, कलम ११ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३६ द्वारे 'पर्यवेक्षण' याऐवजी दाखल केले.
३. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २६ द्वारे "उमेदवार" याऐवजी दाखल केले.
४. १९५६ चा अधिनियम ४७, कलम ३६ द्वारे 'मतदान प्रतिनिधी' याऐवजी दाखल केले.
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३४ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

मतदान घेण्यासाठी दिवस निश्चित करून वेळा ठरवील आणि याप्रमाणे निश्चित केलेला दिनांक व ठरविलेल्या वेळा योग्य वाटेल अशा पद्धतीने अधिसूचित करील, किंवा

(ख) त्या मतदान केंद्रावरील किंवा त्या ठिकाणच्या नवीन मतदानाच्या निकालामुळे निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही अशी खात्री झाल्यास, मतमोजणी पुन्हा सुरू करून ती पूर्ण करण्यासाठी तसेच ज्या निवडणुकीच्या संबंधात मतमोजणी करण्यात आली असेल ती निवडणूक पुढे चालू करून पूर्ण करण्यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देईल.

(३) या अधिनियमाचे आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांचे उपबंध ज्याप्रमाणे मूळ मतदानाला लागू होतात त्याप्रमाणे ते अशा प्रत्येक नवीन मतदानाला लागू होतील.]

६५. मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, कोणत्याही उमेदवारांमध्ये मते समसमान झाल्याचे आढळून आले आणि एका मताची भर पडल्याने त्यापैकी कोणताही उमेदवार, तो निवडून आल्याचे घोषित केले जाण्यास हक्कदार होत असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, चिठ्ठ्या टाकून त्या उमेदवारांबाबत तात्काळ निर्णय घेईल व ज्याच्या नावाची चिठ्ठी येईल त्या उमेदवाराला जणू काही जास्तीचे मत मिळालेले आहे असे मानून पुढील कार्यवाही करील. समसमान मते.

६६. मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत उपबंधित केलेल्या रीतीने त्या निवडणुकीचा निकाल [1][निवडणूक आयोगाचा कोणताही विरुद्ध निदेश नसेल तर, तात्काळ जाहीर करील.] निकाल जाहीर करणे.

६७. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर होईल तितक्या लवकर निवडणूक निर्णय अधिकारी, तो निकाल समुचित प्राधिकरणाला व निवडणूक आयोगाला कळवील आणि लोकसभा किंवा राज्य विधानसभा यांच्या निवडणुकींच्या बाबतीत त्या सभागृहाच्या सचिवांनाही कळवील आणि समुचित प्राधिकरण, निवडलेल्या उमेदवारांची नावे समाविष्ट असलेली घोषणापत्रके शासकीय राजपत्रात प्रकाशित करवील. निकाल कळवणे.

[2][६७क. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून कलम ५३ [3] * * * [4] * * * * किंवा कलम ६६ यांच्या उपबंधाखाली एखादा उमेदवार लोकसभेवर किंवा राज्य विधानसभेवर [5] * * * * निवडून आल्याचे ज्या दिनांकाला घोषित केले जाईल तो दिनांक हा तो उमेदवार निवडून आल्याचा दिनांक असेल.] उमेदवाराच्या निवडणुकीचा दिनांक.

## प्रकरण सहा

### बहुविध निवडणुका

६८. (१) जी कोणतीही व्यक्ती, लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांचा सदस्य म्हणून निवडून आलेली असून तिने त्यापैकी कोणत्याही सभागृहातील आपली जागा स्वीकारली असेल तेव्हा, ती व्यक्ती, [6][ज्या दिनांकी याप्रमाणे ती निवडून आली असेल त्या दिनांकापासून, किंवा अशा दिनांकापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आपल्या स्वाक्षरीची लेखी नोटीस सचिव, निवडणूक आयोग यांच्याकडे सुपूर्द करून आपण कोणत्या सभागृहात काम करू इच्छितो ते सूचित करील], आणि त्यानंतर, ती ज्या सभागृहात काम करू इच्छित नाही त्या सभागृहातील तिची जागा रिकामी होईल. संसदेच्या दोन्ही सभागृहांवर निवड झालेली असताना जागा रिकाम्या करणे.

(२) पूर्वोक्त कालावधीत अशी सूचना पाठवण्यात कसूर केल्यास, राज्यसभेतील तिची जागा तो कालावधी संपल्यानंतर रिकामी होईल.

(३) पोटकलम (१) खाली दिलेली कोणतीही सूचना अंतिम व अप्रत्याहरणीय असेल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३५ द्वारे 'तात्काळ जाहीर करील' या ऐवजी दाखल केले. (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३७ द्वारे समाविष्ट केले.

३. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १५ द्वारे "कलम ५४" हा शब्द व आकडा वगळण्यात आला (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

४. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २७ द्वारे "कलम ५५क" हा शब्द, आकडे व अक्षर वगळण्यात आले.

५. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६६ द्वारे विशिष्ट शब्द वगळण्यात आले.

६. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३८ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी दाखल केले.

[1][(४) या कलमाच्या आणि कलम ६९ च्या प्रयोजनार्थ, एखादी व्यक्ती संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडली जाते, तो दिनांक म्हणजे निवडून आलेल्या सदस्याच्या बाबतीत त्याच्या निवडणुकीचा दिनांक आणि नामनिर्देशित सदस्याच्या बाबतीत **'भारताचे राजपत्र'** यामध्ये त्याचे नामनिर्देशन प्रथम प्रसिद्ध झाल्याचा दिनांक असेल.]

**अगोदरपासून एका सभागृहाचे सदस्य असणाऱ्या व्यक्तींनी संसदेच्या दुसऱ्या सभागृहासाठी निवडून आल्यावर पहिल्या सभागृहातील जागा रिकाम्या करणे.**

६९. (१) जर एखादी व्यक्ती लोकसभेची अगोदरपासून सदस्य असून, तिने अशा सभागृहातील जागा स्वीकारली असेल आणि राज्यसभेचा सदस्य म्हणून तिची निवड झाली असेल तर, [2][याप्रमाणे तिची निवड होईल त्या दिनांकी] लोकसभेतील तिची जागा रिकामी होईल.

(२) जर एखादी व्यक्ती अगोदरपासून राज्यसभेचा सदस्य असून तिने अशा सभागृहातील जागा स्वीकारली असेल आणि लोकसभेचा सदस्य म्हणून तिची निवड करण्यात आली असेल तर, [2][याप्रमाणे तिची निवड होईल त्या दिनांकी] राज्यसभेतील तिची जागा रिकामी होईल.

**लोकसभेच्या दोहोंपैकी एका सभागृहातील किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहातील किंवा त्याच्या दोहोंपैकी एका सभागृहातील एकापेक्षा अधिक जागावर निवडून येणे.**

७०. जर एखादी व्यक्ती, लोकसभेच्या दोहोंपैकी एका सभागृहातील किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहातील किंवा त्याच्या दोहोंपैकी एका सभागृहातील एकापेक्षा अधिक जागांवर निवडून आली असेल तर, त्या व्यक्तीने, [3][अध्यक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, सभापती किंवा विहित केलेले असेल, असे अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे,] एकाव्यतिरिक्त अन्य सर्व जागांचा राजीनामा विहित कालावधीमध्ये दिला नाही तर, त्या सर्व जागा रिकाम्या होतील.

## प्रकरण सात

## निवडणुकीचे निकाल आणि नामनिर्देशने प्रकाशित करणे

**राज्यसभेच्या निवडणुकांचे निकाल आणि अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे.**

[4][७१. कलम १२ खाली काढण्यात आलेल्या अधिसूचनेला अनुसरून कोणत्याही वर्षी निवडणुका घेण्यात आल्यानंतर समुचित प्राधिकरण उक्त निवडणुकांमध्ये, राज्य विधानसभेवर निवडून आलेल्या सदस्यांनी आणि निरनिराळ्या [5][संघ राज्यक्षेत्रांच्या] निर्वाचक गणांच्या सदस्यांनी निवडून दिलेल्या सदस्यांची नावे आणि त्याबरोबर राष्ट्रपतीने अनुच्छेद ८० च्या खंड (१) चा उपखंड (क) याखाली किंवा इतर कोणत्याही उपबंधाखाली राज्यसभेवर नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीची नावे **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील.

७२. [विवक्षित संघ राज्यक्षेत्रांच्या निर्वाचक गणांच्या पुनर्घटनेसाठी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांचे निकाल प्रकाशित करणे.] 'क्षेत्रीय परिषदा अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०३) कलम ६६ द्वारे निरसित.

**लोकसभेच्या आणि राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल प्रकाशित करणे.**

७३. जेव्हा नवीन लोकसभा किंवा नवीन राज्य विधानसभा घटित करण्याच्या प्रयोजनार्थ सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल तेव्हा, [6][(ज्या मतदारसंघातील मतदान, कलम ३० च्या खंड (घ) खाली मुळात निश्चित केलेल्या दिनांकाला काही कारणामुळे घेता आले नाही किंवा ज्या मतदारसंघातील निवडणूक पूर्ण करण्यासाठी नेमलेली मुदत कलम १५३ च्या उपबंधाखाली वाढवण्यात आली आहे, त्याव्यतिरिक्त इतर) सर्व मतदारसंघातील निवडणुकांचा निकाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कलम ५३ किंवा प्रकरणपरत्वे, कलम ६६ च्या उपबंधाखाली जाहीर केल्यानंतर होईल तितक्या लवकर, [7][निवडणूक आयोग,] त्या मतदारसंघासाठी [8]* * * निवडलेल्या सदस्यांची नावे] **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यानंतर ती लोकसभा किंवा ती विधानसभा रीतसर घटित झाल्याचे मानण्यात येईल :

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम ३८ द्वारे समाविष्ट केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे "त्याची अशा रीतीने निवड झाली आहे, असे अधिकथन **भारत सरकारच्या राजपत्रात** प्रकाशित झाल्यानंतर" याऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे दाखल केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४१ द्वारे, कलमे ७१ ते ७५ ऐवजी दाखल केले.
५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ग राज्ये" याऐवजी दाखल केले.
६. १९६७ चा अधिनियम १०, कलम २ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी दाखल केले.
७. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १६ द्वारे "समुचित प्राधिकारी" याऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
८. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे विशिष्ट शब्द वगळले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

परंतु, अशी अधिसूचना काढल्यामुळे,—

[1][(क) (एक) जेथील मतदान कलम ३० च्या खंड (घ) खाली मुळात निश्चित केलेल्या दिनांकाला काही कारणामुळे घेता आले नाही अशा कोणत्याही संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघातील किंवा मतदारसंघांमधील निवडणुकीत मतदान घेणे आणि निवडणूक पूर्ण करणे; किंवा

(दोन) जेथील निवडणुकीची मुदत कलम १५३ च्या उपबंधाखाली वाढवण्यात आलेली आहे, अशा कोणत्याही संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघातील किंवा मतदारसंघामधील निवडणूक पूर्ण करणे,

या गोष्टींना प्रतिबंध होतो; किंवा]

(ख) उक्त अधिसूचना काढली जाण्याच्या लगतपूर्वी कार्य करणारी अशी कोणतीही लोकसभा किंवा राज्य विधानसभा असल्यास तिच्या मुदतीवर परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही.

[2][७३क. नवव्या लोकसभेचे विसर्जन करून नवीन लोकसभा घटित करण्यासाठी सार्वत्रिक निवडणुका घेण्यासंबंधात, कलम ७३ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध.

(क) जम्मू व काश्मीर राज्यातील संसदीय मतदारसंघ विचारात न घेता कलम ७३ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करता येईल; आणि

(ख) निवडणूक आयोग, जम्मू व काश्मीर राज्यातील संसदीय मतदारसंघात स्वतंत्रपणे आणि त्याला उचित वाटेल अशा रीतीने आणि अशा दिनांकी किंवा दिनांकांना निवडणुका घेण्याच्या दृष्टीने उपाययोजना करू शकेल.]

[3][७३कक. लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९८९ याच्या प्रारंभी अस्तित्वात असलेल्या लोकसभेचा कालावधी समाप्त झाल्यानंतर नवीन लोकसभा घटित करण्याच्या प्रयोजनार्थ, सार्वत्रिक निवडणुका घेण्यासंबंधात, कलम ७३ किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध.

(क) आसाम राज्यातील संसदीय मतदारसंघ विचारात न घेता, कलम ७३ खाली अधिसूचना प्रसिद्ध करता येईल; आणि

(ख) निवडणूक आयोग, आसाम राज्यातील संसदीय मतदारसंघात स्वतंत्रपणे आणि त्याला उचित वाटेल अशा रीतीने व अशा दिनांकी किंवा दिनांकांना, निवडणुका घेण्याच्या दृष्टीने उपाययोजना करू शकेल.]

७४. [4][कलम १५क खाली काढण्यात आलेल्या अधिसूचनांना अनुसरून, किंवा] एखाद्या वर्षी कलम १६ खाली काढण्यात आलेल्या अधिसूचनांना अनुसरून निवडणुका घेण्यात आल्यानंतर, समुचित प्राधिकरण उक्त निवडणुकांमध्ये, निरनिराळ्या विधानपरिषद मतदारसंघांसाठी आणि राज्य विधानसभेच्या सदस्यांनी निवडून दिलेल्या सदस्यांची नावे, आणि त्याबरोबर अनुच्छेद १७१ च्या खंड (३) चा उपखंड (ङ) या खाली राज्यपालाने [5]* * * नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तींची नावे शासकीय राजपत्रात अधिसूचित करील.] राज्य विधानपरिषदांच्या निवडणुकांचे निकाल व अशा परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे.

## प्रकरण आठ

### निवडणूक खर्च

[6][७६. हे प्रकरण फक्त लोकसभेच्या आणि राज्य विधानसभेच्या निवडणुकांना लागू होईल. प्रकरणाची प्रयुक्ती.

७७. (१) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवाराला, [7][तो नामनिर्देशित झाल्याचा दिनांक] व त्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरून होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणुकीच्या संबंधात त्याला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेल्या अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीकरवी स्वतंत्र व यथातथ्य हिशेब ठेवावा लागेल. निवडणूक खर्चाचा हिशेब आणि त्याची कमाल मर्यादा.

[8][**स्पष्टीकरण १.**—कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, आदेश किंवा निर्णय विरुद्ध असला तरी, राजकीय पक्षाला किंवा अन्य कोणत्याही अधिसंघाला किंवा व्यक्तिनिकायाला किंवा कोणत्याही

---

१. १९६७ चा अधिनियम १०, कलम २ द्वारे परंतुकाच्या खंड (क) ऐवजी दाखल केले.
२. १९९१ चा अधिनियम ३१, कलम २ द्वारे मूळ कलम ७३क ऐवजी दाखल केले. (१८ एप्रिल, १९९१ रोजी व तेव्हापासून).
३. १९९० चा अधिनियम २, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२१ ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).
४. १९५७ चा अधिनियम ३७, कलम १३ द्वारे दाखल केले.
५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "किंवा, प्रकरणपरत्वे, राजप्रमुखाने" शब्द गाळले.
६. १९५६ चा अधिनियम २७, कलम ४२ द्वारे कलमे ७६ ते ७८ याऐवजी दाखल केले.
७. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ६ द्वारे विशिष्ट शब्दाऐवजी दाखल केले (भूतलक्षी प्रभावासह).
८. १९७४ चा अधिनियम ५८, कलम २ द्वारे समाविष्ट केले (१९ ऑक्टोबर, १९७४ रोजी व तेव्हापासून).

इसमाला (उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त) एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीसंबंधात आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही खर्च, या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, निवडणुकी संबंधात उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही आणि तो तसा केव्हाही होता असे मानले जाणार नाही:

परंतु, या स्पष्टीकरणात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे पुढील गोष्टींवर परिणाम होणार नाही,—

(क) 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अध्यादेश, १९७४' (१९७४ चा १३) याच्या प्रारंभापूर्वी, लोकसभेच्या किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या निवडणुकीतील एखाद्या उमेदवाराची निवडणूक ज्याद्वारे रद्दबातल म्हणून घोषित करण्यात आली असेल किंवा ती रद्द ठरवण्यात आली असेल असा सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, आदेश किंवा निर्णय;

(ख) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी ज्याद्वारे अशा कोणत्याही उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करण्यात आले असेल किंवा ती रद्द ठरवण्यात आली असेल असा उच्च न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, आदेश किंवा निर्णय यांच्याविरुद्ध अशा प्रारंभापूर्वी सर्वोच्च न्यायालयाकडे असे अपील दाखल करण्यात आले नसेल आणि अशा प्रारंभापूर्वी असे अपील दाखल करण्याची मुदत संपून गेली असेल तर, असा न्यायनिर्णय, आदेश किंवा निर्णय.]

[1]* * * * * *

[2][**स्पष्टीकरण २.**—शंकानिरसनार्थ याद्वारे घोषित करण्यात येते की, सरकारी नोकरीतील आणि कलम १२३ च्या खंड (७) मध्ये उल्लेखिलेल्या वर्गांपैकी कोणाही व्यक्तीने त्या खंडाच्या परंतुकात उल्लेखिलेल्याप्रमाणे आपले पदीय कर्तव्य पार पाडताना किंवा ते पार पाडण्याचे अभिप्रेत असताना केलेली कोणतीही व्यवस्था, उपलब्ध करून दिलेल्या सुविधा अथवा तिने केलेली अन्य कोणतीही कृती किंवा गोष्ट यासंबंधात आलेला कोणताही खर्च हा या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, निवडणुकीच्या संबंधात उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही.]

(२) विहित केला जाईल असा सर्व तपशील या हिशेबामध्ये समाविष्ट असेल.

(३) उक्त खर्चाची एकूण रक्कम ही विहित केली जाईल, अशा रकमेपेक्षा जास्त असणार नाही.

**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे हिशेब दाखल करणे.**

७८. [3][(१)] निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, निर्वाचित उमेदवाराच्या निवडणुकीच्या दिनांकापासून किंवा, त्या निवडणुकीमध्ये एकापेक्षा अधिक निर्वाचित उमेदवार असतील आणि त्यांच्या निवडणुकांचे दिनांक भिन्न भिन्न असतील तर, त्या दोहोंपैकी नंतरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, कलम ७७ खाली त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या निवडणूक खर्चाचा हिशेब [4][जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यापुढे] दाखल करावा लागेल व कलम ७७ खाली त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची ती खरी प्रत असेल.

[5][(२) पोटकलम (१) मधील 'जिल्हा निवडणूक अधिकारी' या उल्लेखाचा, संघ राज्यक्षेत्रातील मतदारसंघाच्या संबंधातील अर्थ, त्या मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी याचा उल्लेख म्हणून लावला जाईल.]]

## भाग सहा

## निवडणुकीविषयीचे तंटे

### प्रकरण एक

### निर्वचन

**व्याख्या.**

७९. या भागात आणि [6][भाग सातवा] यामध्ये संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,—

[7][(क) उच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती किंवा न्यायाधीश यांच्या कोणत्याही उल्लेखाचा, न्याय आयुक्ताचे न्यायालय असणाऱ्या संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, न्याय आयुक्ताचे उक्त न्यायालय किंवा न्याय आयुक्त किंवा, प्रकरणपरत्वे, कोणताही अपर न्याय आयुक्त यांचा उल्लेख म्हणून लावला जाईल;]

---

१. १९८९ चा अधिनियम १, कलम १२ द्वारे स्पष्टीकरण २ वगळण्यात आले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
२. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (भूतलक्षी प्रभावासह).
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३६ द्वारे कलम ७८ ला त्या कलमाचे पोटकलम (१) हा नवीन क्रमांक देण्यात आला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे "निर्वाचन अधिकारी" याऐवजी दाखल केले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे समाविष्ट केले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे 'भाग सात आणि आठ' याऐवजी समाविष्ट केले.
७. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे समाविष्ट केले; १९५६ चा अधिनियम २७ कलम ४३ द्वारे मूळचा खंड (क) वगळण्यात आला होता.

[1][(ख) "उमेदवार" याचा अर्थ, कोणत्याही निवडणुकीत उमेदवार म्हणून रीतसर नामनिर्देशित झालेली किंवा आपण तसा उमेदवार असल्याचा दावा सांगणारी व्यक्ती, असा आहे; ]

(ग) "खर्च" याचा अर्थ, निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेचा किंवा तदानुषंगिक असा सर्व खर्च व व्यय, असा आहे;

(घ) "निवडणूकविषयक अधिकार" याचा अर्थ, निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याचा किंवा उभे न राहण्याचा, किंवा उमेदवारी [2][मागे घेण्याचा किंवा ती मागे न घेण्याचा,] अथवा मतदान करण्याचा किंवा मतदानापासून परावृत्त होण्याचा एखाद्या व्यक्तीचा अधिकार, असा आहे;

[3][(ङ) "उच्च न्यायालय" याचा अर्थ, निवडणूक तक्रारअर्ज ज्या निवडणुकीशी संबंधित आहे ती निवडणूक ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये घेतली गेली असेल ते उच्च न्यायालय, असा आहे; ]

(च) "निर्वाचित उमेदवार" याचा अर्थ, रीतसर निवडून आलेला म्हणून ज्याचे नाव कलम ६७ खाली प्रकाशित करण्यात आले असेल तो उमेदवार, असा आहे.

## प्रकरण दोन

### [4][उच्च न्यायालयाला] निवडणूक तक्रारअर्ज सादर करणे

८०. या भागाच्या उपबंधानुसार, निवडणूक तक्रारअर्ज सादर केल्याखेरीज कोणतीही निवडणूक प्रश्नास्पद करता येणार नाही. **निवडणूक तक्रारअर्ज.**

[5][८०क. (१) उच्च न्यायालय हे निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असणारे न्यायालय असेल. **उच्च न्यायालयाने निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा करणे.**

(२) सामान्यतः उच्च न्यायालयाचा न्यायाधीश एकटा अशा अधिकारितेचा वापर करील आणि मुख्य न्यायमूर्ती त्या प्रयोजनासाठी वेळोवेळी एक किंवा अधिक न्यायाधीशांची योजना करील :

परंतु, जेव्हा उच्च न्यायालय फक्त एकाच न्यायाधीशाचे बनलेले असेल तेव्हा, तो त्या न्यायालयाकडे सादर केलेल्या सर्व निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा करील.

(३) उच्च न्यायालय स्वविवेकानुसार न्यायाच्या किंवा सोयीच्या दृष्टीने, एखाद्या निवडणूक तक्रारअर्जाची पूर्णतः किंवा अंशतः उच्च न्यायालयाच्या कार्यस्थानाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी संपरीक्षा करू शकेल.]

८१. (१) कोणतीही निवडणूक प्रश्नास्पद करणारा निवडणूक तक्रारअर्ज अशा निवडणुकीतील कोणत्याही उमेदवाराला अथवा कोणत्याही मतदाराला, [6][निर्वाचित उमेदवाराच्या निवडणुकीच्या दिनांकापासून अथवा त्या निवडणुकीत एकाहून अधिक उमेदवार निवडून आले असून त्यांच्या निवडणुकांचे दिनांक वेगवेगळे असतील तर, त्या दोहोंपैकी नंतरच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत—पण त्याआधी नव्हे— कलम १०० चे [7][पोटकलम (१) आणि कलम १०१ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी एका किंवा अधिक कारणांवरून [4][उच्च न्यायालयाकडे] सादर करता येईल.] **तक्रारअर्ज सादर करणे.**

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात "मतदार" याचा अर्थ, निवडणूक तक्रारअर्ज ज्या निवडणुकीशी संबंधित आहे त्या निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क असलेली व्यक्ती, असा आहे,—मग तिने अशा निवडणुकीत मतदान केलेले असो वा नसो.

[8]* * * * * * *

---

१. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ७ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल केले (भूतलक्षी प्रभावासह).
२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३७ द्वारे "मागे घेणे" याऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे खंड (ङ) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे 'निवडणूक आयोगाला' या शब्दाऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
५. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. १९५६ चा अधिनियम २७, कलम ४४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
७. वरील अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे "पोटकलम (१) व (२)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.
८. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३९ द्वारे पोटकलम (२) वगळण्यात आले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

[1][ (३) प्रत्येक निवडणूक तक्रारअर्जासोबत, त्या तक्रारअर्जात जितक्या उत्तरवादींचा उल्लेख केलेला असेल, तितक्या त्याच्या प्रती * * * जोडाव्या लागतील आणि अशी प्रत्येक प्रत, ही तक्रारअर्जाची खरी प्रत असल्याचे अर्जदाराला स्वतःच्या सहीने साक्षांकित करावे लागेल.]

[3][तक्रारअर्जातील पक्षकार.

८२. तक्रारअर्जदाराला त्याच्या तक्रारअर्जाचे उत्तरवादी म्हणून पुढील व्यक्तींना सामील करून घ्यावे लागेल, त्या अशा :—

(क) जेव्हा तक्रारअर्जदार, निर्वाचित उमेदवारांपैकी सर्वांची किंवा कोणत्याही उमेदवाराची निवडणूक रद्दबातल म्हणून घोषित करण्यात यावी या मागणीच्या जोडीला आणखी, तो स्वतः किंवा अन्य कोणीही उमेदवार रीतसर निवडून आला आहे असे घोषित केले जाण्याची मागणी करत असेल तेव्हा, तक्रार अर्जदाराव्यतिरिक्त निवडणूक लढवणारे इतर सर्व उमेदवार, आणि जेथे अशा आणखी घोषणेची मागणी केलेली नसेल तेथे सर्व निवडून आलेले उमेदवार; आणि

(ख) ज्याच्याविरुद्ध तक्रारअर्जात, कोणत्याही भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात आला असेल असा अन्य कोणताही उमेदवार.]

[4][तक्रारअर्जातील मजकूर.

८३. (१) निवडणूक तक्रारअर्ज करताना,—

(क) ज्यावर तक्रारअर्जदार विसंबून असतो अशा महत्त्वाच्या तथ्यांचे संक्षिप्त कथन त्यामध्ये समाविष्ट करावे लागेल ;

(ख) तक्रारअर्जदाराने अभिकथन केलेल्या कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराचा तपशील तसेच असा भ्रष्टाचार ज्यांनी केला असे त्यात म्हटले असेल त्या व्यक्तींची नावे आणि असे प्रत्येक भ्रष्टाचारकृत्य केल्याचा दिनांक व ठिकाण यांचे यथाशक्य संपूर्ण विवरण त्यामध्ये द्यावे लागेल; आणि

(ग) त्यावर तक्रारअर्जदाराला सही करावी लागेल व वादकथनांच्या सत्यापनासाठी 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) यामध्ये विहित केलेल्या पद्धतीने त्याचे सत्यापन करावे लागेल :

[5][परंतु, जेव्हा तक्रारअर्जदार एखाद्या भ्रष्टाचाराचे अभिकथन करील तेव्हा, अशा भ्रष्टाचाराच्या अभिकथनाला आणि त्याच्या तपशिलाला पुष्टी देण्यासाठी तक्रारअर्जासोबत, विहित केलेल्या नमुन्यात प्रतिज्ञालेखही सादर करावा लागेल.]

(२) तक्रारअर्जासोबत जोडलेल्या कोणत्याही अनुसूचीवर किंवा जोडपत्रावरही तक्रारअर्जदाराला सही करून तक्रारअर्जाच्या सत्यापनाच्या पद्धतीनेच त्याचे सत्यापन करावे लागेल.]

[6][तक्रारअर्जदाराला मागता येईल असा अनुतोष.

८४. तक्रारअर्जदाराला, निर्वाचित उमेदवारांपैकी सर्वांची किंवा कोणत्याही उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करण्यात यावे या मागणीच्या जोडीला आणखी, तो स्वतः किंवा अन्य कोणताही उमेदवार रीतसर निवडून आल्याचे घोषित करण्यात यावे अशीही मागणी करता येईल.]

८५. [तक्रारअर्ज स्वीकारल्यानंतरची कार्यपद्धती.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६६' (१९६६ चा ४७) कलम ४० द्वारे निरसित.

## प्रकरण तीन

### निवडणुकांमधील तक्रारअर्जांची संपरीक्षा

[7][निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा.

८६. (१) उच्च न्यायालय, जो निवडणूक तक्रारअर्ज कलम ८१ किंवा कलम ८२ किंवा कलम ११७ च्या उपबंधानुरूप नाही असा तक्रारअर्ज काढून टाकील.

**स्पष्टीकरण.**— या पोटकलमाखालील निवडणूक तक्रारअर्ज काढून टाकणारा उच्च न्यायालयाचा आदेश हा कलम ९८ च्या खंड (क) खाली देण्यात आलेला आदेश मानण्यात येईल.

(२) निवडणूक तक्रारअर्ज उच्च न्यायालयाला सादर केला गेल्यावर, शक्य तितक्या लवकर तो तक्रारअर्ज कलम ८० क च्या पोटकलम (२) खाली निवडणूक तक्रारअर्जांच्या संपरीक्षेच्या कामासाठी, मुख्य न्यायाधीशाने योजना केलेल्या न्यायाधीशाकडे किंवा अशा न्यायाधीशांपैकी एकाकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल.

---

१. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १७ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ३९ द्वारे "आणि निवडणूक आयोगाच्या उपयोगाकरिता आणखी एक प्रत" हे शब्द वगळण्यात आले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. १९५६ चा अधिनियम २७, कलम ४५ द्वारे कलम ८२ ऐवजी दाखल केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४६ द्वारे कलम ८३ ऐवजी दाखल केले.
५. १९६१ चा अधिनियम ४०, कलम १८ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
६. १९५६ चा अधिनियम २७, कलम ४७ द्वारे कलम ८४ ऐवजी दाखल केले.
७. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४१ द्वारे कलमे ८६ ते ९२ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(३) जेव्हा एकाच निवडणुकीच्या संबंधात एकापेक्षा अधिक निवडणूक तक्रारअर्ज उच्च न्यायालयाला सादर केले असतील तेव्हा, ते सर्व तक्रारअर्ज संपरीक्षेसाठी एकाच न्यायाधीशाकडे निर्देशित केले जातील व तो न्यायाधीश स्वविवेकानुसार त्यांची स्वतंत्रपणे किंवा त्यांचा एक अथवा त्याहून अधिक गट करून संपरीक्षा करू शकेल.

(४) आधीच उत्तरवादी न झालेला कोणताही उमेदवार संपरीक्षा सुरू झाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत, त्याने उच्च न्यायालयाला अर्ज केला असता आणि उच्च न्यायालय वादखर्चाच्या प्रतिभूतीबाबत देईल अशा आदेशाच्या अधीनतेने, उत्तरवादी म्हणून सामील केला जाण्यास हक्कदार असेल.

**स्पष्टीकरण.**––हे पोटकलम आणि कलम ९७ यांच्या प्रयोजनार्थ, तक्रारअर्जाची संपरीक्षा ही उत्तरवादींनी उच्च न्यायालयात हजर होऊन, अर्जात करण्यात आलेल्या मागणीला किंवा मागण्यांना उत्तर देण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून सुरू होत असल्याचे मानण्यात येईल.

(५) तक्रारअर्जाची संपरीक्षा निःपक्ष व परिणामकारक होण्याची निश्चिती करण्यासाठी आपल्या मते तशी आवश्यकता असल्यास, उच्च न्यायालय, वादखर्चासंबंधीच्या किंवा त्याला अन्यथा योग्य वाटेल अशा अटींवर, तक्रारअर्जात अभिकथन करण्यात आलेल्या कोणत्याही भ्रष्टाचार कृत्याचा तपशील दुरुस्त करण्यास किंवा त्याचा विस्तार करण्यास अनुज्ञा देऊ शकेल, परंतु, ज्या दुरुस्तीमुळे तक्रारअर्जात पूर्वी अभिकथन न केलेल्या भ्रष्टाचाराचा तपशील नव्याने प्रविष्ट होईल, अशा प्रकारची कोणतीही दुरुस्ती तक्रारअर्जात करण्यास ते अनुज्ञा देणार नाही.

(६) निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेचे काम हे, त्या संपरीक्षेसंबंधात न्यायानुकूलतेच्या दृष्टीने व्यवहार्य असेल तेथवर, रोजच्या रोज चालू ठेवून पूर्ण करण्यात येईल––मात्र एरव्ही पुढील दिवसापर्यंत तहकूब करावयाचे संपरीक्षेचे काम त्या पलिकडेदेखील तहकूब करणे उच्च न्यायालयाला काही कारणास्तव आवश्यक वाटले तर, त्याला ती कारणे नमूद करावी लागतील.

(७) प्रत्येक निवडणूक तक्रारअर्जाची संपरीक्षा शक्य तेवढ्या त्वरेने केली जाईल आणि निवडणूक तक्रारअर्ज उच्च न्यायालयाला संपरीक्षेसाठी सादर करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत संपरीक्षेचे काम पूर्ण करण्यासाठी नेटाने प्रयत्न केला जाईल.

८७. (१) हा अधिनियम आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रत्येक निवडणूक तक्रारअर्जाची संपरीक्षा, शक्य तितपत 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दाव्यांच्या संपरीक्षेत लागू होणाऱ्या कार्यपद्धतीनुसार, उच्च न्यायालयाला केली जाईल : उच्च न्यायालयापुढील कामकाजांची पद्धती.

परंतु, एखाद्या साक्षीदाराचा किंवा काही साक्षीदारांचा साक्षीपुरावा तक्रारअर्जाच्या निकालाच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही अथवा असा साक्षीदार वा असे साक्षीदार देणारा पक्षकार क्षुल्लक कारणावरून किंवा कार्यवाहीला विलंब लावण्याच्या दृष्टीने तसे करीत आहे असे उच्च न्यायालयाचे मत झाल्यास, त्याला अशा साक्षीदाराची किंवा साक्षीदारांची तपासणी करण्यास नकार देण्याचा स्वविवेकाधिकार असेल, मात्र, त्याला त्याबद्दलची कारणे नमूद करावी लागतील.

(२) 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) याचे उपबंध, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेला सर्व बाबतीत लागू होत असल्याचे मानण्यात येईल.]

९३. कोणत्याही अधिनियमितीमध्ये विरुद्ध असे काहीही असले तरी, एखादा दस्तऐवज हा रीतसर मुद्रांकित केलेला किंवा नोंदवलेला नाही या कारणावरून तो निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेमध्ये पुराव्यात अग्राह्य होणार नाही. कागदोपत्री पुरावा.

९४. कोणत्याही साक्षीदाराला किंवा अन्य व्यक्तीला निवडणुकीत तिने कोणाला मत दिले हे सांगण्यास भाग पाडले जाणार नाही. मतदानाच्या गुप्ततेचा भंग करावयाचा नाही.

९५. (१) कोणत्याही साक्षीदाराला, तक्रारअर्जाच्या संपरीक्षेतील वादविषयाशी संबद्ध अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास असा साक्षीदार गुन्ह्यात गोवला जाईल अथवा तो गोवला जाण्यास ते उत्तर साधक होईल अथवा त्यामुळे तो कोणत्याही दंडास किंवा समपहरणास पात्र होईल या कारणावरून अशा प्रकारचे उत्तर देण्यापासून माफी दिली जाणार नाही: गुन्ह्यात गोवणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि दायित्व-निराकरण प्रमाणपत्र.

परंतु,––

(क) जो साक्षीदार, त्याने ज्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक करण्यात आले आहे, त्या सर्व प्रश्नांची खरी उत्तरे देईल, तो साक्षीदार [1][उच्च न्यायालयाकडून] दायित्वनिराकरण प्रमाणपत्र मिळण्यास हक्कदार होईल, आणि

(ख) [1][उच्च न्यायालयाने] किंवा त्याच्यासमोर विचारलेल्या प्रश्नाला साक्षीदाराने दिलेले उत्तर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीत त्याच्याविरुद्ध पुराव्यात ग्राह्य असणार नाही, मात्र पुराव्यात खोटी साक्ष देण्याच्या गुन्ह्याबद्दल होणारी कोणतीही फौजदारी कार्यवाही याला अपवाद राहील.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४२ द्वारे "अधिकरण" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(२) जेव्हा कोणत्याही साक्षीदाराला दायित्वनिराकरण प्रमाणपत्र देण्यात आलेले असते तेव्हा, असे प्रमाणपत्र ज्याच्याशी संबंधित आहे त्या बाबीमधून उद्‌भवणाऱ्या 'भारतीय दंड संहिता' ( १८६० चा ४५) प्रकरण नऊ'क' खालील किंवा या अधिनियमाच्या भाग सात खालील कोणत्याही दोषारोपाच्या प्रतिवादादाखल ते मांडता येईल आणि त्यासंबंधात तो निखालस व संपूर्ण बचाव ठरेल, पण या अधिनियमाद्वारे किंवा अन्य कोणत्याही कायद्याद्वारे निवडणुकीच्या संबंधात त्याच्यावर लादण्यात आलेल्या कोणत्याही निरर्हतेतून तो मुक्त झाल्याचे मानले जाणार नाही.

साक्षीदारांचा खर्च.

९६. [१][उच्च न्यायालय,] कोणत्याही व्यक्तीला साक्षीपुरावा देण्यास उपस्थित होण्यासाठी आलेला वाजवी खर्च तिला मंजूर करू शकेल— आणि [१][उच्च न्यायालयाने] अन्यथा निदेश दिला नसेल तर, तो खर्च दावा खर्चाचा एक भाग मानण्यात येईल.

जागेबाबत दावा सांगितला असता प्रत्यारोप करणे.

९७. (१) जेव्हा एखाद्या निवडणूक तक्रारअर्जामध्ये निवडून आलेल्या उमेदवाराव्यतिरिक्त अन्य कोणताही उमेदवार रीतसर निवडून आला असल्याची घोषणा व्हावी अशी मागणी केलेली असेल तेव्हा असा उमेदवार निवडून आला असता आणि त्याची निवडणूक प्रश्नास्पद करणारा तक्रारअर्ज सादर करण्यात आला असता तर, अशा उमेदवाराची निवडणूक रद्दबातल झाली असती हे शाबीत करण्यासाठी, निवडून आलेला उमेदवार किंवा अन्य कोणताही पक्षकार पुरावा देऊ शकेल :

परंतु, [२][संपरीक्षेच्या प्रारंभ] दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत, निवडून आलेल्या उमेदवाराने किंवा पूर्वोक्त अशा अन्य कोणत्याही पक्षकाराने तसे करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल [१][उच्च न्यायालयाला] नोटीस दिलेली आहे आणि अनुक्रमे कलमे ११७ व ११८ यांमध्ये निर्देशिलेली प्रतिभूति व जास्तीची प्रतिभूतीसुद्धा दिलेली आहे असे झाल्याशिवाय त्याला असा पुरावा देण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रत्येक नोटिशीबरोबर, निवडणूक तक्रारअर्जाच्या बाबतीत कलम ८३ अनुसार आवश्यक असलेले निवेदन आणि तपशील [३]* * * हे द्यावे लागेल आणि त्यावर तशाच रीतीने स्वाक्षरी आणि सत्यापन करावे लागेल.

उच्च न्यायालयाचा निर्णय.

९८. निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेच्या समाप्तीनंतर [१][उच्च न्यायालय],—

(क) निवडणूक तक्रारअर्ज खारीज करणारा ; किंवा

(ख) [४][निवडून आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उमेदवारांची] निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करणारा ; किंवा

(ग) [४][निवडून आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उमेदवारांची] निवडणूक रद्दबातल असल्याचे आणि अर्जदार किंवा अन्य कोणताही उमेदवार रीतसर निवडून आल्याचे घोषित करणारा ; [५]* * *

[५]* * * * * * *

आदेश देईल.

उच्च न्यायालयाने द्यावयाचे अन्य आदेश.

९९. (१) कलम ९८ खाली आदेश देण्याच्या वेळी [१][उच्च न्यायालय],—

[६][(क) जेव्हा तक्रारअर्जात, निवडणुकीच्या वेळी एखादा भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप केलेला असेल तेव्हा,—

(एक) निवडणुकीमध्ये [७]* * * * कोणताही भ्रष्टाचार करण्यात आल्याचे शाबीत झाले आहे किंवा नाही, त्याबद्दलचा निष्कर्ष आणि त्या भ्रष्टाचाराचे स्वरूप; आणि

(दोन) ज्या व्यक्ती कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराबद्दल दोषी असल्याचे संपरीक्षेमध्ये शाबीत झाले असेल, अशा काही व्यक्ती असल्यास, त्या सर्व व्यक्तींची नावे आणि त्या भ्रष्टाचाराचे स्वरूप ; आणि]

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४२ द्वारे 'अधिकरण' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५२ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ५२ द्वारे "यादी" हा शब्द गाळला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ५३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ५३ द्वारे, "किंवा" हा शब्द आणि "खंड (घ)" वगळण्यात आला.
६. वरील अधिनियमाच्या कलम ५४ द्वारे खंड (क) ऐवजी दाखल करण्यात आला.
७. १९५८ चा अधिनियम ५८, कलम २९ द्वारे विवक्षित शब्द वगळण्यात आले.

(ख) प्रदेय दावाखर्चाची एकूण रक्कम निश्चित करणारा आणि ज्या व्यक्तींनी व ज्या व्यक्तींकडे तो खर्च द्यावयाचा असेल त्यांची नावे विनिर्दिष्ट करणारा;
आदेशही देईल :

परंतु, खंड (क) च्या उपखंड (दोन) खालील आदेशात [१][तक्रारअर्जाला पक्षकार नसणारी व्यक्ती नामनिर्दिष्ट केली जाणार नाही,] मात्र,—

(क) जर त्या व्यक्तीला, [२][उच्च न्यायालयासमोर] उपस्थित होण्याची आणि तिचे नाव समाविष्ट का केले जाऊ नये याचे कारण दाखवण्याची नोटीस दिली असेल; आणि

(ख) त्या नोटीशिला अनुसरून ती व्यक्ती न्यायालयासमोर उपस्थित झाल्यास, [२][उच्च न्यायालयाने] ज्याची पूर्वीच तपासणी केली असून, ज्याने तिच्याविरूद्ध पुरावा दिला आहे अशा कोणत्याही साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची आणि आपल्या बचावार्थ पुरावा मागविण्याची आणि आपले म्हणणे मांडण्याची संधी तिला देण्यात आली असेल,
तर गोष्ट अलाहिदा.

[३][(२) हे कलम आणि १०० वे कलम यांमध्ये "प्रतिनिधी" याचा अर्थ, कलम १२३ मधील अर्थाप्रमाणे आहे.]

**निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करण्यासाठी लागणारी कारणे.**

१००. [४][(१) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, जर [२][उच्च न्यायालयाचे] मत असे असेल की,—

(क) निवडून आलेला उमेदवार निवडणुकीच्या दिनांकास ती जागा भरण्यासाठी निवडला जाण्यास संविधानाखाली किंवा या अधिनियमाखाली [५][किंवा 'संघ राज्यक्षेत्रे शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०)] याखाली अर्ह नव्हता किंवा निरर्ह होता; किंवा

(ख) निवडून आलेल्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने अथवा निवडून आलेल्या उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणताही भ्रष्टाचार केला आहे; किंवा

(ग) कोणतेही नामनिर्देशनपत्र चुकीने नाकारले गेले आहे; किंवा

(घ) निवडणुकीच्या निकालाचा निवडून आलेल्या उमेदवाराशी जेथवर संबंध असेल तेथवर त्या निवडणुकीवर,—

(एक) कोणत्याही नामनिर्देशनाचा अयोग्यपणे स्वीकार केल्यामुळे, किंवा

(दोन) निवडून आलेल्या उमेदवाराच्या [६][निवडणूक प्रतिनिधीहून अन्य प्रतिनिधीने] निवडून आलेल्या उमेदवाराच्या हितार्थ केलेल्या कोणत्याही भ्रष्टाचारामुळे, किंवा

(तीन) कोणतेही मत अयोग्य रीतीने स्वीकारणे, नाकारणे किंवा फेटाळणे अथवा जे रद्दबातल आहे असे कोणतेही मत स्वीकारणे यांमुळे, किंवा

(चार) संविधानाचे किंवा या अधिनियमाचे अथवा या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे वा आदेशांचे अनुपालन न केल्यामुळे,

लक्षणीय परिणाम झाला आहे असे असेल तर, [२][उच्च न्यायालय] निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करील.]

[७][(२)] [२][उच्च न्यायालयाच्या] मते, निवडून आलेला उमेदवार, त्याच्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नव्हे तर, अन्य प्रतिनिधीमार्फत [८]* * * कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल दोषी असला तरी, जर, [२][उच्च न्यायालयाची] अशी खात्री झाली की,—

(क) असा भ्रष्टाचार उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने निवडणुकीत केला नव्हता आणि अशा प्रत्येक प्रकारचा भ्रष्टाचार उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या आदेशांविरूद्ध आणि [९][त्याच्या संमतीखेरीज] केला गेला होता;

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४२ द्वारे 'अधिकरण' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५४ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ५५ द्वारे पोटकलम (१) व (२) ऐवजी दाखल केले.
५. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन यांद्वारे समाविष्ट केले; विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "किंवा भाग गे राज्य शासन अधिनियम, १९५१ (१९५१ चा ४९)" हा मजकूर वगळण्यात आला.
६. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३० द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले.
७. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५५ द्वारे पोटकलम (३) ला पोटकलम (२) असा नवीन क्रमांक दिला.
८. वरील अधिनियमाच्या कलम ५५ द्वारे विवक्षित शब्द गाळले.
९. वरील अधिनियमाच्या कलम ५५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[1]* * * * * * * *

(ग) उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने, निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार [2]* * * * होऊ नये म्हणून सर्व वाजवी उपाय योजले होते ; आणि

(घ) ही निवडणूक सर्व बाबतींत उमेदवाराच्या किंवा त्याच्या कोणत्याही प्रतिनिधीच्या कोणत्याही भ्रष्टाचारापासून [2]* * * * * मुक्त होती,

तर, [3][उच्च न्यायालय] त्या निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक रद्दबातल नाही असा निकाल देईल.

निर्वाचित उमेदवारापेक्षा वेगळा उमेदवार निवडून आल्याचे ज्या कारणांस्तव घोषित करता येईल ती कारणे.

१०१. जिने निवडणूक तक्रारअर्ज दाखल केला आहे अशा कोणत्याही व्यक्तीने जर निर्वाचित उमेदवाराची निवडणूक प्रश्नास्पद करण्याव्यतिरिक्त आणखी, ती स्वतः किंवा अन्य कोणताही उमेदवार रीतसर निवडून आलेला आहे अशी घोषणा केली जाण्याची मागणी केली असेल आणि [3][उच्च न्यायालयाचे] असे मत असेल की,—

(क) वस्तुतः अर्जदाराला किंवा अशा अन्य उमेदवाराला कायदेशीर मताधिक्य मिळाले आहे; किंवा

(ख) निर्वाचित उमेदवाराला भ्रष्टाचारामुळे [4]* * * मते मिळाली नसती तर, एरव्ही अर्जदाराला किंवा अशा अन्य उमेदवाराला कायदेशीर मताधिक्य मिळाले असते, तर, [3][उच्च न्यायालय] निर्वाचित उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करून नंतर अर्जदार किंवा, प्रकरणपरत्वे, असा अन्य उमेदवार रीतसर निवडून आल्याचे घोषित करील.

मते समसमान झाल्यास त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती.

१०२. जर निवडणूक तक्रारअर्जाच्या संपरीक्षेमध्ये निवडणुकीतील कोणत्याही उमेदवारांना समसमान मते पडली आहेत आणि एका मताची भर पडल्यास त्यांपैकी कोणताही उमेदवार, तो निवडून आल्याचे घोषित केले जाण्यास हक्कदार होईल असे आढळून आले तर,—

(क) या अधिनियमाच्या उपबंधांखाली निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने केलेला निकाल जेथवर त्या उमेदवारांमधील प्रश्न निर्धारित करीत असेल तेथवर, तो तक्रारअर्जाच्या प्रयोजनासाठी परिणामक होईल, आणि

(ख) जेथवर तो प्रश्न असा निर्धारित केला गेला नसेल तेथवर, [3][उच्च न्यायालय] चिठ्ठ्या टाकून त्या प्रश्नाबाबत निर्णय घेईल आणि जिच्या नावाची चिठ्ठी येईल त्या व्यक्तीला जास्तीचे मत मिळाले आहे असे मानून पुढील कार्यवाही करील.

[5][उच्च न्यायालयाचे आदेश कळविणे.

१०३. उच्च न्यायालय, निवडणूक तक्रारअर्जाची संपरीक्षा समाप्त झाल्यानंतर यथाशक्य लवकर, त्या निर्णयाचा आशय निवडणूक आयोगाला आणि संसदेच्या संबंधित सभागृहाचा किंवा संबंधित राज्य विधानमंडळाचा अध्यक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, सभापती यांना कळवील आणि त्यानंतर यथाशक्य लवकर, त्या निर्णयाची अधिप्रमाणित प्रत निवडणूक आयोगाला पाठवील.]

१०४. [अधिकरणाच्या सदस्यांमधील मतभिन्नता.] 'लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २७) कलम ५७ द्वारे निरसित.

१०५. [अधिकरणाचे आदेश अंतिम व निर्णायक असणे.] 'लोक प्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २७) कलम ५८ द्वारे निरसित.

समुचित प्राधिकरणाकडे आदेश पाठविणे आणि त्यांचे प्रकाशन करणे.

१०६. कलम ९८ किंवा कलम ९९ याखाली [3][उच्च न्यायालयाने] दिलेला आदेश मिळाल्यानंतर यथाशक्य लवकर, निवडणूक आयोग आदेशाच्या प्रती समुचित प्राधिकरणाकडे आणि, असा आदेश संसदीय सभागृहाच्या [6]* * * निवडणुकीशी अथवा राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या किंवा दोहींपैकी कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीशी संबंधित असेल तेव्हा, त्या बाबतीत, संबंधित सभागृहाच्या अध्यक्षाकडे, किंवा प्रकरणपरत्वे, सभापतीकडे पाठवील आणि,—

---

१. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३० द्वारे खंड (ख) गाळला.
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५५ द्वारे विवक्षित शब्द गाळले.
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४२ द्वारे 'अधिकरण' या ऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला (दिनांक १४ डिसेंबर १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५६ द्वारे विवक्षित शब्द गाळले.
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४३ द्वारे कलम १०३ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५९ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

[१][(क) जेव्हा तो आदेश संसदीय सभागृहाच्या निवडणुकीशी संबंधित असेल तेव्हा **भारताच्या राजपत्रामध्ये** आणि तसेच संबंधित राज्याच्या **शासकीय राजपत्रामध्ये**; आणि

(ख) जेव्हा तो आदेश राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीशी संबंधित असेल तेव्हा, त्या राज्याच्या **शासकीय राजपत्रात**,
—तो आदेश प्रकाशित करवील.]

[२][१०७. [३][(१) कलम ९८ किंवा कलम ९९ खाली उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे प्रवर्तन स्थगित करण्यासंबंधी प्रकरण चार क यामध्ये समाविष्ट असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, असा प्रत्येक आदेश, उच्च न्यायालयाने तो घोषित केल्याबरोबर परिणामक होईल.] **उच्च न्यायालयाच्या आदेशाची परिणामकता.**

(२) जेव्हा कलम ९८ खालील आदेशाद्वारे, निर्वाचित उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित केले जाते तेव्हा, त्या निर्वाचित उमेदवाराने, त्या घोषणेच्या दिनांकापूर्वी, संसदेचा सदस्य किंवा राज्याच्या विधानमंडळाचा सदस्य म्हणून ज्या कृतींमध्ये आणि कार्यवाहींमध्ये भाग घेतला होता त्या कृती व कार्यवाही, त्या आदेशामुळे विधिबाह्य ठरणार नाहीत, तसेच असा उमेदवार त्याने अशा तऱ्हेने भाग घेतला या कारणास्तव कोणत्याही दायित्वाला किंवा शिक्षेला पात्र होणार नाही.]

## प्रकरण चार

### निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे व त्यांचे अवसान

१०८. [अधिकरणाच्या नियुक्तीपूर्वी तक्रारअर्ज मागे घेणे.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६६' (१९६६ चा ४७) कलम ४५ द्वारे निरसित.

[४][१०९. (१) निवडणूक तक्रारअर्ज, फक्त उच्च न्यायालयाच्या परवानगीने मागे घेता येईल. **निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे.**

(२) पोटकलम (१) खाली निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्यासाठी अर्ज केला जाईल त्या बाबतीत, त्या अर्जाच्या सुनावणीचा दिनांक निश्चित करणारी त्याची नोटीस तक्रारअर्जाच्या अन्य सर्व पक्षकारांना दिली जाईल, आणि ती **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केली जाईल.

११०. (१) एकापेक्षा अधिक तक्रारअर्जदार असल्यास, निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्यासाठी सर्व तक्रारअर्जदारांच्या संमतीशिवाय अर्ज करता येणार नाही. **निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्याची कार्यपद्धती.**

(२) निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्याबाबतचा कोणताही अर्ज, ज्यास मुभा देणे योग्य नाही असा सौदा करून किंवा अशा प्रतिफलाच्या बदल्यात केलेला आहे असे उच्च न्यायालयाचे मत असेल तर, असा अर्ज, मंजूर केला जाणार नाही.

(३) अर्ज मंजूर केला गेला तर,—

(क) उत्तरवादींना त्यासाठी तोवर आलेला संपूर्ण दावाखर्च किंवा उच्च न्यायालयाला योग्य वाटेल असा त्याचा काही भाग, त्यांना देण्यात यावा असा आदेश तक्रारअर्जदाराला दिला जाईल ;

(ख) उच्च न्यायालय, तक्रारअर्ज मागे घेण्याची नोटीस **शासकीय राजपत्रात** आणि ते न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा अन्य प्रकारे प्रकाशित करण्याचा निदेश देईल आणि त्यानंतर, ती नोटीस तदनुसार प्रकाशित केली जाईल;

(ग) जी व्यक्ती स्वतः तक्रारअर्जदार होऊ शकली असती अशा व्यक्तीला, आपणास तक्रारअर्ज मागे घेणाऱ्या पक्षकाराच्या जागी बदली तक्रारअर्जदार म्हणून घेतले जावे यासाठी अशा प्रकाशनानंतर चौदा दिवसांच्या आत, अर्ज करता येईल आणि प्रतिभूतीबाबत काही शर्ती असल्यास त्यांचे अनुपालन केल्यावर ती व्यक्ती, अशा रीतीने बदली तक्रारअर्जदार होण्यास आणि उच्च न्यायालयाला योग्य वाटेल अशा अटींवर कार्यवाही चालू ठेवण्यास हक्कदार होईल.]

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम ५९ द्वारे विवक्षित शब्दाऐवजी दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६० द्वारे कलम १०७ ऐवजी दाखल केले.

३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४४ द्वारे पोटकलम (१) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४६ द्वारे कलम १०९ व ११० ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

तक्रारअर्ज मागे घेतल्याचे वृत्त न्यायालयाने निवडणूक आयोगाला कळविणे.

१११. जेव्हा तक्रारअर्ज मागे घेण्याचा अर्ज [1][उच्च न्यायालयाने] मंजूर केला असेल आणि तक्रारअर्ज मागे घेणाऱ्या व्यक्तीच्या जागी कलम ११० च्या पोटकलम (३) मधील खंड (ग) खाली कोणाही व्यक्तीला बदली तक्रारअर्जदार म्हणून घेण्यात आले नसेल तेव्हा, [1][उच्च न्यायालय] ती गोष्ट निवडणूक आयोगाला कळवील. [2][आणि त्यानंतर निवडणूक आयोग ते वृत्त **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करील.]

[3][निवडणूक तक्रारअर्जाचे अवसान.

११२. (१) कोणताही निवडणूक तक्रारअर्ज, एकमेव अर्जदार असल्यास त्याच्या मृत्यूमुळे किंवा अनेक तक्रारअर्जदार असल्यास त्यांच्यापैकी सर्वांत मागे हयात राहिलेल्या व्यक्तीच्या मृत्यूमुळेच अवसित होईल.

(२) जेव्हा, निवडणूक तक्रारअर्ज पोटकलम (१) खाली अवसित होईल तेव्हा, उच्च न्यायालय ते वृत्त त्याला योग्य वाटेल अशा प्रकारे प्रकाशित करवील.

(३) जी व्यक्ती स्वतः तक्रारअर्जदार होऊ शकली असती अशा कोणत्याही व्यक्तीला आपणांस तक्रारअर्जदाराच्या जागी बदली तक्रारअर्जदार म्हणून घेतले जावे यासाठी, अशा प्रकाशनानंतर चौदा दिवसांच्या आत अर्ज करता येईल आणि प्रतिभूतीबाबत काही शर्ती असल्यास त्यांचे अनुपालन केल्यावर ती व्यक्ती, अशा रीतीने बदली तक्रारअर्जदार होण्यास आणि उच्च न्यायालयाला योग्य वाटेल अशा शर्तींवर कार्यवाही चालू ठेवण्यास हक्कदार होईल.]

उत्तरवादीच्या मृत्यूनंतर तक्रारअर्जाचे अवसान होणे किंवा बदली उत्तरवादी येणे.

११६. निवडणूक तक्रारअर्जाची संपरीक्षा संपण्यापूर्वी जर एकमेव उत्तरवादी मृत्यू पावला किंवा तक्रारअर्जाला विरोध करण्याचा आपला उद्देश नाही अशी त्याने नोटीस दिली अथवा अनेक उत्तरवादींपैकी कोणताही उत्तरवादी मृत्यू पावला असून किंवा त्याने अशी नोटीस दिली असून त्या तक्रारअर्जाला विरोध करणारा अन्य कोणताही उत्तरवादी नसेल तर, [1][उच्च न्यायालय] ह्या घटनेची नोटीस **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करवील, आणि त्यानंतर, जी व्यक्ती स्वतः तक्रारअर्जदार होऊ शकली असती अशा कोणत्याही व्यक्तीला, अर्जाला विरोध करण्यासाठी अशा उत्तरवादीच्या जागी बदली उत्तरवादी म्हणून आपणास घेतले जावे यासाठी, अशा प्रकाशनापासून, चौदा दिवसांच्या आत अर्ज करता येईल, आणि [1][उच्च न्यायालयाला] योग्य वाटेल अशा अटींवर कार्यवाही चालू ठेवण्यास हक्कदार होईल.

## [4][प्रकरण चार-क

## अपिले

[5][सर्वोच्च न्यायालयाकडे अपिले.

**११६क.** (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, उच्च न्यायालयाने कलम ९८ किंवा कलम ९९ यांखाली दिलेल्या प्रत्येक आदेशाविरुद्ध त्यातील कोणत्याही प्रश्नावर (मग तो विधिविषयक असो वा तथ्यविषयक असो) सर्वोच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकेल.

(२) या प्रकरणाखालील प्रत्येक अपील, उच्च न्यायालयाच्या कलम ९८ किंवा कलम ९९ खालील आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत दाखल करावे लागेल:

परंतु, अपीलकर्त्याने या कालावधीत अपील दाखल न करण्याबद्दल त्याच्याजवळ पुरेसे कारण होते अशी सर्वोच्च न्यायालयाची खात्री पटली तर, सर्वोच्च न्यायालय, तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतरही अपील दाखल करून घेऊ शकेल.

उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रवर्तनास स्थगिती.

**११६ख.** (१) उच्च न्यायालयाने कलम ९८ किंवा कलम ९९ खाली काढलेल्या आदेशाच्या प्रवर्तनाच्या स्थगितीसाठी करावयाचा अर्ज, त्या आदेशावर अपील करण्यासाठी दिलेली मुदत संपण्यापूर्वी उच्च न्यायालयाकडे करता येईल आणि उच्च न्यायालय, पुरेसे कारण दाखवले गेले तर आणि त्याला योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर आदेशाचे प्रवर्तन स्थगित करू शकेल; पण, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आल्यानंतर उच्च न्यायालयाकडे असा स्थगितीचा अर्ज करता येणार नाही.

(२) कलम ९८ किंवा कलम ९९ खालील आदेशाविरुद्ध अपील दाखल केलेले असेल तेव्हा, सर्वोच्च न्यायालय, पुरेसे कारण दाखवले गेले तर आणि त्याला योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर, अपील करण्यात आलेल्या आदेशाचे प्रवर्तन स्थगित करू शकेल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४७ द्वारे 'अधिकरण' या शब्दोल्लेखाऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ६१ द्वारे समाविष्ट केले.

३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४८ द्वारे कलमे ११२ ते ११५ यांऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५६ चा अधिनियम २७, कलम ६२ द्वारे समाविष्ट केले.

५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५० द्वारे कलमे ११६ क व ११६ ख यांऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(३) जेव्हा उच्च न्यायालयाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, सर्वोच्च न्यायालयाकडून आदेशाचे प्रवर्तन स्थगित करण्यात येईल तेव्हा, कलम १०७ च्या पोटकलम (१) खाली तो आदेश कधीही परिणामक झाला नव्हता असे समजण्यात येईल, आणि उच्च न्यायालय किंवा प्रकरणपरत्वे; सर्वोच्च न्यायालय, स्थगिती-आदेशाची एक प्रत निवडणूक आयोगाकडे आणि संसदेच्या किंवा संबंधित राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या अध्यक्षाकडे किंवा, प्रकरणपरत्वे, सभापतीकडे तात्काळ पाठवील.

**अपिलाबाबतची प्रक्रिया.**

११६ग. (१) ह्या अधिनियमाच्या आणि त्याखाली नियम केलेले असल्यास त्यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रत्येक अपिलाची सर्वोच्च न्यायालयाकडून, उच्च न्यायालयाने आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेल्या कोणत्याही अंतिम आदेशावरील अपिलाची सुनावणी व निर्णय करण्याच्या बाबतीत लागू असल्याप्रमाणे जवळजवळ तशाच प्रक्रियेनुसार सुनावणी केली जाईल व निर्णय केला जाईल; आणि 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) यातील सर्व उपबंध आणि न्यायालयाचे नियम (प्रतिभूती देण्याबाबतचे आणि न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीबाबतचे उपबंध धरून) शक्य तेथवर अशा अपिलाच्या संबंधात लागू होतील.

(२) अपिलाचा निकाल होताच सर्वोच्च न्यायालय, त्या निर्णयाचा सारांश निवडणूक आयोगाला आणि संसदेच्या किंवा संबंधित राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या अध्यक्षाला किंवा, प्रकरणपरत्वे, सभापतीला कळवील आणि त्यानंतर शक्यतो लवकर निवडणूक आयोगाकडे त्या निर्णयाची अधिप्रमाणित प्रत पाठवील; आणि ती प्रत मिळाल्यानंतर निवडणूक आयोग—

(क) त्याच्या प्रती, कलम १०६ खाली उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रती ज्या प्राधिकरणाकडे पाठविल्या होत्या त्या प्राधिकरणांकडे पाठवून देईल; आणि

(ख) उक्त कलमाखाली ज्या राजपत्रामध्ये किंवा राजपत्रांमध्ये आदेश प्रकाशित केले होते त्यांमध्ये तो निर्णय प्रकाशित करवील.] ]

## प्रकरण पाच

## खर्च आणि खर्चासाठी तारण

**खर्चासाठी तारण.**

[१][११७. (१) निवडणूक तक्रारअर्ज सादर करण्याच्या वेळी, उच्च न्यायालयाच्या नियमानुसार तक्रारअर्जदाराला तक्रारअर्जाच्या खर्चासाठी तारण म्हणून दोन हजार रुपयांची रक्कम उच्च न्यायालयाकडे अनामत ठेवावी लागेल.

(२) निवडणूक तक्रारअर्जाची संपरीक्षा चालू असताना केव्हाही, उच्च न्यायालय, ते निदेश देईल, त्याप्रमाणे खर्चासाठी आणखी तारण सादर करण्याविषयी तक्रारअर्जदाराला फर्मावू शकेल.

**उत्तरवादीकडून खर्चासाठी तारण.**

११८. कोणतीही व्यक्ती, तिने उच्च न्यायालय निदेश देईल असे खर्चासाठी तारण दिल्याखेरीज, कलम ८६ च्या पोटकलम (४) खाली उत्तरवादी म्हणून सामील केली जाण्यास हक्कदार होणार नाही.

**खर्च.**

११९. खर्च उच्च न्यायालयाच्या विवेकाधीन असेल :

परंतु, जेव्हा निवडणूक तक्रारअर्ज, कलम ९८ च्या खंड (क) खाली खारीज करण्यात येईल तेव्हा निवडून आलेला उमेदवार, त्याला तक्रारअर्ज लढवण्यासाठी आलेला खर्च मिळण्याला हक्कदार असेल आणि तदनुसार उच्च न्यायालय, निर्वाचित उमेदवाराच्या बाजूने खर्चासाठी आदेश देईल.]

**तारण अनामतीतून खर्च देणे आणि अशा अनामती परत करणे.**

१२१. (१) जर या भागातील उपबंधांखाली खर्चासंबंधी दिलेल्या कोणत्याही आदेशात, एखाद्या व्यक्तीला कोणत्याही पक्षकाराने खर्च देण्यासंबंधी निदेश देण्यात आलेला असेल तर, असा खर्च पूर्वीच देऊन टाकलेला नसल्यास व ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ खर्च देवविला असेल त्या व्यक्तीने [२][उच्च न्यायालयाला] [३][अशा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये] यासंबंधात लेखी अर्ज केल्यास, असा खर्च संपूर्णतया किंवा शक्य तेथवर, तारण—अनामतीतून व या भागान्वये अशा पक्षकाराने आणखी कोणतीही तारण अनामत ठेवलेली असल्यास त्या जास्तीच्या अनामतीतून तिला दिला जाईल.

(२) जर पोटकलम (१) खाली त्याच पोटकलमामध्ये निर्देशिलेला खर्च दिल्यानंतर, उक्त तारण अनामत रकमेपैकी काही रक्कम शिल्लक राहिली असेल तर, अशी शिल्लक अथवा खर्च देववला नसल्यास किंवा [३][एक वर्षाच्या] उक्त कालावधीमध्ये पूर्वी सांगितल्याप्रमाणे अर्ज केला न गेल्यास, उक्त तारण अनामतींची संपूर्ण रक्कम जिने, अशा अनामत रकमा ठेवल्या आहेत त्या व्यक्तीने किंवा अशी व्यक्ती अनामत रक्कम ठेवल्यानंतर मृत्यू पावली असल्यास, तिच्या वैध प्रतिनिधीने या संबंधात [२][त्या उच्च न्यायालयाला] लेखी अर्ज केल्यावर अशा व्यक्तीला किंवा, प्रकरणपरत्वे, तिच्या वैध प्रतिनिधीला परत केली जाईल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५१ द्वारे कलमे ११७, ११८, ११९, ११९क व १२० यांऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम ५२ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

खर्च वगैरेसंबंधीच्या आदेशांची अंमलबजावणी.

१२२. या भागाच्या उपबंधांखाली खर्चासंबंधी दिलेला कोणताही आदेश, अशा आदेशाद्वारे काही रक्कम प्रदान करण्याचा निदेश ज्या व्यक्तीला दिलेला आहे, त्या व्यक्तीचे निवासस्थान किंवा व्यवसाय-स्थान ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये असेल त्या मूळ अधिकारितेच्या प्रधान दिवाणी न्यायालयापुढे, किंवा जेव्हा असे ठिकाण इलाखा शहरामध्ये असेल तेव्हा तेथे अधिकारिता असणाऱ्या लघुवाद न्यायालयापुढे दाखल करता येईल आणि असे न्यायालय, तो आदेश हा जणू काही त्याच न्यायालयाने दाव्यात केलेला पैसे देण्याबाबतचा हुकूमनामा आहे असे समजून त्याप्रमाणे त्याच रीतीने आणि त्याच प्रक्रियेनुसार त्याची अंमलबजावणी करील, किंवा करवील :

परंतु, जेव्हा असा कोणताही खर्च किंवा त्याचा कोणताही भाग, कलम १२१ च्या पोटकलम (१) खाली केलेल्या अर्जाद्वारे वसूल करता येत असेल तेव्हा, या कलमाखालील कोणताही अर्ज हा [१][अशा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत] करता येणार नाही—मात्र पोट-कलमात निर्देशिलेली तारण-अनामतींची रक्कम अपुरी असल्यामुळे त्या पोटकलमाखाली अर्ज करण्यात आल्यानंतरही खर्चापैकी वसूल होण्याचे बाकी राहिलेल्या रकमेच्या वसुलीसाठी अर्ज करावयाचा नसेल तर, गोष्ट अलाहिदा.

## भाग सात

## [२][भ्रष्टाचारी प्रथा आणि निवडणूकविषयक अपराध]

### [३][प्रकरण एक

### भ्रष्टाचारी प्रथा

भ्रष्टाचारी प्रथा.

१२३. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी या भ्रष्टाचारी प्रथा समजण्यात येतील :—

[४][(१) "लाचलुचपत" म्हणजेच—

(क) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने, दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला—

(क्) निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे राहण्यास किंवा न राहण्यास किंवा उमेदवार म्हणून नाव [५][मागे घेण्यास किंवा न घेण्यास], अथवा

(ख्) निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदाराला मत देण्यास किंवा मतदान न करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे प्रवृत्त करण्याच्या हेतूने, अथवा—

(एक) याप्रमाणे उमेदवार म्हणून उभे राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा [६][आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल किंवा मागे न घेतल्याबद्दल] एखाद्या व्यक्तीला; किंवा

(दोन) मतदान केल्याबद्दल किंवा मतदान न केल्याबद्दल मतदाराला,

बक्षीस म्हणून एखादे परितोषण देणे, देऊ करणे किंवा तसे वचन देणे ;

(ख) (क्) उमेदवार म्हणून उभे राहण्याबद्दल किंवा उभे न राहण्याबद्दल किंवा [६][आपली उमेदवारी मागे घेण्याबद्दल किंवा न घेण्याबद्दल] एखाद्या व्यक्तीने; किंवा

(ख्) एखाद्या व्यक्तीने स्वतः किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने मतदान करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल किंवा एखाद्या मतदाराला मत देण्यास किंवा देण्याचे वर्जिण्यास किंवा उमेदवाराला [५][त्याची उमेदवारी मागे घेण्यास किंवा न घेण्यास] प्रवृत्त करण्याबद्दल किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षीस म्हणून एखादे परितोषण घेणे किंवा घेण्याचा करार करणे.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "परितोषण" या संज्ञेचा अर्थ, आर्थिक परितोषणे किंवा पैशामध्ये किंमत करता येण्यासारखी परितोषणे यांच्यापुरता मर्यादित नाही व त्या मध्ये सर्व स्वरुपाच्या करमणुकीच्या आणि सर्व स्वरुपाच्या मोलमजुरीचा समावेश होतो, पण कोणत्याही निवडणुकीच्या वेळी किंवा निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रामाणिकपणे केलेला आणि कलम ७८ मध्ये निर्देशिलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात रीतसर नोंद केलेला कोणताही खर्च देण्याचा त्यात समावेश होत नाही.]

---

१. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ६५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ६६ द्वारे प्रकरण एक व दोन यांऐवजी दाखल केले (कलमे १२३ ते १२५).
४. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३६ द्वारे खंड (१) ऐवजी दाखल केला.
५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम ५३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(२) गैरवाजवी दडपण म्हणजेच एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [1][उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक विषयक अधिकाराच्या मुक्त वापरामध्ये, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करणे :

परंतु,—

(क) या खंडातील उपबंधाच्या व्यापकतेला बाध न येता, त्यामध्ये, निर्देशिल्याप्रमाणे अशी जी कोणतीही व्यक्ती,—

(एक) कोणत्याही उमेदवाराला किंवा कोणत्याही मतदाराला किंवा ज्या व्यक्तीमध्ये उमेदवाराचा किंवा मतदाराचा हितसंबंध आहे त्या व्यक्तीला, सामाजिक बहिष्कार तसेच जाती बहिष्कार किंवा कोणत्याही जातीतून किंवा समाजातून वाळीत टाकणे यासुद्धा अशा कोणत्याही प्रकारची क्षती पोहोचवण्याची धमकी देईल, किंवा

(दोन) उमेदवाराला किंवा कोणत्याही मतदाराला, तो स्वत: किंवा ज्यामध्ये त्याचा हितसंबंध आहे अशी अन्य व्यक्ती, दैवी अवकृपेचा किंवा धार्मिक रोषाचा बळी होईल किंवा केला जाईल असे समजण्यास प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील,

ती व्यक्ती, या खंडाच्या अर्थानुसार अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या निवडणूकविषयक अधिकाराच्या वापरामध्ये हस्तक्षेप करीत असल्याचे समजण्यात येईल;

(ख) सार्वजनिक धोरणाची घोषणा किंवा सार्वजनिक कार्य करण्याचे वचन किंवा निवडणूकविषयक अधिकारांमध्ये हस्तक्षेप करण्याचा उद्देश नसताना केवळ वैध अधिकाराचा वापर हा, या खंडाच्या अर्थानुसार हस्तक्षेप असल्याचे मानले जाणार नाही.

[2][(३) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने, त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला तिचा धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा किंवा धार्मिक प्रतीकांचा वापर किंवा त्यांना आवाहन अगर राष्ट्रध्वज किंवा राष्ट्रचिन्ह यांसारख्या राष्ट्रीय प्रतीकांचा वापर किंवा त्यांना आवाहन या कारणावरून मतदान करण्यास किंवा मतदान करण्याचे वर्जिण्यास आवाहन करणे :

[3][परंतु, या अधिनियमाखाली उमेदवाराला नेमून दिलेली कोणतीही निशाणी हे या खंडाच्या प्रयोजनार्थ धार्मिक प्रतीक किंवा राष्ट्रीय प्रतीक असल्याचे मानले जाणार नाही.]

(३क) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम करण्यासाठी, धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा या कारणावरून भारतीय नागरिकांच्या निरनिराळ्या वर्गांमध्ये आपापसात शत्रुत्वाची किंवा विद्वेषाची भावना वाढीस लावणे किंवा वाढीस लावण्याचा प्रयत्न करणे.]

[4][(३ख) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम करण्यासाठी सतीच्या प्रथेचा किंवा सती जाण्याचा प्रचार करणे किंवा त्या गोष्टी गौरवान्वित करणे.

*स्पष्टीकरण.*—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "सती" आणि सतीच्या संदर्भात "गौरवान्वित करणे" या शब्दप्रयोगांना 'सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७' (१९८८ चा ३) यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ देण्यात आले आहेत तेच अर्थ असतील.]

(४) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [5][उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही उमेदवाराचे व्यक्तिगत चारित्र्य किंवा वर्तणूक या संबंधातील अथवा त्याच्या उमेदवारीच्या किंवा उमेदवारी मागे घेण्याच्या [6] * * * संबंधातील जे कोणतेही तथ्यविषयक कथन खोटे आहे किंवा जे एकतर खोटे आहे असे त्याला वाटते किंवा जे खरे नाही असे त्याला वाटते असे व ज्यामुळे त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम होण्यासारखा आहे असे वाटण्यास पुरेसा वाव असेल असे तथ्यविषयक कथन प्रकाशित करणे.

---

१. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३६ द्वारे समाविष्ट केले.
२. १९६१ चा अधिनियम ४०, कलम २३ द्वारे खंड (३) ऐवजी दाखल केला (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
३. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (भूतलक्षी प्रभावासह).
४. १९८८ चा अधिनियम ३, कलम १९ द्वारे समाविष्ट केले.
५. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३६ द्वारे समाविष्ट केले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

(५) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [1][उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने पैसे देऊन किंवा अन्यथा वाहन किंवा जलयान भाड्याने घेणे किंवा मिळवणे अथवा कोणत्याही मतदाराला, (उमेदवार, त्याचे कुटुंबीय किंवा त्याचा प्रतिनिधी यांव्यतिरिक्त) मतदानासाठी कलम २५ खाली व्यवस्था केलेल्या मतदान केंद्रावर किंवा कलम २९ च्या पोटकलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी [2][विनाशुल्क नेण्यासाठी किंवा तेथून परत आणण्यासाठी अशा वाहनाचा किंवा जलयानाचा वापर करणे :]

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी संयुक्तपणे, अशा मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी जाण्यासाठी व तेथून परत येण्यासाठी वाहन किंवा जलयान स्वखर्चाने भाड्याने आणणे हे जर, अशा तऱ्हेने भाड्याने आणलेले वाहन किंवा जलयान यांत्रिक शक्तीवर चालणारे नसेल तर, या खंडानुसार भ्रष्टाचार समजला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, एखाद्या मतदाराने मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी जाण्यासाठी किंवा तेथून परत येण्यासाठी स्वखर्चाने एखादे सार्वजनिक वाहन किंवा ट्रामगाडी किंवा आगगाडी यांचा केलेला वापर या खंडानुसार भ्रष्टाचार समजला जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडामध्ये "वाहन" या संज्ञेचा अर्थ, परिवहनाच्या प्रयोजनासाठी सडकेवर वापरले जाणारे किंवा वापरता येण्याजोगे कोणतेही वाहन, असा आहे—मग ते यांत्रिक शक्तीवर चालणारे असो वा अन्यथा असो, तसेच ते इतर वाहने ओढण्यासाठी वापरलेले असो वा अन्यथा वापरलेले असो.

(६) कलम ७७ चे व्यतिक्रमण करून खर्च करणे किंवा प्राधिकृत करणे.

(७) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [1][उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी शासनाच्या सेवेतील आणि पुढील वर्गांपैकी कोणाही व्यक्तीकडून (मतदानाव्यतिरिक्त) कोणतेही सहाय्य घेणे किंवा मिळवणे अथवा घेण्याच्या किंवा मिळविण्याच्या कामी अपप्रेरणा देणे किंवा तसा प्रयत्न करणे ते वर्ग असे :—

(क) राजपत्रित अधिकारी;

(ख) वैतनिक न्यायाधीश व दंडाधिकारी;

(ग) संघराज्याच्या सशस्त्र सेनेचे सदस्य;

(घ) पोलीस दलाचे सदस्य;

(ङ) उत्पादनशुल्क अधिकारी;

[3][(च) जमीन महसुलाची उगराणी करणे हे ज्यांचे काम असते आणि जे त्यांनी उगराणी केलेल्या जमीन महसुलाच्या रकमेचा भाग किंवा अडत या स्वरूपात पारिश्रमिक घेतात आणि ज्यांना कोणतीही सुव्यवस्थारक्षणाची कामे करावी लागत नाहीत असे लंबरदार, मालगुजार, पटेल, देशमुख किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या ग्रामीण महसूल अधिकाऱ्याहून अन्य महसूल अधिकारी ; आणि]

(छ) विहित केलेला असेल असा शासकीय सेवेतील अन्य व्यक्तिवर्ग :

[4][परंतु, शासनाच्या सेवेत असलेल्या व पूर्वोक्तांपैकी कोणत्याही वर्गातील कोणाही व्यक्तीने आपले पदीय कर्तव्य पार पाडताना किंवा ते पार पाडण्याचे अभिप्रेत असताना जर कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी अथवा त्या उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने काम करणारी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यासाठी कोणतीही व्यवस्था केली किंवा कोणत्याही सुविधा पुरवल्या किंवा त्याच्या संबंधात अन्य कोणतीही कृती किंवा गोष्ट केली (मग ते त्या उमेदवाराने धारण केलेल्या पदामुळे असो वा अन्य कोणत्याही कारणास्तव असो) तर, अशी व्यवस्था, सुविधा किंवा कृती किंवा गोष्ट म्हणजे त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी दिलेले सहाय्य होय असे मानले जाणार नाही.]

---

१. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३६ द्वारे समाविष्ट केले.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३६ द्वारे उपखंड (च्) ऐवजी दाखल केले.

४. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (भूतलक्षी प्रभावासह).

¹[(८) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा इतर व्यक्तीने बूथ ताब्यात घेणे.]

**स्पष्टीकरण.**— (१) या कलमामधील "प्रतिनिधी" या संज्ञेमध्ये, निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी आणि उमेदवाराच्या संमतीने निवडणुकीच्या संबंधात जिने प्रतिनिधीप्रमाणे कार्य केले आहे असे न्यायनिर्णित केले गेले असेल, अशी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो.

(२) खंड (७) च्या प्रयोजनार्थ, एखादी व्यक्ती एखाद्या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी ²* * * * म्हणून कार्य करीत असल्यास, ती व्यक्ती त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी साहाय्य करीत असल्याचे मानण्यात येईल.

³[(३) खंड (७) च्या प्रयोजनार्थ, अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारच्या सेवेत असलेल्या (एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासनाच्या संबंधात सेवा करणारी व्यक्ती धरून) किंवा एखाद्या राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तीची नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा तिला सेवेतून दूर करणे यासंबंधीचे **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झालेले वृत्त म्हणजे,—

(एक) अशा व्यक्तींची नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा, प्रकरणपरत्वे, तिला सेवेतून दूर करण्यात येणे याचा, आणि

(दोन) अशी नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा प्रकरणपरत्वे, तिला याप्रमाणे सेवेतून दूर केले जाणे ही घटना अंमलात येण्याचा दिनांक अशा प्रकाशनात नमूद केलेला असेल तर, अशी व्यक्ती उक्त दिनांकी व तेव्हापासून नियुक्त करण्यात आली होती, या गोष्टीचाही, अथवा राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा सेवेतून दूर करणे यांच्या बाबतीत, अशी व्यक्ती उक्त दिनांकी व तेव्हापासून अशा सेवेत असण्याचे बंद झाले होते या गोष्टीचाही,

निर्णायक पुरावा असेल.]

¹[(४) खंड (८) च्या प्रयोजनार्थ 'बूथ ताब्यात घेणे' याचा कलम १३५ क मधील अर्थासारखाच अर्थ असेल.]

## प्रकरण तीन

## निवडणूकविषयक अपराध

**निवडणुकीसंबंधात विविध वर्गांमध्ये वैरभाव वाढीला लावणे.**

⁴[**१२५.** या अधिनियमाखालील निवडणुकीच्या संबंधात जी कोणतीही व्यक्ती, धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा या कारणावरून भारतीय नागरिकांमधील विविध वर्गांमध्ये शत्रुत्वाची किंवा विद्वेषाची भावना वाढीला लावील किंवा वाढीला लावण्याचा प्रयत्न करील ती व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

**मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणाऱ्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत जाहीर सभा भरवण्यास मनाई.**

⁵[**१२६.** (१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान क्षेत्रात, त्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या **वेळेपर्यंत** पूर्ण होणाऱ्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत :—

(क) निवडणुकीच्या संबंधात कोणतीही जाहीर सभा किंवा मिरवणूक बोलावणार नाही, भरवणार नाही, त्यास उपस्थित राहणार नाही, त्यात सहभागी होणार नाही किंवा त्यास उद्देशून अभिभाषण करणार नाही ; किंवा

(ख) जनतेला चलचित्राच्या, दूरचित्रवाणीच्या किंवा अन्य तत्सम साधनांच्या सहाय्याने निवडणूकविषयक कोणतीही बाब प्रदर्शित करणार नाही ; किंवा

(ग) जनतेचे लक्ष आकर्षून घेण्यासाठी कोणतीही संगीत सभा किंवा अन्य नाट्यप्रयोग किंवा कोणताही करमणुकीचा वा मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करून किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करून निवडणूकविषयक कोणत्याही बाबीचा प्रचार करणार नाही.

(२) जी व्यक्ती, पोटकलम (१) मधील उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(३) या कलमात "निवडणूकविषयक बाब" या संज्ञेचा अर्थ, निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पाडण्याचा किंवा परिणाम करण्याचा हेतू असलेली किंवा अपेक्षा असलेली कोणतीही बाब, असा आहे.]

१. १९८९ चा अधिनियम १, कलम १३ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५३ द्वारे विवक्षित मजकूर गाळला (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. १९७५ चा अधिनियम ४०, कलम ८ द्वारे जादा दाखल केले (भूतलक्षी प्रभावासह).
४. १९६१ चा अधिनियम ४०, कलम २४ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).
५. १९९६ चा अधिनियम २१, कलम १० द्वारे मूळ कलमा ऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून.)

निवडणूक सभांमध्ये अडथळा आणणे.

१२७. (१) जी कोणतीही व्यक्ती, हे कलम जिला लागू होते अशा सार्वजनिक सभेमध्ये, ती सभा ज्या कामकाजासाठी बोलावली असेल ते कामकाज चालवण्यास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने गैरशिस्त वर्तन करील किंवा इतरांना गैरशिस्त वर्तन करण्यास चिथावणी देईल ती व्यक्ती, [१][२][सहा महिन्यांपर्यंत] असू शकेल एवढ्या कारावासाच्या [२][किंवा दोन हजार रुपयापर्यंत असू शकेल] एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षास पात्र असेल.]

[३][(१क) पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.].

(२) हे कलम, कोणत्याही मतदारसंघामध्ये, उमेदवाराची किंवा उमेदवारांची निवडणूक घेण्यास मतदारसंघाला आवाहन करण्यासाठी या अधिनियमाखाली अधिसूचना काढल्याचा दिनांक आणि अशी निवडणूक ज्या दिवशी होणार आहे तो दिनांक या दोहोंच्या दरम्यान भरणाऱ्या राजकीय स्वरूपाच्या कोणत्याही सार्वजनिक सभेस लागू होते.

(३) जर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, एखाद्या व्यक्तीने, पोटकलम (१) खालील अपराध केला असावा असा रास्त संशय आला तर, तो अधिकारी, त्याला सभेच्या अध्यक्षाने तसे करण्याची विनंती केल्यास, त्या व्यक्तीला तिचे नाव व पत्ता तात्काळ जाहीर करण्याची आज्ञा करू शकेल आणि त्या व्यक्तीने आपले नाव व पत्ता सांगण्यास नकार दिला किंवा ती खोटे नाव व पत्ता सांगत असल्याचा पोलीस अधिकाऱ्यास रास्त संशय आला तर तो पोलीस अधिकारी त्याला वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.

[४][पत्रके, भित्तिपत्रके, इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.

१२७क. (१) कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भित्तिपत्रक मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही अथवा मुद्रित किंवा प्रकाशित करवता येणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीला निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक—

(क) ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे याबद्दलचे स्वतः स्वाक्षरित केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तिशः ओळखतात अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतींमध्ये दिल्याशिवाय ; आणि

(ख) तो दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रकाने त्या कागदाच्या एका प्रतीसह अधिकथनाची एक प्रत—

(एक) तो राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रित झाला असेल तर, मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याला ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत तो ज्या जिल्ह्यामध्ये मुद्रित झाला असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला,

पाठवल्याशिवाय मुद्रित करता येणार नाही किंवा मुद्रित करवता येणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) कागदपत्र हाताने नकलून काढण्याच्या प्रक्रियेहून अन्य कोणतीही अनेक प्रती काढण्याची प्रक्रिया म्हणजे मुद्रण असल्याचे समजण्यात येईल आणि "मुद्रक" या संज्ञेचा अर्थ तदनुसार लावला जाईल, आणि

(ख) "निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक" याचा अर्थ, उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या एखाद्या गटाच्या निवडणुकीचे प्रचालन करण्यासाठी किंवा निवडणुकीला बाध आणण्यासाठी वाटण्यात आलेले कोणतेही मुद्रितपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किंवा निवडणुकीशी संबंधित असा घोषणाफलक किंवा भित्तिफलक, असा होतो, पण निवडणूक-सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण आणि इतर तपशील किंवा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्यासाठी नेहमीच्या सूचना जाहीर करणारी हस्तपत्रके, घोषणाफलक किंवा भित्तिपत्रक यांचा समावेश होत नाही.

(४) जी व्यक्ती, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मधील कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

मतदान गुप्त राखणे.

१२८. (१) जो निवडणुकीच्यावेळी मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्यासंबंधात काही काम करतो असा प्रत्येक अधिकारी, लिपिक किंवा अन्य इसम याला मतदान गुप्त राखावे लागेल, तसेच ते राखण्यास मदत करावी लागेल आणि (कोणत्याही कायद्यानुसार किंवा त्या खाली काही प्रयोजनासाठी अधिकृत केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही), ज्यामुळे अशी गुप्तता भंग पावेल असे मानण्याजोगी कोणतीही माहिती, कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाही.

(२) जी व्यक्ती, पोटकलम (१) मधील उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

१. १९८९ चा अधिनियम १, कलम १४ द्वारे दाखल केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
२. १९९६ चा अधिनियम २१, कलम ११ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ११ (ख) द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
४. १९६१ चा अधिनियम ४०, कलम २६ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी तेव्हापासून).

१२९. (१) जी कोणतीही व्यक्ती [१][जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी] किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा मतदान केंद्राध्यक्षाने, निवडणुकीशी संबंधित असलेले कोणतेही काम करण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी किंवा लिपिक असेल, त्या व्यक्तीला निवडणुकीचे सूत्रचालन करताना किंवा त्यासंबंधीची व्यवस्था पाहताना (मत देण्याव्यतिरिक्त) एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम होईल, अशा प्रकारे कोणतीही कृती करता येणार नाही.

**अधिकारी, इत्यादींनी निवडणुकीच्या वेळी उमेदवारासाठी काम करावयाचे नाही किंवा मतदाना-संबंधात दडपण आणावयाचे नाही.**

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीला आणि पोलीस दलातील कोणत्याही सदस्याला,—

(क) एखाद्या व्यक्तीने निवडणुकीत मतदान करावे यासाठी तिचे मन वळविण्याचा, किंवा

(ख) निवडणुकीत मतदान करण्यापासून एखादया व्यक्तीला परावृत्त करण्याचा, किंवा

(ग) निवडणुकीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही प्रकारचे प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करता येणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मधील उपबंधांचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

[२][(४) पोटकलम (३) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.]

१३०. (१) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मतदान केंद्रावर ज्या दिनांकास मतदान घेतले जाणार आहे त्या दिनांकास किंवा दिनांकांना मतदान केंद्रामध्ये अथवा मतदान केंद्रापासून [३][शंभर मीटर] अंतराच्या आत असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी पुढीलपैकी कोणतीही कृती करता येणार नाही, त्या अशा :—

**मतदान केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई.**

(क) मतासाठी प्रचार करणे; किंवा

(ख) कोणत्याही मतदाराच्या मतासाठी आर्जव करणे ; किंवा

(ग) एखादया विशिष्ट उमेदवाराला मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराची मनवळवणी करणे; किंवा

(घ) निवडणुकीत मत न देण्यासाठी कोणत्याही मतदाराची मनवळवणी करणे; किंवा

(ङ) निवडणुकीसंबंधीची (अधिकृत सूचनेहून अन्य) नोटीस किंवा निशाणी प्रदर्शित करणे.

(२) जी व्यक्ती, पोटकलम (१) मधील उपबंधांचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) या कलमाखाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

१३१. (१) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मतदान केंद्रावर ज्या दिनांकाला किंवा दिनांकांना मतदान होणार असेल त्या दिवशी, ज्यायोगे मतदानासाठी मतदान केंद्रावर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्रास होईल किंवा मतदान केंद्रावर काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांच्या व अन्य व्यक्तींच्या कामात अडथळा येईल अशा रीतीने :—

**मतदान केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास गैरशिस्त वर्तन केल्याबद्दल शिक्षा.**

(क) मतदान केंद्रामध्ये किंवा त्यांच्या प्रवेशद्वाराजवळ अथवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यांसारखे मानवी आवाज वर्धित किंवा पुनरुच्चारित करण्याचे कोणतेही उपकरण वापरता किंवा चालवता येणार नाही, किंवा

(ख) मतदान केंद्रामध्ये किंवा त्यांच्या प्रवेशद्वाराजवळ अथवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी, ओरडता येणार नाही किंवा अन्यथा गैरशिस्त वर्तन करता येणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) मधील उपबंधांचे व्यतिक्रमण करील अथवा व्यतिक्रमण करण्यास बुद्धिपुरस्सर मदत करील किंवा अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) जर एखादी व्यक्ती, या कलमाखालील शिक्षापात्र अपराध करीत आहे किंवा तिने तो केला, असे मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला सकारण वाटत असेल तर, तो अशा व्यक्तीला अटक करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल आणि त्यानंतर पोलीस अधिकारी तिला अटक करील.

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५५ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, पोटकलम (१) मधील कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी रास्तपणे आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करता येतील आणि अशा बळाचा वापर करता येईल आणि अशा व्यतिक्रमणासाठी वापरलेले कोणतेही उपकरण सक्तीने ताब्यात घेता येईल.

मतदान केंद्रावरील गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

१३२. (१) कोणत्याही मतदान केंद्रावर मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या दरम्यान जी कोणतीही व्यक्ती गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यास चुकेल त्या व्यक्तीला मतदान केंद्राध्यक्ष किंवा त्यावेळी कामावर असलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने या बाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती त्या मतदान केंद्रावरून हाकलून लावू शकेल.

(२) पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्ती, जो मतदार एखाद्या मतदान केंद्रावर मतदान करण्यास एरव्ही हक्कदार असेल, त्याला त्या मतदान केंद्रावर मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशाप्रकारे वापरता येणार नाहीत.

(३) जर मतदान केंद्रातून हाकलून देण्यात आलेली व्यक्ती मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीशिवाय पुन्हा केंद्रावर आली तर, ती व्यक्ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(४) पोटकलम (३) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

[1][मतदानासाठी विहित केलेली प्रक्रिया अनुसरण्यास चुकल्याबद्दल शिक्षा.

१३२क. ज्या मतदाराला मतपत्रिका देण्यात आली आहे अशा एखाद्या मतदाराने जर, मतदानासाठी विहित करण्यात आलेली प्रक्रिया अनुसरण्यास नकार दिला तर, त्याला देण्यात आलेली मतपत्रिका रद्द केली जाण्यास पात्र असेल.]

निवडणुकीच्या वेळी वाहने अवैधपणे भाड्याने आणण्याबद्दल किंवा मिळवण्याबद्दल शिक्षा.

[2][१३३. जर, एखादी व्यक्ती, निवडणुकीच्या वेळी किंवा निवडणुकीच्या संबंधात कलम १२३ च्या खंड (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल दोषी असेल तर, ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

निवडणुकीसंबंधीच्या अधिकृत कर्तव्याचा भंग.

१३४. (१) ज्या व्यक्तीला हे कलम लागू होते ती व्यक्ती, वाजवी कारणाशिवाय स्वतःच्या अधिकृत कर्तव्याचा भंग करून कोणतीही कृती किंवा अकृती करण्याबद्दल दोषी असेल तर, ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

[3][(१क) पोटकलम (१) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.]

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या बाबत नुकसानी मिळण्यासाठी अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(३) ज्या व्यक्तींना हे कलम लागू होते, त्या म्हणजे [4] * * * [5][जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी], सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि [6] * * * नामनिर्देशने स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेणे यांच्या संबंधीचे काम किंवा निवडणुकीच्या वेळी मतनोंदणीचे किंवा मतमोजणीचे काम करण्यासाठी नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती होत; आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ, "अधिकृत कर्तव्य" ह्या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावला जाईल, पण त्यामध्ये या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली [6] * * * नव्हे तर अन्यथा दिलेल्या कामांचा समावेश असणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूचीद्वारे समाविष्ट केले (१५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. १९९६ चा अधिनियम २१, कलम १२ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५८ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३७ द्वारे विवक्षित मजकूर गाळला.

५. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५८ द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

६. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३७ द्वारे मूळ मजकूर गाळला.

¹[१३४क. शासकीय सेवेतील एखाद्या व्यक्तीने, उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी या नात्याने निवडणुकीत काम केले तर, ती व्यक्ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.] ¹[शासकीय कर्मचाऱ्याने निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याबद्दल शिक्षा.]

²[१३४ख. (१) निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, एखादा पोलीस अधिकारी आणि मतदान केंद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्या मतदान केंद्रावर कर्तव्यार्थ नेमणूक झालेली अन्य कोणतीही व्यक्ती, यांव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला, शस्त्र अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्ज अशा स्थितीत मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या जवळपास जाता येणार नाही. ²[शस्त्रे घेऊन मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्राजवळ जाण्यास मनाई.]

(२) कोणत्याही व्यक्तीने, जर, पोटकलम (१) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण केले तर ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(३) शस्त्र अधिनियम, १९५९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादी व्यक्ती, या कलमान्वये अपराधाबद्दल सिद्धदोष ठरेल तेव्हा उक्त अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे तिच्याजवळ सापडलेली शस्त्रे जप्त होण्यास पात्र ठरतील आणि अशा शस्त्रांबाबत देण्यात आलेले लायसन त्या अधिनियमाच्या कलम १७ अन्वये रद्द झाल्याचे मानण्यात येईल.

(४) पोटकलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.]

१३५. (१) जी व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, एखादी मतपत्रिका मतदान केंद्राबाहेर ³[अनधिकृतरीत्या] नेईल किंवा नेण्याचा प्रयत्न करील किंवा अशी एखादी कृती करण्यास बुद्धिपुरस्सर मदत करील किंवा अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. मतदान केंद्रावरून मतपत्रिका पळविणे हा गुन्हा होय.

(२) एखादी व्यक्ती पोटकलम (१) खालील शिक्षापात्र अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षाला सकारण वाटत असेल तर, अशी व्यक्ती मतदान केंद्रामधून बाहेर जाण्यापूर्वी असा अधिकारी तिला अटक करू शकेल किंवा तिला अटक करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल आणि अशा व्यक्तीची झडती घेऊ शकेल किंवा पोलीस अधिकाऱ्याकरवी झडती करवू शकेल :

परंतु, जेव्हा एखाद्या महिलेची झडती घेणे आवश्यक असेल तेव्हा, सभ्यतेचे काटेकोरपणे पालन करून दुसऱ्या महिलेकरवी तिची झडती घेता येईल.

(३) अटक केलेल्या व्यक्तीकडे झडतीनंतर एखादी मतपत्रिका आढळल्यास, मतदान केंद्राध्यक्षाकडून ती मतपत्रिका सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याच्या हवाली करण्यात येईल किंवा अशी झडती पोलीस अधिकाऱ्याने केली असेल तेव्हा, असा अधिकारी ती मतपत्रिका स्वतःच्या ताब्यात सुरक्षित ठेवून देईल.

(४) पोटकलम (१) खाली दंडनीय असलेला अपराध दखलपात्र असेल.

⁴[१३५क. ⁵[(१)] जो कोणी, बूथ ताब्यात घेण्याचा अपराध करील तो एक ⁶[वर्षापेक्षा कमी नसेल पण तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि शासकीय सेवेतील व्यक्तीने जर असा अपराध केला तर त्या बाबतीत ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल पण पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या] शिक्षेस पात्र होईल. बूथ ताब्यात घेण्याचा अपराध.

**स्पष्टीकरण.—** ⁶[या पोटकलमाच्या व कलम २० ख च्या] प्रयोजनासाठी बूथ ताब्यात घेणे यात, इतर गोष्टींबरोबरच खालील सर्व किंवा त्यापैकी काही कृतींचा समावेश असेल—त्या पुढील प्रमाणे :—

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५९ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
२. १९९६ चा अधिनियम २१, कलम १३ द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
४. १९८९ चा अधिनियम १, कलम १५ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).
५. १९९६ चा अधिनियम २१, कलम १५ द्वारे कलम १३५क ला त्या कलमाचे "पोटकलम (१)" असा नवीन क्रमांक दिला. (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम १५ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

(क) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचे किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतदान प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि जिचा सुरळीतपणे चाललेल्या निवडणुकीवर विपरित परिणाम होईल अशी कोणतीही कृती करणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचा किंवा मतदान करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाचा ताबा घेणे आणि केवळ त्याच्या किंवा त्यांच्या समर्थकांनाच मतदानाचा अधिकार बजावू देणे आणि [1][मतदान करण्याचा आपला हक्क मुक्तपणे बजावण्यास इतरांना प्रतिबंध करणे ; ].

(ग) कोणत्याही मतदाराला [1][प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे जबरदस्ती करणे किंवा धाकदपटशा दाखवणे किंवा धमकी देणे] व आपले मत देण्यासाठी मतदान केंद्रावर किंवा मतदानकरण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणी जाण्यास त्यास प्रतिबंध करणे ;

(घ) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, मतमोजणी करण्यात येणाऱ्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतमोजणी प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि सुरळीत चाललेल्या मतमोजणीवर विपरित परिणाम होईल अशी कोणतीही कृती करणे ;

(ङ) शासकीय सेवेतील कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम व्हावा यासाठी पूर्वोक्त सर्व किंवा कोणत्याही कृती करणे किंवा अशा कृती करण्यास सहाय्य करणे किंवा त्यांना मुकानुमती देणे.]

[2][(२) पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र अपराध दखलपात्र असेल.].

[3][मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांना भरपगारी सुटी मंजूर करणे.

**१३५ख.** (१) कोणत्याही धंद्यात, व्यवसायात, औद्योगिक किंवा अन्य कोणत्याही आस्थापनेत कामाला असलेल्या आणि लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी भरपगारी सुटी मंजूर केली जाईल.

(२) पोटकलम (१) अनुसार, अशी सुटी दिल्यामुळे अशा कोणत्याही व्यक्तीच्या वेतनात कपात किंवा वजावट केली जाणार नाही आणि त्या व्यक्तीची नियुक्ती जर, अशा तत्वावर केलेली असेल की जेणेकरून अशा दिवसाकरिता सर्वसाधारणपणे तिला वेतन मिळाले नसते तरीसुद्धा त्या व्यक्तीला, त्या दिवशी जर सुटी दिली गेली नसती तर, जेवढे वेतन तिला मिळाले असते तेवढेच वेतन त्या दिवसाकरिता त्या व्यक्तीला दिले जाईल.

(३) जर मालकाने पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) यांच्या उपबंधाचे उल्लंघन केले तर, अशा मालकाला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थितीही तो ज्या नोकरीवर असेल त्या नोकरीच्य संदर्भात धोकादायक किंवा हानीकारक ठरणार असेल अशा कोणत्याही मतदाराला हे कलम लागू होणार नाही

मतदानाच्या दिवशी मद्य विकणे, देणे किंवा वितरित करणे यावर बंदी.

**१३५ग.** (१) कोणत्याही निवडणुकीकरिता मतदानाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वीचे अठ्ठेचाळीस तास त्या मतदान क्षेत्रात कोणत्याही हॉटेलात, खाद्यगृहात, मद्यगृहात, दुकानात किंवा अन्य कोणत्याही जागेत मग ती सार्वजनिक असो वा खाजगी असो कोणतेही स्पिरीटयुक्त, आंबवलेले किंवा मादकमद्य किंवा तशाच स्वरूपाचे अन्य पदार्थ विकण्यात किंवा देण्यात किंवा वितरीत करण्यात येणार नाहीत.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधान्वये जी व्यक्ती उल्लंघन करील ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(३) जेव्हा एखादी व्यक्ती, या कलमाखालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरेल तेव्हा, तिच्या ताब्यात सापडलेले स्पिरीटयुक्त, आंबवलेले किंवा मादकमद्य अथवा तशाच स्वरूपाचे इतर पदार्थ हे जप्त करण्याजोगे ठरतील आणि त्यांची विल्हेवाट विहित करण्यात येईल अशा रीतीने लावण्यात येईल.]

इतर अपराध आणि त्याबद्दलच्या शिक्षा.

**१३६.** (१) जर एखाद्या व्यक्तीने, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी—

(क) कोणतेही नामनिर्देशनपत्र कपटपूर्वक विरूपित केले अथवा कपटपूर्वक नष्ट केले तर; किंवा

(ख) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अथवा त्याच्या प्राधिकाऱ्यान्वये लावलेली एखादी यादी, सूचना अथवा अन्य कागदपत्र कपटपूर्वक विरूपित केले, नष्ट केले अथवा हलवले तर; किंवा

(ग) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह अथवा डाक मतपत्रिकेद्वारे करावयाच्या मतदानाच्या संबंधातील कोणतेही ओळखीबाबतचे अधिकथन किंवा त्यासंबंधात वापरण्यात आलेला अधिकृत लिफाफा कपटपूर्वक विरूपित केला अथवा कपटपूर्वक नष्ट केला तर ; किंवा

---

१. १९९६ चा अधिनियम २१, कलम १५ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ (दोन) द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

(घ) उचित प्राधिकाराशिवाय, कोणत्याही व्यक्तीला एखादी मतपत्रिका पुरवली '[अथवा कोणत्याही व्यक्तीकडून एखादी मतपत्रिका स्वीकारली अथवा एखादी मतपत्रिका जवळ बाळगली;] किंवा

(ङ) जी मतपत्रिका मतपेटीत टाकण्यास कायद्यानुसार त्या व्यक्तीला प्राधिकृत केले असेल अशा मतपत्रिकेहून अन्य काहीही मतपेटीत कपटपूर्वक टाकले तर; किंवा

(च) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी वापरात असलेली कोणतीही मतपेटी किंवा मतपत्रिका उचित प्राधिकाराशिवाय नष्ट केली, घेतली किंवा त्याबाबत अन्यप्रकारे ढवळाढवळ केली तर; किंवा

(छ) पूर्वी उल्लेखिलेल्यापैकी कोणतीही कृती कपटपूर्वक अथवा प्रकरणपरत्वे, उचित प्राधिकाराशिवाय, करण्याचा प्रयत्न केला किंवा करण्यास मदत केली किंवा अपप्रेरणा दिली तर, ती व्यक्ती, निवडणूकविषयक अपराध केल्याचो दोषी होईल.

(२) या कलमाखाली निवडणूक विषयक अपराधाबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती ही :—

(क) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष अथवा निवडणुकीच्यासंबंधात अधिकृत कर्तव्य करण्यासाठी नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी किंवा लिपिक असेल तर, ती दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीचे काम हे, निवडणुकीतील मतमोजणीसह त्या निवडणुकीच्या किंवा निवडणुकीच्या भागाच्या चालनामध्ये सहभागी होणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकीत वापरण्यात आलेल्या मतपत्रिका आणि अन्य दस्तऐवज यांस जबाबदार राहणे अशा स्वरूपाचे असेल तर, ती व्यक्ती पदीय कामावर असल्याचे समजण्यात येईल, पण "अधिकृत कर्तव्य" या संज्ञेमध्ये या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली [2]* * * अन्यथा सोपवलेल्या कोणत्याही कामाचा समावेश होणार नाही.

[3][(४) पोटकलम (२) खालील दंडनीय असलेला अपराध दखलपात्र असेल.]

१३७. [विवक्षित अपराधांबद्दल खटला.] 'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४७), कलम ६१ द्वारे निरसित.

१३८. [१८९८ चा अधिनियम क्रमांक ५ याचे विशोधन] 'निरसन आणि विशोधन अधिनियम १९५७' (१९५७ चा ३६), कलम २ आणि अनुसूची एक याद्वारे निरसित.

## भाग आठ

### निरर्हता

१३९-१४५. [प्रकरण १ ते ३]—'लोक प्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६६' (१९६६ चा ४७), कलम ६२ द्वारे निरसित.

[4][प्रकरण चार.—सदस्यांच्या निरर्हताविषयी करावयाच्या चौकशींच्यासंबंधी निवडणूक आयोगाच्या शक्ती.

१४६. (१) जर अनुच्छेद १०३ खाली किंवा, प्रकरणपरत्वे, 'संघराज्यक्षेत्रे अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) याच्या कलम १४ मधील पोट-कलम (४) खाली राष्ट्रपतीला, अथवा अनुच्छेद-१९२ खाली राज्यपालाला कोणतेही मत कळविण्याच्या संबंधात, निवडणूक आयोगाला चौकशी करणे आवश्यक व योग्य वाटेल, आणि अशा चौकशीमध्ये संबंधित पक्षांनी आपण होऊन दाखल केलेल्या प्रतिज्ञालेखांच्या आणि हजर केलेल्या दस्तऐवजांच्या आधारे आपण करावयाच्या बाबींवर निर्णायक मत देऊ शकणार नाही अशी आयोगाची खात्री झाली तर, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखालील दाव्यांची संपरीक्षा करताना दिवाणी न्यायालयाला असतात त्या शक्ती खाली दिलेल्या बाबींच्या संबंधात आयोगाला अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ असतील, त्या बाबी अशा— निवडणूक आयोगाच्या शक्ती.

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर होण्यास फर्मावणे आणि तिची शपथेवर साक्षतपासणी करणे;

(ख) पुरावा म्हणून हजर करण्याजोगा असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य महत्वाची वस्तू प्रकट करवून ती हजर करण्यास फर्मावणे;

(ग) प्रतिज्ञालेखाद्वारे पुरावा स्वीकारणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे;

---

१. १९५६ चा अधिनियम २७, कलम ७० द्वारे समाविष्ट केले.
२. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३८ द्वारे विवक्षित मजकूर गाळला.
३. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ६० द्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. १९६५ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

(ड्) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

(२) एखाद्या व्यक्तीला, ती स्वतः त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार, आपणांस एखादी माहिती प्रकट न करण्याची सवलत असल्याचा जो दावा सांगील त्याच्या अधीनतेने, आयोगाच्या मते चौकशीच्या विषयवस्तुसाठी उपयुक्त असेल किंवा संबद्ध असेल अशा मुद्यांवरील किंवा बाबतीतील माहिती पुरवण्यास फर्मावण्याचीही आयोगाला शक्ती असेल.

(३) आयोग म्हणजे दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल आणि जेव्हा, 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५), कलम १७५, कलम १७८, कलम १७९, कलम १८० किंवा कलम २२८ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे कोणताही गुन्हा आयोगाच्या नजरेस येईल अशाप्रकारे किंवा आयोगाच्या समक्ष केला जाईल तेव्हा, आयोग, गुन्ह्याची घटकतथ्ये आणि 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८'[१] (१८९८ चा ५) ज्यामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे आरोपीचा जबाब नोंदवून घेतल्यानंतर ते प्रकरण, त्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवील आणि ज्याच्याकडे असे एखादे प्रकरण पाठवले गेले असेल तो दंडाधिकारी, ते प्रकरण 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८'[१] (१८९८ चा ५) कलम ४८२ खाली त्याच्याकडे पाठवले गेले आहे असे समजून आरोपीविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीची सुनावणी सुरू करील.

(४) आयोगापुढील कोणतीही कार्यवाही ही 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५), कलम १९३ आणि कलम २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

**व्यक्तींनी निवडणूक आयोगापुढे दिलेल्या जबान्या.** **१४६क.** निवडणूक आयोगापुढे दिलेल्या साक्षीपुराव्याच्या ओघात कोणत्याही व्यक्तीने दिलेल्या कोणत्याही जबानीमुळे ती व्यक्ती, अशा जबानीच्या रुपाने खोटी साक्ष दिल्याबद्दलच्या खटल्याव्यतिरिक्त एरव्ही, कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीला पात्र होणार नाही अथवा ती जबानी दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीत तिच्याविरुद्ध वापरता येणार नाही :

परंतु, अशी जबानी—

(क) ज्या प्रश्नाला उत्तर देणे आयोगाने त्या व्यक्तीला, आवश्यक केले आहे अशा प्रश्नाच्या उत्तरादाखल दिलेली असावी, किंवा

(ख) चौकशीच्या विषयवस्तू संबद्ध असावी.

**निवडणूक आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती.** **१४६ख.** निवडणूक आयोगाला स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याची (यात, त्याच्या बैठकीची ठिकाणे आणि वेळा ठरविणे आणि बैठक सार्वजनिकरीत्या भरवावी की खाजगीरीत्या भरवावी ते, ठरवणेसुद्धा येते) शक्ती असेल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.** **१४६ग.** या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधांच्या अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशाच्या अनुरोधाने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत अथवा आयोगाने राष्ट्रपतीला किंवा, प्रकरणपरत्वे, **राज्यपालाला** कोणताही अभिप्राय देण्याच्या बाबतीत अथवा आयोगाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये असा कोणताही अभिप्राय, कागदपत्र किंवा कामकाजवृत्त प्रकाशित करण्याच्या बाबतीत, आयोगाविरूद्ध अथवा आयोगाच्या निदेशानुसार कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा वैध कार्यवाही केली जाणार नाही.]

## भाग नऊ

### पोटनिवडणुका

**राज्यसभेतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.** **१४७.** [२][(१)] जेव्हा राज्यसभेवर निवडून आलेल्या सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी त्याची जागा रिक्त होईल किंवा रिक्त असल्याचे घोषित केले जाईल किंवा राज्यसभेवरील त्याची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित केले जाईल तेव्हा, निवडणूक आयोग, **भारताचे राजपत्र** यात अधिसूचना प्रसिद्ध करून, विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांना किंवा, प्रकरणपरत्वे, संबंधित निर्वाचकगणाच्या सदस्यांना, [३]* * * अशा प्रकारे रिक्त झालेली जागा, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी भरण्यासाठी त्यांनी एखादी व्यक्ती निवडून द्यावी असे आवाहन करील आणि अधिनियमाचे आणि त्याखाली केलेले नियम व आदेश यांचे उपबंध अशी रिक्त जागा भरण्यासाठी घेतलेल्या सदस्य-निवडणुकीबाबत शक्य तेथवर लागू होतील.

[४][(२) 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर शक्य तितक्या लवकर आसाम, ओरिसा आणि उत्तरप्रदेश या राज्यांना आणि दिल्ली, हिमाचल प्रदेश व मणिपूर या संघ राज्यक्षेत्रांना वाटून दिलेल्या जागांपैकी त्या दिनांकास रिक्त असलेल्या जागा भरण्यासाठी पोट-निवडणुका घेतल्या जातील.]

---

१. आता पहा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा अधिनियम क्रमांक २) चा तत्सम उपबंध.
२. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे कलम १४७ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक दिला.
३. १९५१ चा अधिनियम ४१, कलम ४४ व अनुसूची पाच द्वारे विवक्षित मजकूर गाळला
४. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे समाविष्ट केले.

१४८. [विवक्षित संघ राज्यक्षेत्रांमधील निर्वाचकगणातील निमित्तवशात् रिक्त होणारी जागा.] 'राज्यक्षेत्रीय परिषदा अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०३)—कलम ६६ द्वारे निरसित.

**लोकसभेत निमित्तवशात् रिक्त होणारी जागा.**

१४९. (१) जेव्हा लोकसभेवर निवडून आलेल्या सदस्याची जागा रिक्त होईल किंवा रिक्त झाल्याचे घोषित केले जाईल किंवा लोकसभेवरील त्याची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित केले जाईल तेव्हा, निवडणूक आयोग, **भारताचे राजपत्र** यात अधिसूचना प्रसिद्ध करून, पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, संबंधित संसदीय मतदारसंघांना, अशा तऱ्हेने रिक्त झालेली जागा, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी भरण्यासाठी त्यांनी एखादी व्यक्ती निवडून द्यावी असे आवाहन करील आणि या अधिनियमाचे आणि त्याखाली करण्यात आलेले नियम व आदेश यांचे उपबंध, अशी रिक्त जागा भरण्यासाठी केलेल्या सदस्य-निवडणुकीबाबत शक्य तेथवर लागू होतील.

(२) जर अशा तऱ्हेने रिक्त झालेली जागा ही अशा कोणत्याही मतदारसंघातील अनुसूचित जातीसाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेली जागा असेल तर, पोटकलम (१) खाली काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अशी जागा भरणारी व्यक्ती अनुसूचित जातीची किंवा, प्रकरणपरत्वे, अशा अनुसूचित जनजातीची असली पाहिजे, असे विनिर्दिष्ट केले जाईल.

**राज्य विधानसभांतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.**

१५०. (१) जेव्हा राज्य विधानसभेवर निवडून आलेल्या सदस्याची जागा रिक्त होईल किंवा रिक्त असल्याचे घोषित केले जाईल किंवा विधानसभेवरील त्यांची निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित केले जाईल तेव्हा, निवडणूक आयोग, पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, संबंधित विधानसभा मतदारसंघाला, अशा प्रकारे रिक्त झालेली जागा, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी भरण्यासाठी त्याने एखादी व्यक्ती निवडून द्यावी असे आवाहन करील आणि या अधिनियमाचे आणि त्याखाली करण्यात आलेले नियम व आदेश यांचे उपबंध, अशी रिक्त जागा भरण्यासाठी झालेल्या सदस्य-निवडणुकीच्या संबंधात शक्य तेथवर लागू होतील.

(२) जर, अशा तऱ्हेने रिक्त झालेली जागा ही, अशा कोणत्याही मतदारसंघातील अनुसूचित जातींसाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेली जागा असेल तर, पोटकलम (१) खाली काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये, अशी जागा भरणारी व्यक्ती, अनुसूचित जातीची किंवा, प्रकरणपरत्वे, अशा अनुसूचित जनजातीची असली पाहिजे असे विनिर्दिष्ट केले जाईल.

**राज्य विधानपरिषदांतील निमित्तवशात् रिक्त होणाऱ्या जागा.**

[1][१५१. राज्याच्या विधानपरिषदेवर निवडून आलेल्या सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी जर, त्याची जागा रिक्त झाली किंवा रिक्त असल्याचे घोषित केले गेले किंवा त्याची विधान परिषदेवरील निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित केले गेले तर, निवडणूक आयोग **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून संबंधित विधानपरिषद मतदारसंघाला किंवा, प्रकरणपरत्वे, राज्याच्या विधानपरिषद सदस्यांना अशा तऱ्हेने रिक्त झालेली जागा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी भरण्यासाठी त्यांनी एखादी व्यक्ती निवडून द्यावी असे आवाहन करील आणि या अधिनियमाचे आणि त्याखाली करण्यात आलेले नियम व आदेश यांचे उपबंध, अशी जागा भरण्यासाठी केलेल्या सदस्य-निवडणुकीच्या संबंधात शक्य तेथवर लागू होतील.

**[1][कलमे १४७, १४९, १५० व १५१ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी वेळेची मर्यादा.]**

**१५१क.** कलम १४७, कलम १४९, कलम १५० व कलम १५१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही उक्त कलमामध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही रिक्त जागा भरण्यासाठी, ती जागा रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत पोट-निवडणूक घेण्यात येईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट जर—

(क) रिक्त जागेच्या संबंधात सदस्याच्या पदावधीचा उर्वरित काळ एक वर्षाहून कमी राहिला असेल ; किंवा

(ख) निवडणूक आयोगाने केंद्र सरकारशी विचारविनिमय करून, उक्त कालावधीत पोट-निवडणूक घेणे कठीण आहे असे प्रमाणित केले असेल,

तर लागू होणार नाही.]

## भाग दहा

### संकीर्ण

**राज्य विधानसभांच्या आणि निर्वाचक गणांच्या सदस्यांची यादी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ठेवावयाची.**

**१५२.** (१) राज्य विधानसभेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी करावयाच्या निवडणुकीसाठी अथवा राज्य विधानपरिषदेतील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी राज्य विधानसभेच्या सदस्यांनी करावयाच्या निवडणुकीसाठी नेमलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास अशा निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, विधानसभेच्या निवडलेल्या सदस्यांची किंवा प्रकरणपरत्वे, सदस्यांची यादी आपल्या कार्यालयात विहित पद्धतीने आणि विहित नमुन्यात राखावी लागेल.

---

१. १९९६ चा अधिनियम २१, कलम १७ द्वारे समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).

(२) राज्यसभेतील पद किंवा पदे भरण्यासाठी [१][संघ राज्यक्षेत्राच्या] निर्वाचक गणांच्या सदस्यांनी [२]* * * [३]* * * करावयाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला अशा निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, त्या निर्वाचक गणाच्या सदस्यांची यादी [३]* * * आपल्या कार्यालयात विहित पद्धतीने आणि विहित नमुन्यात राखावी लागेल.

(३) पोटकलम (१) आणि (२) मध्ये निर्देशिलेल्या याद्यांच्या प्रती विक्रीसाठी ठेवल्या जातील.

**निवडणूक पूर्ण होण्याची नेमलेली मुदत वाढविणे.**

[४][१५३. निवडणूक आयोगाने स्वतःला पुरेशी वाटतील अशा कारणास्तव कोणतीही निवडणूक पूर्ण करण्यासाठी नेमण्यात आलेली मुदत कलम ३० किंवा कलम ३९ च्या पोटकलम (१) खाली त्याने काढलेल्या अधिसूचनेमध्ये आवश्यक ती विशोधने करून वाढवणे हे कायदेशीर होईल.]

**राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधी.**

१५४. [५][(१) पोटकलमे (२) आणि (२क) मधील उपबंधांच्या अधीनतेने, निमित्तवशात् रिक्त झालेली जागा भरण्यासाठी निवडलेल्या सदस्याहून अन्य अशा, राज्य सभेच्या सदस्यांचा पदावधि सहा वर्षे इतका असेल.]

(२) [६]* * * राज्यसभा प्रथमतः घटित झाल्यानंतर राष्ट्रपती, निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून नंतर, त्यावेळी निवडलेल्या काही सदस्यांचा पदावधी कमी करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था आदेशाद्वारे करील, जेणेकरून प्रत्येक वर्गातील स्थानापन्न सदस्यांपैकी जवळ-जवळ एक तृतीयांश सदस्य त्यानंतर दर दुसऱ्या वर्षी निवृत्त होतील.

[७][(२क) जवळजवळ एकतृतीयांश इतके सदस्य २ एप्रिल, १९५८ रोजी आणि त्यानंतर दर दुसरे वर्ष संपल्यानंतर निवृत्त व्हावेत म्हणून राष्ट्रपती, 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' याच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून नंतर, कलम १४७ च्या पोटकलम (२) खाली निवडून आलेल्या सदस्यांच्या पदावधीबाबत त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था आदेशाद्वारे करील.]

(३) निमित्तवशात् रिक्त झालेली जागा भरण्यासाठी निवडावयाचा सदस्य, त्याच्या पूर्वाधिकाऱ्याच्या पदावधीच्या उर्वरित काळात काम करण्यासाठी निवडला जाईल.

**राज्यसभेच्या सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ.**

१५५. (१) राज्यसभेच्या ज्या सदस्याचे नाव कलम ७१ खाली **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचित करणे आवश्यक असते त्याचा पदावधी अशा अधिसूचनेच्या दिनांकास सुरू होईल.

(२) राज्यसभेच्या ज्या सदस्याचे नाव **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करणे आवश्यक नसते त्याचा पदावधी, अशी व्यक्ती निवडून आल्याबद्दल कलम ६७ खाली जिचे नाव अंतर्भूत असलेली घोषणा अथवा प्रकरणपरत्वे, अशा व्यक्तीची राज्यसभेवर नामनियुक्ती झाल्याचे घोषित करण्यासाठी अनुच्छेद ८० मधील खंड (१) च्या उप-खंड (क) खाली किंवा अन्य कोणत्याही उपबंधाखाली काढलेली अधिसूचना **शासकीय राजपत्रामध्ये** प्रकाशित झाल्याच्या दिनांकास सुरू होईल.

**राज्य विधानपरिषद सदस्यांचा पदावधी.**

१५६. (१) राज्य विधानपरिषदेतील निमित्तवशात् रिक्त झालेली जागा भरण्यासाठी निवडण्यात आलेल्या सदस्याहून अन्य सदस्याचा पदावधी सहा वर्षे इतका असेल, पण विधानपरिषद प्रथमतः घटित झाल्यानंतर, राज्यपाल [८]* * * निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून नंतर, त्यावेळच्या निवडलेल्या काही सदस्यांचा पदावधी कमी करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था आदेशाद्वारे करील, जेणेकरून प्रत्येक वर्गातील स्थानापन्न सदस्यांपैकी जवळजवळ एक-तृतीयांश सदस्य त्यानंतर दर दुसऱ्यावर्षी निवृत्त होतील.

(२) निमित्तवशात् रिक्त झालेली जागा भरण्यासाठी निवडावयाचा सदस्य, त्याच्या पूर्वाधिकाऱ्याच्या पदावधीच्या उर्वरित काळात काम करण्यासाठी निवडला जाईल.

**विधानपरिषदेच्या सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ.**

१५७. (१) राज्य विधानपरिषदेच्या ज्या सदस्याचे नाव [९][कलम ७४] खाली **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करणे आवश्यक असते त्याचा पदावधी अशा अधिसूचनेच्या दिनांकास सुरू होईल.

(२) राज्य विधानपरिषदेच्या ज्या सदस्याचे नाव [९][कलम ७४] खाली **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करणे आवश्यक नसते त्याचा पदावधी, अशी व्यक्ती निवडून आल्याबद्दल कलम ६७ खाली

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ७७ द्वारे विवक्षित शब्द गाळले.
३. १९५१ चा अधिनियम ४९, कलम ४४ व अनुसूची पाच द्वारे विवक्षित शब्द गाळले.
४. १९५६ चा अधिनियम २७, कलम ७८ द्वारे मूळ कलम १५३ ऐवजी दाखल केले.
५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे पोटकलम (१) ऐवजी दाखल केले.
६. वरील आदेशाद्वारे विवक्षित मजकूर गाळला.
७. वरील आदेशा द्वारे समाविष्ट केले.
८. वरील आदेशा द्वारे विवक्षित शब्द गाळले.
९. १९५६ चा अधिनियम २७, कलम ७९ द्वारे विवक्षित शब्द व आकडा याऐवजी दाखल केले.

तिचे नाव अंतर्भूत असलेली घोषणा अथवा प्रकरणपरत्वे, अशा व्यक्तीची विधानपरिषदेवर नामनियुक्ती झाल्याचे घोषित करण्यासाठी अनुच्छेद १७१ मधील खंड (३) च्या उपखंड (इ.) खाली काढलेली अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकास सुरू होईल.

[१][१५८. (१) कलम ३४ खाली किंवा कलम ३९ च्या पोटकलम (२) सहित त्या ३४ च्या कलमाखाली ठेवलेली अनामत रक्कम एकतर, ती ठेवणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वैध प्रतिनिधीला परत केली जाईल अथवा या कलमातील उपबंधानुसार जप्त करण्यात येऊन ती, समुचित प्राधिकरणाकडे जमा केली जाईल.

उमेदवाराची अनामत रक्कम परत करणे किंवा जप्त करणे.

(२) या कलमात यापुढे उल्लेखिलेल्या असतील त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर अनामत रक्कम परत केली जाईल.

(३) एखाद्या उमेदवाराचे नाव निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत दाखवले नसेल तर, किंवा मतदानाला प्रारंभ होण्यापूर्वी तो मृत्यू पावला तर, त्या यादीच्या प्रकाशनानंतर किंवा प्रकरण-परत्वे, त्याच्या मृत्यूनंतर, शक्य असेल तितक्या लवकर, अनामत रक्कम परत केली जाईल.

(४) पोटकलम (३) मधील उपबंधाच्या अधीनतेने, ज्या निवडणुकीमध्ये मतदान घेतले गेले असेल, अशा निवडणुकीमध्ये तो उमेदवार निवडून आला नाही आणि त्याच्या नावे नोंदल्या गेलेल्या विधिग्राह्य मतांची संख्या, सर्व उमेदवारांच्या नावे नोंदल्या गेलेल्या विधिग्राह्य मतांच्या एकूण संख्येच्या एक-षष्ठांशापेक्षा, किंवा ज्या निवडणुकीत एकापेक्षा अधिक सदस्य निवडले जातात त्या निवडणुकीच्या बाबतीत अशा नोंदल्या गेलेल्या सर्व विधिग्राह्य मतांच्या एकूण संख्येला निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या संख्येने भागून येणाऱ्या संख्येच्या एक-षष्ठांशापेक्षा जास्त नसेल तर, अनामत रक्कम जप्त केली जाईल :

परंतु, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार झालेल्या निवडणुकीमध्ये उमेदवार निवडून आला नसेल त्याबाबतीत, उमेदवार निवडून आल्याच्या निश्चितीसाठी पुरेशी म्हणून जितकी मतसंख्या याबाबत विहित केली असेल, तिच्या एक-षष्ठांशापेक्षा जास्त मते त्याला मिळाली नसतील, तर त्याने दिलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.

(५) पोटकलमे (२), (३) आणि (४) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक संसदीय मतदारसंघातून किंवा एकापेक्षा अधिक विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणारा उमेदवार असेल तर, त्याला जास्तीत जास्त एक अनामत रक्कम परत केली जाईल व इतर अनामत रकमा जप्त केल्या जातील ;

(ख) एखादा उमेदवार, एकापेक्षा अधिक विधानपरिषद मतदारसंघांच्या निवडणुकीत अथवा एखाद्या विधानपरिषद मतदारसंघांच्या निवडणुकीत आणि विधानपरिषदेतील जागा भरण्यासाठी राज्य विधानसभेच्या सदस्यांनी करावयाच्या निवडणुकीत निवडणूक लढवणारा उमेदवार असेल तर, त्याला जास्तीत जास्त एक अनामत रक्कम परत केली जाईल व इतर अनामत रकमा जप्त केल्या जातील.]

१५९. राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण अनुच्छेद ३२४ च्या खंड (४) खाली नियुक्त केलेल्या [२]* * * प्रादेशिक आयुक्ताने किंवा राज्याच्या मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याने विनंती केल्यास, निवडणुकीच्या संबंधातील कोणतीही कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असेल तितका कर्मचारी-वर्ग, कोणत्याही निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला उपलब्ध करून देईल.

प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारीवर्ग निवडणूक कार्या-साठी उपलब्ध करून द्यावयाचा.

१६०. (१) जर राज्य शासनाला, राज्यात व्हावयाच्या निवडणुकीच्या संबंधात असे वाटले की,—

निवडणुकीच्या प्रयोजनासाठी जागा, वाहने, इत्यादींचे अधिग्रहण करणे.

(क) मतदान केंद्र म्हणून वापरण्यासाठी किंवा मतदान झाल्यानंतर मतपेट्या ठेवण्यासाठी एखाद्या वास्तूची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे; किंवा

(ख) मतपेट्या मतदान केंद्रांवर नेण्यासाठी किंवा तेथून आणण्यासाठी किंवा अशा निवडणुकीच्या चालनामध्ये सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस दलातील माणसांची ने-आण करण्यासाठी किंवा अशा निवडणुकीच्या संबंधातील कोणतीही कामे पार पाडण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याची किंवा अन्य व्यक्तीची तेथे ने-आण करण्यासाठी वाहनाची, जलयानाची किंवा जनावराची अवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

तर, ते शासन अशा वास्तूचे किंवा वाहनाचे, जलयानाचे किंवा, प्रकरणपरत्वे, जनावराचे लेखी आदेशाद्वारे अधिग्रहण करू शकेल, आणि अशा अधिग्रहणाच्या संबंधात त्याला आवश्यक व उचित वाटतील असे आणखी आदेश काढू शकेल :

१. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ३९ द्वारे मूळ कलम १५८ ऐवजी दाखल केले.

२. १९५६ चा अधिनियम २७, कलम ८१ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

परंतु, अशा उमेदवाराच्या निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी त्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने कायदेशीररीत्या वापरलेल्या कोणत्याही वाहनाचे, जलयानाचे किंवा कोणत्याही जनावराचे या पोटकलमाखाली करावयाचे अधिग्रहण अशा निवडणुकीतील मतदान पूर्ण होईपर्यंत करता येणार नाही.

(२) राज्य शासनाला जी व्यक्ती मालमत्तेची मालक किंवा कब्जाधारक वाटत असेल, त्या व्यक्तीला उद्देशून दिल्या लेखी आदेशाद्वारे अधिग्रहण केले जाईल आणि असा आदेश, तो ज्या व्यक्तीला उद्देशून काढण्यात आला आहे त्या व्यक्तीवर विहित पद्धतीने बजावण्यात येईल.

(३) जेव्हा जेव्हा पोटकलम (१) खाली एखादा मालमत्तेचे अधिग्रहण करण्यात येईल तेव्हा तेव्हा, अशा अधिग्रहणाची मुदत, त्या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अशी मालमत्ता जितका काळ आवश्यक असेल त्या कालावधीपेक्षा जास्त लांबणार नाही.

(४) या कलमामध्ये—

(क) "वास्तू" याचा अर्थ, कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा भाग, असा आहे आणि त्यामध्ये झोपडी, पडवी किंवा इतर बांधकाम किंवा त्याचा कोणताही भाग यांचा समावेश होतो;

(ख) "वाहन" याचा अर्थ, रस्त्यावर वापरले जाणारे किंवा वापरण्याजोगे असलेले, यंत्रचलित किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे वाहन, असा आहे.

नुकसानभरपाई देणे.

१६१. (१) जेव्हा कलम १६० ला अनुसरून राज्य शासन कोणत्याही वास्तूचे अधिग्रहण करील तेव्हा, हितसंबंधित व्यक्तींना नुकसानभरपाई दिली जाईल व पुढील गोष्टी विचारात घेऊन तिची रक्कम ठरविली जाईल, त्या गोष्टी अशा :—

(एक) त्या वास्तूच्या बाबतीत प्रदेय असलेले भाडे किंवा असे भाडे प्रदेय नसेल तर, त्या स्थानिक भागात तशाच वास्तूसाठी द्यावे लागणारे भाडे;

(दोन) वास्तूच्या अधिग्रहणाचा परिणाम म्हणून हितसंबंधित व्यक्तीला आपले निवासस्थान किंवा कामधंद्याचे ठिकाण बदलावे लागले असेल तर, अशा बदलामुळे झालेला वाजवी आनुषंगिक खर्च (काही असल्यास) :

परंतु, जेव्हा कोणतीही हितसंबंधित व्यक्ती, अशा तऱ्हेने ठरवण्यात आलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेमुळे नाराज होऊन, ती बाब लवादाकडे सोपविण्यासाठी राज्य शासनाला विहित मुदतीत अर्ज करील तेव्हा, द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम ही, राज्य शासन याबाबत नियुक्त करील अशा लवादाकडून ठरवण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु आणखी असे की, जेव्हा नुकसानभरपाई स्वीकारण्याच्या हक्काबाबत किंवा नुकसानभरपाईच्या रकमेच्या संविभाजनाबाबत एखादा तंटा उपस्थित होईल तेव्हा, तो तंटा राज्य शासन, त्याने याबाबत नियुक्त केलेल्या लवादाकडे निर्णयासाठी सोपवील आणि अशा लवादाच्या निर्णयानुसार तो मिटवला जाईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमामध्ये "हितसंबंधित व्यक्ती" या संज्ञेचा अर्थ, कलम १६० खाली अधिग्रहण केलेल्या वास्तूचा कब्जा अधिग्रहणाच्या लगतपूर्वी प्रत्यक्षात ज्या व्यक्तीकडे होता ती व्यक्ती किंवा असा प्रत्यक्ष कब्जा असणारी कोणीही व्यक्ती नसल्यास, अशा वास्तूचा मालक असा आहे.

(२) जेव्हा जेव्हा कलम १६० ला अनुसरून राज्य शासन, एखादे वाहन, जलयान किंवा जनावर यांचे अधिग्रहण करील तेव्हा तेव्हा, त्याच्या मालकाला नुकसानभरपाई दिली जाईल आणि असे वाहन, जलयान किंवा जनावर भाड्याने आणण्यासाठी त्या ठिकाणी प्रचलित असलेल्या प्रवासभाड्याच्या किंवा प्रवासदराच्या आधारावर राज्य शासनाकडून तिची रक्कम ठरवण्यात येईल :

परंतु, जेव्हा अशा वाहनाचा, जलयानाचा किंवा जनावराचा मालक, अशा तऱ्हेने ठरवण्यात आलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेमुळे नाराज होऊन, ती बाब लवादाकडे सोपवण्यासाठी राज्य शासनाकडे विहित मुदतीत अर्ज करील तेव्हा, द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम ही, राज्य शासन याबाबत नियुक्त करील अशा लवादाकडून ठरवण्यात येईल, त्याप्रमाणे असेल :

परंतु आणखी असे की, जेव्हा अधिग्रहण करण्याच्या लगतपूर्वी, ते वाहन किंवा जलयान भाडे-खरेदी कराराद्वारे मालकाकडून अन्य व्यक्तीच्या कब्जात असेल तेव्हा, अधिग्रहणाच्या संबंधात प्रदेय म्हणून या पोटकलमाखाली ठरवलेली एकूण नुकसानभरपाईची रक्कम, ती व्यक्ती आणि मालक यांच्यामध्ये, त्या दोघांनाही संमत होईल अशा प्रकारे आणि एकमत न झाल्यास राज्य शासनाने याबाबतीत नियुक्त केलेल्या लवादाकडून ठरवण्यात येईल, त्याप्रकारे संविभाजित केली जाईल.

माहिती मिळवण्याची शक्ती.

१६२. राज्य शासन, कलम १६० खाली कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्याच्या दृष्टीने किंवा कलम १६१ खाली प्रदेय असलेली नुकसानभरपाईची रक्कम, ठरवण्याच्या दृष्टीने, आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा प्राधिकाऱ्याकडे, याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेली असेल अशी, त्या मालमत्तेच्या संबंधातील तिच्यापाशी असलेली माहिती पुरविण्यास फर्मावू शकेल.

१६३. (१) राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही वास्तूमध्ये वास्तू, इत्यादीमध्ये प्रवेश करता येईल आणि अशी वास्तू किंवा तेथील वाहन, जलयान किंवा जनावर यांच्या संबंधात कलम १६० खाली आदेश द्यावा किंवा कसे आणि द्यावयाचा झाल्यास, कोणत्या रीतीने द्यावा हे ठरवण्या-च्या उद्देशाने किंवा त्या कलमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन होत असल्याची खातर-जमा करून घेण्याच्या उद्देशाने अशा वास्तूची आणि तेथील वाहनाची, जलयानाची किंवा जनावराची पाहणी करता येईल.

प्रवेश करण्याची व पाहणी करण्याची शक्ती.

(२) या कलमामध्ये "वास्तू" आणि "वाहन" या शब्दप्रयोगांना कलम १६० मध्ये असल्याप्रमाणे अर्थ आहे.

१६४. (१) कलम १६० खाली देण्यात आलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करून जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही अधिग्रहण केलेल्या वास्तूचा कब्जा स्वतःकडे ठेवून घेईल त्या व्यक्तीला, राज्य शासनाने याबाबतीत शक्ती प्रदान केलेला कोणताही अधिकारी, त्या वास्तूमधून तडकाफडकी काढून लावू शकेल.

अधिग्रहण केलेल्या वास्तूमधून काढून लावणे.

(२) अशी शक्ती प्रदान झालेला कोणताही अधिकारी, लोकांमध्ये न वावरणाऱ्या कोणत्याही महिलेला तेथून निघून जाण्यासाठी वाजवी ताकीद देऊन आणि तशी सोय करून नंतर कोणत्याही इमारती-च्या एखाद्या दरवाजाचे कुलूप किंवा कडीकोयंडा काढू शकेल किंवा उघडू शकेल किंवा दरवाजा फोडून उघडू शकेल किंवा अशी हकालपट्टी अंमलात आणण्यासाठी आवश्यक ती अन्य कोणतीही कृती करू शकेल.

१६५. (१) जेव्हा कलम १६० खाली अधिग्रहण केलेली कोणतीही वास्तू अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल तेव्हा, ती वास्तू, ज्यावेळी त्या वास्तूचे अधिग्रहण केले गेले त्यावेळी ज्या व्यक्तीकडून तिचा कब्जा घेतला गेला त्या व्यक्तीला किंवा अशी कोणीही व्यक्ती नसल्यास, राज्य शासनाने जी व्यक्ती अशा वास्तूची मालक असल्याचे मानले असेल अशा व्यक्तीला सुपूर्द करण्यात येईल आणि याप्रमाणे कब्जा दिला की, त्यामुळे राज्य शासन अशा सुपूर्दगीच्या संबंधातील सर्व दायित्वातून संपूर्णतया मुक्त होईल, परंतु याप्रमाणे जिला वास्तूचा कब्जा सुपूर्द करण्यात आला आहे त्या व्यक्तीविरूद्ध अन्य कोणतीही व्यक्ती रीतसर विधिप्रक्रियेद्वारे त्या वास्तूच्या संबंधात जे कोणतेही हक्क बजावण्यास हक्कदार असेल त्या हक्कांना यामुळे बाध येणार नाही.

वास्तू अधिग्रहण मुक्त करणे.

(२) कलम १६० खाली अधिग्रहण केलेल्या एखाद्या वास्तूचा कब्जा पोटकलम (१) खाली ज्या व्यक्तीकडे द्यावयाचा आहे ती व्यक्ती सापडत नसेल किंवा सहजासहजी निश्चित करता येण्यासारखी नसेल किंवा तिचा एखादा प्रतिनिधी अथवा तिच्या वतीने सुपूर्दगी स्वीकारण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली अन्य कोणतीही व्यक्ती नसेल तर, राज्य शासन अशी वास्तू अधिग्रहणातून मुक्त करण्यात आली असल्याचे घोषित करणारी नोटीस काढून ती वास्तूमधील ठळक जागी लावण्याची तजवीज करील व ती **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करवील.

(३) जेव्हा पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली नोटीस **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केली जाईल तेव्हा, अशा नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेली वास्तू, अशा प्रकाशनाच्या दिनांकी आणि तेव्हापासून पुढे अधिग्रहणाधीन असण्याचे बंद होईल आणि तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या व्यक्तीकडे ती सुपूर्द करण्यात आली असल्याचे मानले जाईल; आणि राज्य शासन, त्या उक्त दिनांकानंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी अशा वास्तूच्या संबंधात कोणतीही नुकसानभरपाई किंवा अन्य मागणी यांच्याबाबत दायी ठरणार नाही.

१६६. राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, कलमे १६० ते १६५ च्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाद्वारे शासनाला प्रदान केल्या गेलेल्या कोणत्याही शक्तींचा वापर किंवा त्याच्याकडे सोपवलेल्या कोणत्याही कामांची अंमलबजावणी, निदेशांमध्ये काही शर्ती विनिर्दिष्ट केल्या असल्यास त्या शर्तींवर, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याने किंवा अधिकारीवर्गाने करावी.

अधिग्रहणाच्या बाबतीत राज्य शासनाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन.

१६७. जर कोणत्याही व्यक्तीने, कलम १६० किंवा कलम १६२ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे व्यतिक्रमण केले तर, तो व्यक्ती एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

अधिग्रहणाबाबतच्या कोणत्याही आदेशांचे व्यतिक्रमण केल्याबद्दल शिक्षा.

१६८. [भूतपूर्व भारतीय संस्थानांच्या अधिपतींच्या संबंधातील विशेष उपबंध.] 'भारतीय संस्थानांचे अधिपती (विशेषाधिकार नष्ट करणे) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ५४) कलम ४ द्वारे निरसित (९ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

नियम करण्याची शक्ती. **१६९.** (१) केंद्र सरकारला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून नंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [1]नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांनी मतदान केंद्राच्या ठिकाणी करावयाची कामे ;

(ख) मतदारांच्या यादीच्या संदर्भात मतदारांची तपासणी करणे ;

(ग) मतदान कसे करावयाचे त्यासंबंधीची सर्वसाधारण आणि अशिक्षित मतदारांच्या किंवा शारीरिक किंवा अन्य नि:समर्थता असणाऱ्या मतदारांच्या संबंधीची, अशा दोन्ही प्रकारच्या पद्धती;

(घ) एका मतदारसंघातील मतदार असून ज्याला तो ज्या ठिकाणचा मतदार नाही अशा मतदानकेंद्रावर कामासाठी प्राधिकृत केलेले किंवा नियुक्त केलेले असेल असा मतदान केंद्राध्यक्ष मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी किंवा अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांनी कशा रीतीने मतदान करावयाचे ;

(ङ) स्वत:च मतदार असल्याचे सांगणारी व्यक्ती, दुसऱ्याच एखाद्या व्यक्तीने असा मतदार म्हणून मतदान केल्यानंतर, मत देण्यात आले असता त्याबाबतीत, अनुसरावयाची प्रक्रिया;

[2][(ङङ) मतदान यंत्राद्वारे मत देण्याची किंवा ते नोंदवण्याची पद्धत आणि जेथे अशा यंत्रांचा वापर केला जात असेल अशा मतदान केंद्रांवर अनुसरावयाची मतदानाची पद्धती ;]

(च) एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार घेतलेल्या निवडणुकांमध्ये मतदानासंबंधी अनुसरावयाची प्रक्रिया ;

(छ) मतांची छाननी व मोजणी, ज्या प्रकरणात निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यापूर्वी मतांची फेरमोजणी केली जाईल अशी प्रकरणेसुद्धा ;

[2][(छछ) मतदान यंत्राच्या सहाय्याने नोंदवण्यात आलेल्या मतांची मोजणी करण्यासंबंधीची पद्धती ;]

(ज) [3][मतपेटया, मतदान यंत्रे], मतपत्रिका आणि अन्य निवडणूकविषयक कागदपत्रे, ते कसे सुरक्षित ठेवावेत, असे कागदपत्र किती काळ जतन करावेत ते आणि अशा कागदपत्रांची पाहणी करणे व ती हजर करणे याबाबत;

(झ) या अधिनियमाद्वारे विहित करावयाची अन्य कोणतीही बाब.

[4][(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेले किंवा [5][दोन किंवा त्याहून अधिक] क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेले असेल अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ज्या सत्रात तो नियम याप्रमाणे ठेवला गेला असेल ते सत्र किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेला आडकाठी. **१७०.** कोणत्याही दिवाणी न्यायालयाला, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा या अधिनियमाखाली निवडणुकीच्या संबंधात नियुक्त केल्या गेलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कारवाईची किंवा दिलेल्या कोणत्याही निर्णयाची वैधता प्रश्नास्पद करण्याची अधिकारिता असणार नाही

**१७१.** [१९२० चा अधिनियम ३९ याचे निरसन.] 'निरसन आणि विशोधन अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३६) कलम २ आणि अनुसूची पहिली यांद्वारे निरसित.

---

१. निवडणूक चालन नियम, १९६१, भाग दोन खाली पहा.

२. १९८९ चा अधिनियम १, कलम १६ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे "मतपेटया" याऐवजी हा मजकूर दाखल केला (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९६१ चा अधिनियम ४०, कलम २९ द्वारे पोट-कलम (३) ऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून). हे पोट-कलम १९५६चा अधिनियम २७, कलम ८२ द्वारे समाविष्ट केले होते.

५. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूची द्वारे दाखल केले (१५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून).

## THE REPRESENTATION OF THE PEOPLE ACT, 1951

## लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१

### इंग्रजी—मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| absent oneself | अनुपस्थित राहणे | S. 26(3) |
| appropriate authority | समुचित प्राधिकरण | S. 2(1)(b) |
| chief electoral officer | मुख्य निर्वाचन अधिकारी | S. 2(1) (bb) |
| corrupt practice | भ्रष्टाचार | S. 2(1)(c) |
| countermand the poll | मतदान प्रत्यादेशित करणे | S. 52 |
| counting agent | मतमोजणी प्रतिनिधी | S. 47-m.n. |
| election petition | निवडणूक तक्रारअर्ज | S. 79(c) |
| electoral offence | निवडणूकविषयक अपराध | Part VII-heading |
| electoral right | निवडणूकविषयक अधिकार | S. 79(d) |
| gratification | परितोषण | S. 123(1)-expl. |
| influence | प्रभाव | S. 129(2)(c) |
| multiple elections | बहुविध निवडणुका | Part V Ch. VI-heading |
| police functions | सुव्यवस्था-रक्षणाची कामे | S 123(7)(f) |
| personation of elector | मतदार म्हणून तोतयेगिरी करणे | S. 61-m.n. |
| proposer | प्रस्तावक | S. 36(1) |
| refrain from voting | मतदान न करणे | S. 123(1)(A)(b) |
| returned candidate | निर्वाचित उमेदवार | S. 79(f) |
| returning officer | निवडणूक निर्णय अधिकारी | S. 21-m.n. |
| revocation of appointment | नियुक्ती प्रत्याहृत करणे | S. 42(1) |
| scrutiny of nomination | नामनिर्देशनाची छाननी | S. 36(2)(a) |
| withdrawal of candidature | उमेदवारी मागे घेणे | S. 39(1)(c) |

## लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१

## THE REPRESENTATION OF THE PEOPLE ACT, 1951

### मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनुपस्थित राहणे | absent oneself | क. २६(३) |
| उमेदवारी मागे घेणे | withdrawal of candidature | क. ३९(१)(ग्) |
| नामनिर्देशनाची छाननी | scrutiny of nomination | क. ३६(२)(क) |
| नियुक्ती प्रत्याहृत करणे | revocation of appointment | क. ४२(१) |
| निर्वाचित उमेदवार | returned candidate | क. ७९(च्) |
| निवडणूक तक्रारअर्ज | election petition | क. ७९(ग्). |
| निवडणूक निर्णय अधिकारी | returning officer | क. २१स. टी. |
| निवडणूकविषयक अधिकार | electoral right | क. ७९(घ्) |
| निवडणूकविषयक अपराध | electoral offence | भाग सात—शीर्षक |
| परितोषण | gratification | क. १२३(१) स्पष्टी. |
| प्रभाव | influence | क. १२९(२)(ग्) |
| प्रस्तावक | proposer | क. ३६(१) |
| बहुविध निवडणुका | multiple elections | भाग पाच—प्रकरण सहा—शीर्षक |
| भ्रष्टाचार | corrupt practice | क. २(१)(ग्) |
| मतदान न करणे | refrain from voting | क. १२३(१)(क)(ख्) |
| मतदान प्रत्यादेशित करणे | countermand the poll | क. ५२ |
| मतदार म्हणून तोतयेगिरी करणे | personation of elector | क. ६१ स.टी. |
| मतमोजणी प्रतिनिधी | counting agent | क. ४७ स. टी. |
| मुख्य निर्वाचन अधिकारी | chief electoral officer | क. २(१)(खख्) |
| समुचित प्राधिकरण | appropriate authority | क. २(१) (ख्) |
| सुव्यवस्था-रक्षणाची कामे | police functions. | क. १२३(७)(च्) |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.